1543
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २०५८



बिहारचे सुपुत्र

# बिहार दर्शन

लेखक
श्यामनंदन

REFBK-0007922

...रे प्रकाशन, मन्दिर
...गांवकर चाळ क्र. २, गिरगांव, मुंबई ४

मूल्य दीड रुपया

# बिहार-दर्शन

लेखक :

**श्यामनंदन**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७४९९८ दि:
क्रमांक २०५४

REFBK-0007922

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा (स्थळ प्रत)

प्रकाशन क्रमांक ९९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९५३ १९७०

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबआी ४

मूल्य दीड रुपया

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
...८२९९८... वि: निबंध
...२०५४... नोंद दि. १८।३।७१

# प्रस्तावना

रंगभूमीवर प्रथमच पदार्पण करणाऱ्या नटाच्या बावरलेल्या शंकाकुल मनःस्थितींत मी हें पहिलें पाअूल टाकीत आहें आणि रसिकांच्या सेवेसाठीं सादर करीत असलेलीं हीं शबरीचीं बोरें श्रीरामचंद्रांच्या मनोवृत्तीनें चाखून पहावीं अेवढाच आग्रह आहे.

लेखनाला आवश्यक असलेली स्फूर्ति अथवा ज्ञानाची सखोलता यांपैकीं अेकहि गोष्ट माझ्याकडे नाहीं आणि म्हणून लेखनाच्या प्रांतांत पाअूल टाकण्याची मनीषा मीं धरली नव्हती. परंतु बिहारच्या भूमीनें माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या अरसिक हृदयांत जें काव्य ओतलें त्यांतून ह्या परिचय-लेखांचा जन्म झाला. साप्ताहिक "विवेक" आणि "वैनतेय" यांमधून ते लेख प्रसिद्ध झाल्यानंतर अनेक टीकाकारांचीं आणि लेखकांचीं अुत्तेजनपर पत्रें आलीं. त्यांतून निर्माण झालेल्या आत्मविश्वासानें बिहारच्या निरनिराळ्या अंगोपांगांचा एका विशिष्ट दृष्टीनें परिचय करून देण्याचें काम मीं केलें. त्यांचा हा संकलित संग्रहदेखील कांहीं ज्येष्ठ सुहृदांच्याच प्रोत्साहनानें अकल्पितपणें निघत आहे.

साप्ताहिकांतून क्रमशः प्रसिद्ध होणाऱ्या वाङ्मयावर नैसर्गिकपणें पडणाऱ्या अनेक मर्यादांच्या कक्षेंत राहून हे लेख प्रथम लिहिले गेले. त्यानंतरहि त्यांत फारसा फेरफार न करतांच ते लिहिल्यापासून २ वर्षांनीं प्रसिद्ध होत आहेत ही गोष्ट ध्यानांत घेतली म्हणजे कांहीं ठिकाणीं वाटणारें विषयांतर, अपुरेपणा अथवा विशिष्ट वेळ निघून गेल्यामुळें रसहीन वाटणारे अुल्लेख यांची संगति लागूं शकेल.

सम्राट अशोक, राष्ट्राध्यक्ष राजेंद्र अित्यादींच्या ह्या बिहारबद्दल थोड्याशा नवीन गोष्टी वाचकांच्या ध्यानीं आल्या आणि त्या समाजाचीं वैशिष्ट्यें समजून घेऊन त्यांच्याबद्दलची आत्मीयता थोडी तरी वाढविण्यास ह्या पुस्तकानें

प्रकाशक :
ग. पां. परचुरे,
ग. पां. परचुरे प्रकाशनमन्दिर, गोरेगांवकर चाळ क्र. २
गिरगांव मुंबअी ४

# अनुक्रमणिका

| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | मनाच्या पडद्यामागें | १ |
| २. | सर्वसामान्य चालीरीती | ५ |
| ३. | भोजनविषयक प्रघात | ८ |
| ४. | वेषभूषा व पेहरावपद्धती | १२ |
| ५. | नांवें, आडनांवें आणि जातीयता | १७ |
| ६. | सामाजिक गुणदोष | २२ |
| ७. | विहारांतील सण | २७ |
| ८. | बिहारी क्षेत्रें | ३२ |
| ९. | साहित्य आणि पत्रकारिता | ३६ |
| १०. | बिहारी राजकारणाचे रंग | ४१ |
| ११. | कोसीची कहाणी | ४६ |
| १२. | बिहारचा निरोप | ६४ |

★

मुद्रक :
मा. कृ. सहस्रबुद्धे,
प्रोप्रायटर, श्रीज्ञानेश्वर प्रेस, कोल्हापूर.

## अर्पणपत्रिका ★

तारुण्याच्या प्रारंभकालांत
आपल्या प्रभावी व्यक्तित्वाची
छाप पाडून मला सत्प्रवृत्त
आणि कार्यक्षम करणारे
सहकारी पथ-प्रदर्शक
श्री. चित्तरंजन पंडित
श्री. विष्णुपंत माओणकर
व
श्री. गजाननराव जोशी
यांस सादर.

-श्यामनंदन.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.................... वि: ....................
क्रमांक .................... नोंद दि: ....................

# बिहार–दर्शन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ४९२९

## १ : मनाच्या पडद्यामागें

देशाच्या विस्तृतपणापासून जरी असंख्य फायदे असले तरी, माझ्या मतें, त्यापासून एक मोठा धोका उत्पन्न होतो. सामान्य जनांचें सोडाच, पण सुशिक्षित आणि देशाबद्दल आस्था बाळगणाऱ्या माणसासहि आपल्या संपूर्ण देशाबद्दलची माहिती होणें आणि यथार्थतेनें हा संपूर्ण देश माझा आहे ही भावना वाटूं लागणें थोडेंसें दुस्तर होतें.

देशांतील दोन स्थळांमधील अंतर जसजसें वाढूं लागतें तसतसा बोलीभाषा, आचारविचार, सामाजिक रहाणी व संस्कार, चालीरीती, खाणेंपिणें यांत फरक पडूं लागतो व त्यामुळें आजच्या युगानें उपलब्ध करून दिलेल्या प्रचंड वेगाच्या एकाद्या यंत्राच्या साहाय्यानें कांहीं तासांच्या अथवा दिवसांच्या अवधींत आचारविचारादींच्या बदलत्या प्रवाहाचें नीट रीतीनें परीक्षण करण्याची संधि न मिळतां देशाच्या एका स्थळापासून दूरवरच्या दुसऱ्या स्थळीं जातांच एक प्रकारचा वेगळेपणा, अनोळखेपणा आणि दूरीभाव वाटूं लागतो. आपल्याच देशांत आपण आहोंत ही जाणीव थोडीशी मंदावते आणि ज्याप्रमाणें इंग्लंडला गेलेल्या माणसानें ‘ इंडिया लीग ’ चा आसरा घ्यावा त्याप्रमाणें मन ‘ महाराष्ट्र–मंडळ ’ धुंडूं लागतें. ‘ हा देश अपुला ’ अशा प्रकारची धारणा असतांनाहि क्षणभर हे लोक आपलेच भाऊबंद आहेत का ? यांच्यांत आणि आपल्यांत खरोखरच साम्य आहे का ? अशा प्रकारचे विचार मनांत येऊं लागतात.

अकस्मात् मुंबई सोडून पटना येथें सुमारें ३८ तासांच्या प्रवासानंतर येऊन पोहोंचतांच माझ्या मनालाहि असेंच कांहींसें वाटूं लागलें. खांडवा,

मदत झाली तर मी ह्याचें सार्थक समजेन; आणि बिहारच्या अमर्याद ऋणांतून वैयक्तिकदृष्ट्या थोडा तरी अुतराअी होअू शकेन.

प्रस्तुत लेख पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याला संमति दिल्याबद्दल " विवेक "चा मी आभारी आहें. हें पुस्तक छापलें जाण्यांत अनेकांचें प्रत्यक्षाप्रत्यक्ष साहाय्य झालें आहे; पण त्यांचे आभार मानून ऋणमुक्त होण्यापेक्षां त्यांचें कृतज्ञतापूर्वक स्मरण करून त्यांच्या ऋणांत कायमचें राहणेंच मला अिष्ट वाटतें.

सावंतवाडी
१ जानेवारी ५३

—श्यामनंदन.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# बिहार-दर्शन

## १ : मनाच्या पडद्यामागें

देशाच्या विस्तृतपणापासून जरी असंख्य फायदे असले तरी, माझ्या मतें, त्यापासून एक मोठा धोका उत्पन्न होतो. सामान्य जनांचें सोडाच, पण सुशिक्षित आणि देशाबद्दल आस्था बाळगणाऱ्या माणसासहि आपल्या संपूर्ण देशाबद्दलची माहिती होणें आणि यथार्थतेनें हा संपूर्ण देश माझा आहे ही भावना वाटूं लागणें थोडेंसें दुस्तर होतें.

देशांतील दोन स्थळांमधील अंतर जसजसें वाढूं लागतें तसतसा बोलीभाषा, आचारविचार, सामाजिक रहाणी व संस्कार, चालीरीती, खाणेंपिणें यांत फरक पडूं लागतो व त्यामुळें आजच्या युगानें उपलब्ध करून दिलेल्या प्रचंड वेगाच्या एकाद्या यंत्राच्या साहाय्यानें कांहीं तासांच्या अथवा दिवसांच्या अवधींत आचारविचारादींच्या बदलत्या प्रवाहाचें नीट रीतीनें परीक्षण करण्याची संधि न मिळतां देशाच्या एका स्थळापासून दूरवरच्या दुसऱ्या स्थळीं जातांच एक प्रकारचा वेगळेपणा, अनोळखेपणा आणि दूरीभाव वाटूं लागतो. आपल्याच देशांत आपण आहोंत ही जाणीव थोडीशी मंदावते आणि ज्याप्रमाणें इंग्लंडला गेलेल्या माणसानें ‘ इंडिया लीग ’ चा आसरा घ्यावा त्याप्रमाणें मन ‘ महाराष्ट्र-मंडळ ’ धुंडूं लागतें. ‘ हा देश अपुला ’ अशा प्रकारची धारणा असतांनाहि क्षणभर हे लोक आपलेच भाऊबंद आहेत का ? यांच्यांत आणि आपल्यांत खरोखरच साम्य आहे का ? अशा प्रकारचे विचार मनांत येऊं लागतात.

अकस्मात् मुंबई सोडून पटना येथें सुमारें ३८ तासांच्या प्रवासानंतर येऊन पोहोंचतांच माझ्या मनालाहि असेंच कांहींसें वाटूं लागलें. खांडवा,

कटनी अशीं परिचित नांवें असलेलीं स्टेशनें गाडी घेत असतांना अजून आपण आपल्याच हद्दींत आहोंत अशा प्रकारच्या एका भावनेनें मन प्रत्येक स्टेशनांत गाडींत शिरणाऱ्या प्रवाशांच्या बदलत्या रंगरूपाकडे ध्यान देतच नव्हतें. आठवणींच्या भाऊगर्दींत रंगलेल्या मनास गाडीनें अलाहाबाद सोडतांच यापुढच्या स्टेशनांत आपल्याला गाडी बदलायची आहे याची जाणीव झाली आणि थोड्या चकित, बावरलेल्या नजरेनें तें आवतींभोंवतीं पाहूं लागलें. थोडे बंगाली, बरेच उत्तरप्रदेशी व तितकेच बिहारी यांनीं गाडीचा डबा भरला होता आणि न कळूं शकणाऱ्या अशा भाषांनीं आणि बोलींनीं डब्यांत निर्माण केलेला कोलाहल वेगळेपणाच्या भावनेंत भर टाकत होता. 'हिमालयाचा मुकुट केलेल्या आणि हिंदुमहासागराचा करभार घेणाऱ्या' महान भारतमातेची पूजा मनोमन अनेक वर्षें करीत असल्याचा दावा सांगणाऱ्या माणसाच्या दृष्टीनें हें स्वतःलाच अविश्वसनीय वाटण्याजोगें होतें आणि आपण सोडून आलेला मुंबापुरीचा मिश्र जनसमूह, त्याच्याहि खालीं अनेक मैलांवरील आपल्या गांवीं आपल्याला अगदीं चिरपरिचित वाटणारा तो कोकणी जनसमूह आणि आतां हा इथें आपण पहात असलेला जनसमूह एकच आहेत याची जाणीव पुन्हांपुन्हां मनास करून द्यावी लागत होती.

मनांतला हा संघर्ष पटना येईपर्यंत सारखा वाढतच होता. पटना येतांच मात्र, कदाचित् आधींपासून पटन्याला रहावयाचें आहे अशा मनाला असलेल्या जाणीवेमुळें असेल, मनांतला हा कोलाहल अगदीं एकदम थांबला आणि चिरपरिचित अशा आपल्या मातृभूमीस आल्यासारखेंच वाटलें. तोंपर्यंत दूरीभावाच्या पडद्यानें अर्धवट झांकले गेलेले डोळे आजुबाजूच्या परिस्थितीचें निरीक्षण करूं लागले. वर निर्देशिलेल्या संघर्षांत सांपडलेलें आणि तो संघर्ष टाळण्यासाठीं महाराष्ट्राच्याच विचाराभोंवतीं घोटाळणारें मन तो कोष सोडून तेथून बाहेरचा विचार करूं लागलें आणि नंतर पहिली गोष्ट एकदम आठवली कीं १९४७ च्या मुस्लीम लीगच्या Direct Action मधून उद्भवलेल्या हिंदूंवरच्या असंख्य अन्यायांनीं अगदीं प्रथम संतप्त होऊन हिंदूंच्या अपमानाचा बदला भल्याबुऱ्या मार्गांनीं घेण्यासाठीं सज्ज

झालेल्या बिहारी लोकांत आपण आलों आहोंत. या विचारासरशीं मनानें पलट खाल्ली. विचारांतल्या दूरीभावाची जागा आत्मीयता आणि आदर यांनीं घेतली आणि आतांपर्यंतची उपेक्षावृत्ति टाकून बिहारच्या एकंदर परिस्थितीकडे मन कुतूहलानें पाहूं लागलें.

अशा रीतीनें मन थोडेंसें निरीक्षणक्षम होतांच जी पहिली गोष्ट ध्यानांत आली ती म्हणजे आचारविचार व कपडेलत्ते या बाबतींत बिहारी लोक अगदीं प्रथमदर्शनींच थोडेबहुत सनातन भासतात. सामान्यपणानें महाराष्ट्रांत आणि विशेषत्वानें मुंबईतून इतर जमातींच्या संघर्षानें मिशांचें बरेंचसें उच्चाटन झालेलें दिसतें. पण इथला–अगदीं पटन्यासारख्या राज्याच्या प्रमुख शहरांतला–सामान्य माणूसहि अजून आपल्या मिशांना ( अगर मिशा त्या माणसाला ) चिकटून आहेत. अगदीं तरुण पिढी म्हणजे आजचे कॉलेज युवक सोडले तर इतरत्र मिशा अगदीं संपूर्ण काढलेल्या फारशा दिसतच नाहींत. उलटपक्षीं भरघोंस मिशाच जास्त दिसतात; आणि आजच्या इथल्या कॉलेजयुवकांच्या बाबतींतहि मला इतक्या दिवसांच्या अनुभवानंतर असें वाटूं लागलें आहे कीं तरुणपणीं अगदीं अनिर्बंध, Mischievous ( खट्याळ ) आणि व्रात्य असलेला पारशी तरुणहि वयानें मोठा होतां होतां शांत, दानधर्मशील, स्त्रीदाक्षिण्यवादी आणि शामळू बनतो तद्वत् या आजच्या कॉलेजविद्यार्थ्यांतहि असा फरक पडत असावा. इथें शेंडी राखण्याचें प्रमाणहि जास्त आहे. धोतर आणि शर्ट हाच पोशाख अत्यंत मोठ्या बहुसंख्येनें प्रचारांत आहे. वाहनांच्या दृष्टीनेंहि सायकल–रिक्षा अगर टांग्यासारखीच एका घोड्याची पण आच्छादन नाहीं आणि बसायला नीट तयार केलेल्या seats ऐवजीं एक फळी टाकलेली अशा प्रकारची टमटम गाडी. या सान्यांचा संयुक्त परिणाम असा झाला आहे कीं एकंदर वातावरणांत जुनाटपणा फार वाटतो. बुरख्याची अद्यापहि बऱ्याच प्रमाणांत अस्तित्वांत असलेली पद्धति रस्त्यांत अगर घरींदारींहि हें थोडेंसें सनातनीपणाचें वातावरण निर्माण करते. अिथला सचीवालय ( सेक्रेटरिएट ) व आजूबाजूचा सरकारी मंत्र्यांच्या निवासस्थानांचा भाग सोडून दिला तर इमारतींची बांधणी आणि एक भिंत दोन घरांना

Common ठेवण्याची रीत ह्यांनींहि हें जुनाटपणाचें वातावरण वाढविण्यास मदत होते.

सर्वसामान्यपणें बिहारी लोक हे कपडे आणि स्वच्छता या बाबतींत अधिक अशिक्षित वाटतात. आजचा ऑफिसमध्यें काम करणारा वर्ग सोडला तर कपडे आणि शरीरस्वच्छता यांकडे दुर्लक्ष बऱ्याच प्रमाणांत दिसतें. इथल्याच लोकांतच 'गंदा बिहारी' असा वाक्प्रचार रूढ आहे असें मला एकानें सांगितलें! आणि अस्वच्छतेचें हें जीवन इतकें हाडींमासीं खिळलेलें आहे कीं स्वच्छ कपडे घालणारा माणूस सामान्यपणें त्यांना 'बाबू' वाटूं लागतो.

मी पटन्यास येऊन उतरलों आणि गाडीच्या बाबतींतल्या थोड्याशा घोंटाळ्यामुळें स्टेशनवर कोणीच आलेलें नसल्यानें स्टेशनबाहेर येऊन हातीं असलेल्या पत्त्यावर जायची व्यवस्था करूं लागलों. इथें टमटमइतकेंच सर्वोपयोगी असलेलें पण फक्त दोन माणसांना घेणारें आणि विशेषेंकरून बाबू लोक आणि स्त्रिया यांत जास्त प्रचारांत असलेलें वाहन म्हणजे सायकल रिक्षा. जायचें होतें त्याबाजूस जाण्यास टमटम उपलब्ध नसल्यानें एक सायकल रिक्षा ठरविली आणि पत्ता संशोधनाच्या कार्यावर निघालों. शहरांतील एक अगदीं प्रमुख असलेला व राष्ट्रपती राजेंद्रबाबू यांच्या नांवानें पुनीत झालेला रस्ता–राजेंद्रपथ–याच्यावरून मी जात होतों. दोन्ही बाजूला अगदीं खेडवळ वाटणाऱ्या इमारती, मध्यें मध्यें रिकामे सोडले गेलेले प्लॉटस्, वाटेंतलीं निर्वासितांनीं थाटलेलीं अस्थायी स्वरूपाचीं (Temporary) दुकानें आणि रस्त्याच्या कडेला एकाच थाळ्याशेजारीं मडकीं आणि समोर थोड्याशा मिरच्या आणि कांदे ठेवून बसलेले लोक (मागाहून चौकशी केल्यानंतर असें कळलें कीं गरीब लोकांचें 'सातु' हें इथलें मुख्य खाद्य आहे आणि तें रस्त्याच्या कडेलाच थाळ्यांतून कच्चा मिरच्या कांद्यासह खाल्लें जातें.), या साऱ्या गोष्टींमुळें एक प्रकारचें खेडवळ पण खेड्यांतल्या जिवंतपणाऐवजीं शहरांतल्या अर्धमृत, नीटसपणानें भरलेलें Gloomy वातावरण निर्माण झाल्यासारखें वाटत होतें.

★

# २ : सर्वसामान्य चालीरीती

एकदां एका बिहारी गृहस्थाच्या घरीं भोजनासाठीं जाण्याचा जो पहिलाच प्रसंग माझ्यावर आला, त्याची स्मृति माझ्या मनांत सदैव ताजी आहे. ज्यांनीं मला जेवायला बोलाविलें होतें, त्यांच्या घरीं मी माझ्या दुसऱ्या एका बिहारी मित्राबरोबर गेलों. आम्ही त्याच्या घरीं पोहोंचल्यानंतर त्यानें आमचें यथोचित स्वागत केलें आणि थोड्याशा इकडच्या तिकडच्या गप्पानंतर आम्ही जेवणासाठीं उठलों. घरमालक आमच्यापुढें चालत होता. स्वयंपाकघराच्या-खरें म्हणजे भोजनगृहाच्या-जवळ येतांच त्यानें 'आ रहे हैं' चा पुकारा केला. प्रत्यक्ष घरमालकाकडून भालदारासारखें आपलें आगमन पुकारलें जाईल अशी अपेक्षा नसल्यानें या सन्मानानें मी थोडा गोंधळल्यासारखा झालों आणि त्याचबरोबर ज्यांना आपलें आगमन पुकारलें जात आहे त्यांच्या उत्सुक नजरांना आपण अगदींच निराशाजनक वाटूं नये म्हणून मान कृत्रिमपणानें मागें ओढून छाती काढीत व कृत्रिम 'गंभीर हास्य' चेहऱ्यावर आणीत सभास्थानीं प्रवेश करणाऱ्या स. का. पाटलांप्रमाणें मी पुढें सरकलों. बांगड्यांची किणकिण, कपड्यांची सळसळ आणि दबलेल्या किनऱ्या आवाजांची नाजूक कुजबुज यावरून आतां स्त्रीसमाजासमोर जावें लागणार या जाणिवेनें अधिकच अवघडल्यासारखें झालें. छोटासा अरुंद अंधेरा पॅसेज ओलांडून एव्हांना माझ्या पावलांनीं मला अपेक्षित स्थळीं आणून सोडलें होतें. मी प्रेक्षकसमुदायाच्या चेहऱ्यावरील प्रतिक्रिया अजमाविण्यासाठीं चेहऱ्याची आणि शरीराची 'पोझची घडी' बदलूं न देतां आजुबाजूला पाहिलें आणि आजकालच्या राजकीय सभेला गेल्यासारखें मला वाटलें. माझ्याबरोबर आलेल्या त्या दोन महाभागांखेरीज 'सभागृहांत' कोणीच नव्हतें. बराचसा खट्टू होऊन आणि ओढून ताणून आणलेला ताठपणा सोडून मीं त्यांच्याकडे पाहिलें, पण ते बेटे कांहींच घडलें नाहीं अशा मख्खपणानें उभे होते.

## जेवणाच्या वेळीं

मनाच्या अशा गोंधळलेल्या अवस्थेंतच मी भोजनाला बसलों आणि

पुन्हां सभोंवतालीं नजर टाकली. आमच्या भोजनगृहांतून दुसऱ्या खोल्यांत जाण्यासाठीं असलेलीं दोन्ही दारें बंद होतीं. इतकेंच नव्हे तर स्वयंपाक-घराचें दारहि ओढून घेण्यांत आलेलें होतें. तें दार थोडेसें किलकिलें करून आमचा यजमान ‘अंतर्धान’ पावला आणि थोड्याच वेळांत वाढलेलीं दोन ताटें घेऊन बाहेर आला. पुन्हां जाऊन त्यानें तिसरेंहि ताट आणलें आणि आम्ही जेवायला बसलों. हा सारा प्रकार थट्टेचा एखादा खेळ आहे, कीं जाणूनबुजून केलेला अपमान आहे हें मला कळेना अन् मनाच्या गोंधळांत भर पडली. दुसरें कोणीच आसमंतात् नसल्यानें यजमानच आम्हांस काय हवें, काय नको ह्याकडे जातीनें लक्ष पुरवीत होता. थोड्या वेळानें मला भाजी पाहिजे होती म्हणून त्यानें भाजीचा पुकारा केला अन् नाकांतला शेंबूडहि पुसतां येत नाहीं अशी एक ५ ते ६ वर्षांची बाला भाजीनें भरलेलें भांडें घेऊन बाहेर आली अन् त्याच्या समोर ठेवून चालती झाली. त्यानें तें भांडें माझ्याकडे सरकविलें. मला ह्या साऱ्या प्रकाराचा अर्थच कळेनासा झाला होता; आणि मन एक प्रकारच्या अपमानाच्या जाणिवेनें क्षुब्ध झालें होतें. माझ्या ह्या क्षुब्धतेचा मागमूसहि बरोबर आलेल्या मित्राच्या चेहऱ्यावर नव्हता. तो शान्तपणानें भोजन करीत होता.

## आ रहे हैं

कसेंतरी जेवण आटोपून मी बाहेर आलों आणि घरमालकाची आराम करण्याची विनंति अमान्य करून व त्या दुसऱ्या दोस्ताला जवळ जवळ जबरदस्तीनें बाहेर काढून मी निघालों. मार्गस्थ होतांच माझा दबलेला राग उसळून वर आला अन् मीं त्याला म्हटलें, ‘काय बेमुर्वतखोर माणसें आहेत हीं!” आश्चर्यचकित दृष्टीनें तो माझ्याकडे पाहूं लागल्यानें माझा सर्व गोंधळ अन् राग मीं त्याला सांगितला. माझें म्हणणें ऐकून तो खदखदां हंसूं लागला, अन् मी जास्तच घुश्शांत येऊन झपाझप चालूं लागलों.

प्रकरण फारच गरम आहे हें पाहून आपलें हंसूं आवरीत तो माझ्याकडे आला अन् म्हणाला, ‘तूं असा रागावणार असलास तर बिहारांत तुला राहायला वा कुणाकडे जायलायायलाच नको!’

'म्हणजे ?' मीं त्याला विचारलें, 'बिहारांतलीं सारींच माणसें अशीं बेमुर्वतखोर आहेत वाटतें ?'

माझ्या बोलण्यांतल्या खोचकपणाकडे संपूर्ण दुर्लक्ष करीत त्यानें माहिती पुरविली कीं बिहारांत पडद्याची पद्धत सर्रास असल्यानें स्त्रिया बाहेरच्या माणसांसमोर येत नाहींत. इतकेंच नव्हे तर कुणीहि परका माणूस घरांत जाऊं लागला तर त्यानें स्वतः वा त्याच्या सोबतच्या व्यक्तीनें 'आ रहे हैं'चा पुकारा करणें आवश्यक समजलें जातें.

हें समजल्यावर माझा राग बराच निवळला आणि मीं त्याला सांगितलें, कीं मी ज्या समाजांत वाढलों आहें तेथें घरची मालकीण जर स्वतः वाढायला आली नाहीं तर तो पाहुण्याचा अपमान समजला जातो.

मनांतील गैरसमजाचें वादळ अशा प्रकारें एकदां शमल्यानंतर मात्र मनांत आलें कीं सुधारणेच्या नांवाखालीं दिवसेंदिवस जो वाढता थिल्लरपणा आपल्या आजच्या समाजांत दृष्टीला पडतो आणि अपरिचित वा तरुण तरुणींच्या ह्या वाढत्या मोकळेपणाबरोबरच स्वैराचार आणि विनयभंगाचे जे प्रकार समाजांत वाढत आहेत, त्यापेक्षां हें तंत्र अधिक परवडलें ! स्त्री-स्वातंत्र्य आणि समानता यांचे महाराष्ट्रीय पुरस्कर्ते (आणि पुरस्कर्त्या) माझ्या ह्या बुरसटलेल्या जुन्या विचारांना ऐकून नाकें मुरडतील हें मला माहीत आहे. पण गेल्या कांहीं महिन्यांत बिहारी जीवनाच्या प्रत्यक्ष अनुभवानंतर त्याची महाराष्ट्रीय जीवनाशीं तुलना करतां माझें मात्र असें ठाम मत झालें आहे, कीं बिहारी व्यक्तीच्या मनांत स्त्रियांविषयीं जास्त आदरभाव, जास्त पावित्र्य आणि जास्त शुचिता आहे. इतकेंच नव्हे तर स्त्रियांकडे रस्त्यांतून जातांना मान वर करून पाहणें हेंदेखील असभ्य आणि अशिष्ट समजलें जाण्याइतकी सूक्ष्म नीतिमत्तेची चाड आज बिहारांत आहे ! दररोज तिखटमीठ लावून कोर्टांतील, बलात्काराचे आणि व्यभिचाराचे खटले छापून पैसे मिळवणारीं आणि 'अमंगल मातृत्वाची' जाहीर चर्चा करून एका सामाजिक प्रश्नाला तोंड फोडल्याचें समाधान मानणारीं वृत्तपत्रें वा नियतकालिकें बिहारांत अभावानें सांपडतील.

बुरख्याच्या इष्टानिष्टतेबरोबर अथवा महाराष्ट्र आणि बिहार यांच्या

दृष्टिकोनांवर तुलनात्मक चर्चा करणें हा माझा विषय नाहीं. पण एवढें मात्र खरें कीं उत्तान शारीरिक वासनांना फुलवणाऱ्या गोष्टींचें महाराष्ट्रांत अनेक वेळां जबाबदार व्यक्तींकडून अथवा संस्थांकडून केलें जाणारें प्रदर्शन व समर्थन पाहण्यास सरावलेल्या मनाला या ठिकाणीं स्त्रीविषयक ऋजु भावनांचें आणि दृष्टिकोनाचें कौतुक वाटल्याशिवाय रहात नाहीं.

★

## ३ : भोजनविषयक प्रघात

महाराष्ट्रांतून बिहारांत येणाऱ्या व्यक्तीला जेवणांत फारच फरक आढळेल. सर्वसाधारणपणें महाराष्ट्रांत प्रचलित असलेल्या कल्पनांशीं विसंगत अशी अगदीं पहिली गोष्ट म्हणजे बिहार हा प्रामुख्यानें भात खाणारा विभाग आहे. कोंकणांतून मला पत्र लिहिणाऱ्या एका मित्रानें मला भात खावयास मिळत नसेल याबद्दल चिंता व्यक्त केली होती. मला वाटतें हीच धारणा साधारणपणें सर्वच महाराष्ट्रियांची आहे. परंतु बिहार हा 'पार्शल रेशनिंग' चा विभाग असल्यामुळें ( म्हणजे येथें रेशनमध्यें व बाजारांतहि धान्य मिळत असल्यानें ) तुलनात्मक दृष्टीनें पाहतां फार कमी लोक रेशनिंगचा फायदा घेतात. खेडेगांवांतून अगर बाजारांतून तांदूळ घेण्याकडेच जास्त कल आहे. एका काळीं कोंकण हा भात खाणारा प्रदेश म्हणून महाराष्ट्रांत प्रसिद्ध होता; परंतु सरकारी अन्नधोरणानें कधीं ज्वारी तर कधीं मिलो खायला भाग पाडल्यामुळें तो प्रांत आतां तसा राहिलेला नाहीं. पण बिहारी माणूस मात्र सणावारी अथवा साठीं षण्मासींच चपाती-भाकरीला स्पर्श करतो.

बिहारी जेवणाचा दुसरा एक विशेष म्हणजे त्याचा अतीव साधेपणा. भोजनांत आमटी म्हणजे डाळ हें समीकरण अगदीं ठरल्यासारखें आहे. त्यांत फरक एवढाच कीं डाळ कधीं चण्याची असेल, तर कधीं तूर, अथवा कधीं अगदीं हलकें धान्य 'खेसरी' याची. करण्याची पद्धत

एकच. डाळ उकडून केवळ हळद मीठ आणि नंतर फोडणी द्यावयाची. मसाला घातलाच तर इतक्या कमी प्रमाणांत, कीं तो चवीला लागणार-सुद्धां नाहीं. भाजी एकच असायची अन् तीहि फार थोड्या प्रमाणांत. भाताचे प्रचंड ढीग आणि डाळीचें वाडगें हें इतर कांहीं तोंडीलावण्याशिवाय बिहारी माणसाला गडप करतांना पाहिलें म्हणजे महाराष्ट्रीय माणसाला नवल वाटेल! ह्या साधेपणाची मर्यादा येथपर्यंत जाते, कीं सर्वसाधारण मध्यम वर्गांतला माणूस हा अनेक वेळां 'नाश्ता' म्हणूनहि भात-आमटीच खातो! आणि कदाचित् या साऱ्या वर्णनावरूनहि महाराष्ट्रांतील सर्व-साधारण जनतेला बिहारी लोकांच्या खाण्यांतल्या साधेपणाची कल्पना येणें कठीण वाटलें, तरी एक गोष्ट मात्र निर्विवाद आहे, कीं प्रत्यक्ष अनुभवानें बिहारी भोजन हें महाराष्ट्रीय भोजनापेक्षां अतिशय साधें वाटतें.

## सह नौ भुनक्तु

सर्वसामान्यपणें दक्षिणी माणसाला धक्का देणारी व थोडीबहुत अस्वच्छ वाटणारी एक पद्धत म्हणजे बिहारी लोकांचें एका ताटांतील भोजन. एकदां एका बिहारी मित्राकडे आम्हां चार पांचजणांना भोजनाला बोलाविलें होतें. आम्ही सर्व स्थानापन्न झालों तरी आमचा यजमान स्वतःसाठीं ताट घेऊन येण्याचें चिन्ह दिसेना. त्याचा तर 'सुरवात करा' म्हणून आग्रह सुरू झाला. शेवटीं मीं त्याला विचारलें, "आणि तूं ?"

"हा आलोंच" म्हणून तो हात धुवायला गेला आणि नंतर त्यानें माझ्याच समोर ठाण मांडलें. तोंपर्यंत एका ताटांत जेवण्याची ही बिहारी पद्धत पाहण्यांत आली नसल्यानें मी थोडा गोंधळांत पडल्यासारखा झालों आणि त्यानें एकदोन घास तोंडांत कोंबीपर्यंत माझा घास हातांतच राहिला! शेवटीं विस्मयानें मीं त्याला विचारलें, "हें काय चालवलें आहेस ?"

माझ्याहून जास्त विस्मयानें त्यानें मला सांगितलें, "जेवना!"

अखेर माझा विस्मय ज्याच्या ध्यानांत आला होता, अशा एका मित्रानें माझा गोंधळ आमच्या यजमानाला सांगितला. मीहि त्यावर म्हणालों, "हें असें 'सह नौ भुनक्तु' मला अशक्य आहे बुवा!"

तेव्हां हंसत हंसत तो दोस्त म्हणाला, "ठीक आहे...तूं आपला जेव. मी त्या ××× बरोबर जेवतों."

मी अधिकच चाट झालों. "पठ्या, तूं उष्टावलेल्या ताटांत मी जेवणें अशक्य आहे. हें तूंच खा आणि माझ्यासाठीं दुसऱ्या ताटाची व्यवस्था कर." असें मी म्हणालों.

तो सबंध दिवस माझ्या बिहारी मित्रमंडळींना माझ्या ह्या विक्षिप्त-पणाची थट्टा करायला पुरेसा झाला अन् त्या थट्टेतूनच मला कळलें कीं बिहारांत एकाच ताटांत जेवणाऱ्या दोन व्यक्तींत नातेंगोतें, दीर्घसंबंध कांहीं लागतेंच असें नाहीं. ती एक सामान्य प्रथा आहे. इतकेंच नव्हे तर जांवयाला एकटेंच जेवायचा संकोच वाटूं नये म्हणून त्याच्याहि ताटांत त्याच्याबरोबर एखादा लहान मुलगा भोजनाला बसवायची पद्धत अनेक ठिकाणीं आहे. 'पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना' हें अगदीं खरें असलें तरी ह्या 'मती'चें प्रदर्शन अनेक वेळां अतिशय विस्मयजनक वाटल्या-वांचून रहात नाहीं. निदान त्या दिवशीं तरी एकाच ताटांत भोजन करणाऱ्या माझ्या त्या मित्रवर्यांच्या दर्शनानें मला जेवण गेलें नाहीं!

## सरसू! सरसू!!

मला वाटतें महाराष्ट्रांतील जनतेला साधारणपणें कडव्या तेलाचा (मोहरीचें तेल) उपयोग दिव्यांत जाळणें आणि वेळीं प्रसंगीं कांहीं सामान्य रोगांवर मालीश करणें एवढाच ठाऊक आहे! त्याच्या उग्र वासामुळें तें तोंडांत घालण्याची कल्पनाहि महाराष्ट्रीय माणसाला सहन होणार नाहीं. पण बिहारांत त्याच जातीच्या जास्त उग्र वासाच्या सरसू तेलाचा उपयोग भोजनांत सर्रास केला जातो. ह्या सरसूच्या तेलानें युक्त भोजनाबद्दल थोडीशी कल्पना मला मुंबईसच मिळाली होती. पण ज्यांनीं ती कल्पना मला दिली होती ते सद्‌गृहस्थ शाकाहारी असल्यानें त्यांनीं त्या तेलामुळें भोजनाला मच्छीसारखा एक प्रकारचा उग्र वास आणि चव येत असल्याचें सांगून मला सावध करण्याचा प्रयत्न केला होता. जवळ जवळ दररोज मासळी खावयाची संवय असलेल्या माझ्यावर त्याचा त्यांना अनपेक्षित असलेला परिणाम झाला होता अन् मी त्या दिवसाच्या भोजनांत खाल्लेल्या मच्छीच्या

स्मरणानें दोन आवंढे गिळण्यापलीकडे त्याची दखल घेतली नव्हती. आणि म्हणून जेव्हां मी बिहारांत आलों अन् ३८ तासांच्या प्रवासांतल्या 'अनशना नंतर' खवखवलेल्या भुकेनें ताटावर जाऊन बसलों तेव्हां मला त्यांच्या ह्या इषाऱ्याची आठवण होऊन मी थोडा उल्हसितच झालों. मनांत आलें मासळी नाहीं तर निदान मासळीच्या वासाची तरी येथें कमतरता पडणार नाहीं. सर्वांना भोजन वाढीपर्यंत होणाऱ्या उशिरानें मी चुळबूळ करीत होतों आणि अखेरीस जेव्हां त्या साऱ्या उत्कटतेची भरपाई करण्यासाठीं तोंडांत मावेल तेवढा मोठा घांस कोंबला, तेव्हां जितक्या वेगानें तो आंत गेला तितक्याच वेगानें तो बाहेर येतो कीं काय असें मला वाटलें! ज्यांनीं मला मच्छीच्या चवीची लालूच दाखविली होती, त्यांच्यावर मनांतल्या मनांत मी भयंकर उखडलों आणि पाण्याच्या घोंटाबरोबर घांस गिळून टाकला. पण समोर वाढलेलें सारें ताट तसेंच पडलें होतें; आणि त्याला तोंड देणें अत्यंत आवश्यक होतें! भूक तर एकाच घांसांत मरून गेली होती. बाकीच्यांचें जेवण आनंदांत चाललेलें पाहून विस्मय आणि हेवा वाटत होता. कसेंतरी संपवायचें म्हणून समोरच्या भाजी-आमटीला हातहि न लावतां केवळ कोरडी चपाती पाण्याच्या घोटाबरोबर संपवीत होतों. पण ती अजब चव अद्याप तशीच ठाण मांडून बसली होती. मी जेवत कां नाहीं अशी पृच्छा करणाऱ्या व्यक्तींना मी प्रवासांतल्या त्रासाची सबब सांगून वेळ मारून नेत होतों. ह्या चवीशीं जुळवून घ्यायला मला कमींत कमी एक पंधरवडा लागला! पण चार महिन्यांच्या ह्या अवधीनंतरहि कच्चें तेल (लोणच्यांत अथवा तत्सम पदार्थांत) वा फोडणी देतांना येणारा त्या तेलाचा वास मी अद्याप सहन करूं शकत नाहीं.

बिहारांत जेवणांत वापरण्यांत येणाऱ्या तेलाप्रमाणेंच स्वयंपाकासाठीं वापरण्यांत येणारें सर्पणही वेगळेंच असतें. बिहार हा भारतांतील कोळशांच्या खाणीचा प्रदेश असल्यामुळें इकडे दगडी कोळसा अतिशय विपुल आणि स्वस्त आहे आणि म्हणून जेवण शिजविण्यासाठीं त्याचा सर्रास उपयोग करण्यांत येतो. दगडी कोळशाच्या प्रखर उष्णतेमुळें अन्न चटकन् शिजतें हें खरें असलें तरीहि ती शेगडी पेटविणें हें नव्या माणसाला एक दिव्य असतें;

आणि इथें येऊन स्थायिक झालेल्या एका महाराष्ट्रीय कुटुंबांतील व्यक्तीकडून मला समजलें कीं प्रारंभीं संवय होईतों त्या कोळशाचा उग्र धूर आणि पेटण्यासाठीं लागणारा दीर्घ वेळ ह्यामुळें गृहिणींना चांगलाच त्रास होतो.

बिहारांत दुधदुभतें अतिशय विपुल आणि स्वस्त आहे व त्यामुळें इकडे हॉटेलांतून आणि घरींहि असणारे बहुसंख्य खाण्याचे पदार्थ दुधापासून केलेले असतात. बाजारांत मिळणारी मेवामिठाईहि प्रामुख्यानें खवा, दूध, इ. पदार्थांचीच असते व त्यांत उत्तरप्रदेशी आणि बंगाली दोन्ही प्रकार स्थानपरत्वें लोकप्रिय आहेत. त्याचप्रमाणें बिहारांत हळूहळू चहाचा प्रसार वाढत असला तरीहि महाराष्ट्राइतका तो सर्वमान्य झालेला नाहीं. चहा न पिणाऱ्यांची संख्याहि बरीच जास्त आढळते. कॉफी तर बिहारांत जवळजवळ नाहींच.

साधारणपणें बोलायचें तर बिहारांतील खाणेंपिणें अतिशय साधें अन् सकस आहे.

★

## ४ : वेषभूषा व पेहरावपद्धती

एकदां मुंबईचे एक तरुण गृहस्थ आमच्या निवासांत आले. निवासांत मुंबईकर असा मी एकटाच असल्यामुळें त्यांना पाटणा दाखविण्याची जबाबदारी अर्थात् माझ्यावरच आली. त्यांच्याबरोबर पाटण्याच्या मध्यवर्ति विभागांतून हिंडत असतांना वारंवार ते कांहींतरी बोलण्याचा प्रयत्न करीत असावेत अशी माझी कल्पना झाली.

पण अगदीं ओठांवर येणारे शब्द परतविण्याची त्यांची धडपड विशेष परिचय नसल्यामुळें संकोचानें पहात मी तसाच राहिलों. बरेंचसें भटकून दमल्यावर आम्ही चहा पिण्यासाठीं म्हणून एका हॉटेलांत जाऊन बसलों आणि इतका वेळ अडखळणाऱ्या त्यांच्या बोलण्याला चहाच्या दर्शनानें वाट फुटली

व समोरच्या टेबलाशेजारीं बसलेल्या बंगाली मुलींकडे पहात त्यांनीं ‘ बालविवाह आणि तरुण विधवा ’ ह्या विषयावर एक भलें प्रचंड व्याख्यान सुरू केलें.

## गोड घोटाळा !

चहा संपत आला तरी त्यांच्या चर्पटपंजरीचा खरा अर्थ न समजू शकल्यानें, शेवटीं अधीरतेनें मीं त्यांना विचारलें, ‘ बालविवाहावर एखादा प्रबंध वगैरे लिहिण्याचा विचार आहे वाटतं ? ’ शेवटीं अडखळत त्यांनीं सांगितलें कीं रस्त्यांतून येतांना त्यांनीं पाहिलेल्या स्त्रियांपैकीं—विशेषतः तरुण मुलींपैकीं—शेंकडा ५० हून जास्त विधवा होत्या आणि त्यामुळें त्यांना बालविवाहाच्या प्रथेबद्दल साहजिकच चीड आली होती. समोरच्या टेबलाकडे पुन्हां एकदां पाहिल्यानंतर त्यांच्या ह्या अचाट निरीक्षणाचा खरा अर्थ माझ्या ध्यानांत आला. पण तरीहि तो त्यांच्याच तोंडून वदवावा म्हणून मीं मुद्दामच विचारलं, ‘ त्या विधवा होत्या हें कशावरून ? ’

त्यांनीं सांगितलं “ समोरच पहा ना ! त्या तीन मुलींपैकीं दोघींच्या गळ्यांत मंगळसूत्र वगैरे दिसत नाहीं आणि कपाळावर कुंकूहि नाहीं. ”

मला हंसू आवरेना आणि त्यांना मी कां हंसतो आहे तें कळेना. शेवटीं मीं त्यांना सांगितलं, “ त्या बंगाली मुली कॉलेजविद्यार्थिनी आहेत आणि माझ्या कल्पनेप्रमाणें त्यांतल्या एकीचंहि लग्न झालेलं नाहीं. पण इकडे कुमारिका अथवा विवाहिताहि कपाळाला कुंकू लावतेच असं नाहीं. लग्नाची निशाणी म्हणजे इकडे भांगांत सिंदूर भरलेला असतो. आपल्याकडे ज्याप्रमाणें लग्नांत नवरा वधूच्या गळ्यांत मंगळसूत्र बांधतो त्याप्रमाणें इकडे नवऱ्याकडून भांगांत सिंदूर भरला जातो. मंगलसूत्र बांधण्याची प्रथा इकडे नाहीं. त्यामुळें मंगलसूत्र शोधूनहि मिळणार नाहीं आणि कुंकू असणं–नसणं यावरून कशाचाच बोध होणार नाहीं. ” आणि एवढं बोलून मी पुन्हा जोरजोरानें हंसूं लागलों. माझ्या हंसण्यांत तोहि सामील झाला.

## ती ‘ टिकली ’ आणि सौंदर्य

पण त्याला हंसतां हंसतां मात्र माझ्या मनांत आलं कीं अगदीं सुरवातीला माझ्याहि मनांत असाच गोंधळ झाला होता. मी जरी अशा निश्चित

निष्कर्षावर उडी मारली नव्हती तरीहि कुंकू न लावणाऱ्या तरुणींची संख्या एवढी प्रचंड कां याचें कोडें माझ्याहि मनाला पडलें होतें आणि इथली प्रथा पाहून थोडाबहुत सराव झाल्यानंतरहि मला अजून वाटतं कीं तेवढी छोटीशी ' टिकली ' नसल्यानं स्त्रीचेहेऱ्याच्या सौंदर्यांत कांहीं अंशीं उणीव आल्यावांचून रहात नाहीं. कदाचित् कुंकुमविरहित कपाळाचा दुर्दैवाशींच संबंध जोडायला शिकलेल्या असंज्ञ ( Subconscious ) मनाचाहि तो परिणाम असेल–कुणीं सांगावं ?

## सप्रयोग रंगीत तालीम

पण कुंकू आणि सौंदर्य यांच्यासंबंधींचे माझे हे विचार एकदां अपरिचित ठिकाणीं बोलल्यानें उडालेला घोटाळा मला आठवतो. उत्तर बिहारच्या दौऱ्यावर असतांना एका खेडवजा शहरीं एका बिहारी घरांत माझी उतरण्याची व्यवस्था झाली होती. सकाळच्या चहानंतर कशावरून तरी लग्नपद्धतीबद्दल बोलणें निघालें आणि मी, त्यावेळीं महाराष्ट्रीय आणि बिहारी लग्नरिवाजांची तुलना करतां करतां ओघाओघांत कुंकू आणि सुंदरता यावरहि बोललों. तो विषय तेथेंच संपला आणि आम्ही आपापल्या कामाला निघालों. आम्हां दोघांखेरीज कुणी तिकडे लक्ष दिलं असेल अशी माझी कल्पना नव्हती. पण दुपारीं जेव्हां झोपेंतून मी हंसण्याच्या आवाजानें जागा झालों तेव्हां उठण्यापूर्वी आळसावलेल्या नजरेनें मीं सभोवार पाहिलें. आंतल्या खोलीचें दार उघडेंच होतें आणि घरांतल्या स्त्रीसमाजाची बैठक तेथें भरलेली दिसत होती. ८।१० वर्षें वयाच्या एका मुलीच्या कपाळावर सिंदुराची एक टिकली लावून तिचा चेहरा जवळून, लांबून, चारी बाजूंनीं न्याहाळून पाहण्यांत आणि त्यावर न समजण्याजोग्या ' मैथिली ' बोलींत कांहींतरी चर्चा करण्यांत ती बैठक मग्न होती. लवकरच त्या साऱ्या गोष्टीचा अन् माझ्या सकाळच्या उद्गारांचा संबंध ध्यानांत यायला मला वेळ लागला नाहीं अन् मग मात्र अवघडल्यासारखं होऊन झोपेचें सोंग घेऊन मला तसेंच पडून रहावें लागलें.

## पांच वारी बंगाली साडी

आमच्या लहानपणीं पांच वारी साडीला बंगाली साडी म्हणण्यांत येई असें

मला आठवतें. आतां पांच वारी इतकी सर्वसामान्य झाली आहे कीं दुकानांत साड्या पहायला म्हणून गेलेल्या स्त्रीगि-हाईकांनाहि पहिल्यानें दुकानदार पांच वारीच साड्या दाखवितात. ही वस्तुस्थिति असली तरी त्या काळीं पांच वारी साडी हा एक नाविन्याचा, थोडाबहुत टीकेचा विषय होता. बंगाली क्रांतिकारक स्त्रियांच्या तेजस्वी व्यक्तित्वाची भुरळ आणि आकर्षण पडून ही 'फॅशन' दृढ झाली असेंहि कुणीतरी म्हटल्याचें आठवतें; आणि म्हणून जेव्हां पाटण्यांत बंगाली युवतींनीं नेसलेलीं वस्त्रें मीं पाहिलीं तेव्हां मला बरेंच आश्चर्य वाटलें. त्या साड्या पांच वारीच असाव्यात. मात्र नेसण्याची पद्धत महाराष्ट्रीय पद्धतीपेक्षां गुजराती पद्धतीला जास्त जुळणारी ( म्हणजे उजव्या खांद्यावरून पदर घेण्याची ) होती. स्वतःबद्दल गैरसमज होण्याच्या भीतीनें, बंगाली स्त्रियांची नेसण्याची पद्धतच बदलली कीं महाराष्ट्रांत जातां जातां त्या पद्धतींतच बदल झाला ह्याबद्दल संशोधन मात्र मीं केलेलें नाहीं. पण मला वाटतें सुटसुटीतपणाच्या आणि तरतरीतपणाच्या दृष्टीनें आपल्याकडची पद्धती जास्त सोईस्कर असावी. कारण गुजराथी अथवा बंगाली पद्धतींत दिसणारा भोंगळपणा त्यांत पहाणाऱ्याच्या दृष्टीला येत नाहीं.

## घट्ट बिहारी धोतरें

पुरुषांच्या पेहेरावाकडे पाहिलें तर एक गोष्ट चटकन् ध्यानांत येते. इकडे धोतर हा अगदीं एकमेव जनसाधारण पेहेराव आहे. त्यावर कुडता ( झब्बा ) घालण्याची पद्धत सामान्यपणें असली तरी शर्ट अथवा बुश शर्ट हेहि थोड्याबहुत प्रमाणांत आढळतात. पण सरकारी अधिकारी आणि कॉलेज विद्यार्थी यांखेरीज फुलॅपन्टचा प्रसार कमी आढळतो. पाटण्याबाहेर तर फुलॅपॅट मीं क्वचितच पाहिली. याहून जास्त प्रमाणांत लखनवी पायजमा ( चुरीदार ) वापरण्यांत आढळतो. मुसलमान समाजांत मात्र साध्या आणि लखनवी पायजम्याचें प्रमाण जास्त आहे. धोतरांतहि बिहारी आणि बंगाली पेहेरावांत फरक आढळतो. बंगाली पद्धतींत जास्त ढिलेपणा आणि पायघोळ-पणा आढळतो तर स्थानिक लोकांत धोतर थोडें घोट्याच्या वरच राहील आणि जास्त घट्टपणें नेसलें जाईल असें पहाण्यांत येतें.

## पीतवस्त्र आणि समानता

कुठल्याहि शुभ कार्यांचे वेळीं स्त्रिया आणि पुरुष दोघांतहि ' पीतांबर ' ( पिवळें वस्त्र ) नेसण्याची पद्धत जास्त प्रमाणांत रूढ आहे. लग्नकार्यांचे वेळीं, वधू-वर आणि दोघांचेहि आई-बाप, उपाध्याय वगैरे सर्वच जण पिवळें वस्त्र नेसतात. इतकेंच नव्हे तर आहेरादाखल नातेवाईक पुरुष मंडळींनाहि पिवळीं धोतरेंच वाटलीं जातात आणि दुसरें म्हणजे हीं पिवळीं वस्त्रें बाजारांतून सफेतच आणून घरींच हळदीच्या रंगानें रंगवलीं जातात. परिणामतः इतरांहून श्रीमंत, छानछोकीच्या आणि वरचढपणा सिद्ध करणाऱ्या वस्त्रप्रावरणांनीं नटून मिरवण्याचा स्त्रीस्वभाव कुठेंहि बदलत नसला तरी त्याला कांहीं अंशीं ह्या पीतांबर नेसण्याच्या आवश्यकतेमुळें पायबंद बसतो. कांहीं संस्कारांचे वेळीं उपस्थित राहणाऱ्यांना ' पीतवस्त्र ' असलेंच पाहिजे असा धार्मिक दंडक असल्यानें साऱ्या शालूंना आणि उंची वस्त्रांना थोडें दूर ठेवूनच या बाह्य समतेला स्त्रियांना देखील मान द्यावा लागतो. याहि-पलीकडे माझ्या मतानें सिद्धांतिक ( Theoretical ) फायदा हा होतो कीं साऱ्याजणी नटूनथटून जमतील तिथें मी काय नेसून जाऊं असा गरीब गृहिणीपुढें उभा राहणारा प्रश्न पिवळ्या साडीनें चटकन् सुटण्याजोगा आहे. प्रत्यक्षांत मात्र या फायद्याचा उपयोग कितपत केला जातो अथवा केला जाण्यांत काय व्यावहारिक अडचणी आहेत हें मला ठाऊक नाहीं.

## विज्ञानाचा आधार

पिवळा रंग आपल्या धर्मशास्त्रांत सर्वांपेक्षां जास्त पवित्र मानला गेला ह्याला कांहीं वैज्ञानिक कारण असलें तर तें मला माहीत नाहीं. नाहीं म्हणायला कुठेंतरी परदेशी शास्त्रज्ञांनीं केलेल्या प्रयोगाधारें डासांचा सर्वांत आवडता रंग हिरवा आणि नावडता पिवळा असल्याचें सिद्ध झाल्याचें वाचलेलें आठवतें आणि त्यावरून सर्वसाधारणपणें साऱ्याच कीटकजन्तूंपासून पिवळ्या रंगानें कमीजास्त प्रमाणांत सुरक्षितता निर्माण होत असावी असें वाटतें. पण दृष्टिसौंदर्याचा विचार करतां मात्र हा रंग डांसांप्रमाणें माणसांनाहि त्रासदायक वाटल्यावांचून रहात नाहीं असें वाटतें. निदान मला तरी एका लग्नाच्या मिरवणुकींतून चालणारा पिवळा जनसागर पहाण्यानें एक

प्रकारचा दूरीभाव व निरुत्साह ( Cold & Repulsive ) वाटला होता हें खास !

लग्नाकार्यांत मिळालेली पिवळी धोती तशीच वापरण्याची पद्धत अलीकडे नाहींशी होत आहे आणि मिळालेली धोती साधारणतः Bleach करूनच वापरली जाते असें मला चौकशी केल्यावर समजलें.

★

# ५ : नांवें, आडनांवें आणि जातीयता

बिहारी लोकांच्या नांवांत एक विशेषता ही असते कीं इकडे संपूर्ण नांव लिहितांनाहि त्यांत वडिलांचें नांव अंतर्भूत केलें जात नाहीं आणि त्यामुळें भिन्नप्रांतीय माणसाला एखाद्या 'एस्. एन्. शर्मा'चा भाऊ 'जे. पी. शर्मा' असल्याचें आढळून येऊन त्याचा चांगलाच गोंधळ उडाल्यावांचून राहत नाहीं.

## दोनांपेक्षां जास्त आद्याक्षरें

अगदीं प्रथम जेव्हां माझा असा गोंधळ उडाला ( आणि स्थानिक मित्रांच्या मदतीनें ह्या कोड्याचा अर्थहि लागला ) त्यावेळीं दक्षिणप्रांतीयांच्या नांवाच्या अशाच वैशिष्ट्यामुळें मुंबईंत उडालेला माझा गोंधळ आठवला. लहानपणीं जेव्हां प्रथमच मी मुंबईंत येऊन आमच्या एका नातेवाइकाकडे उतरलों होतों त्यावेळीं तेथें श्री. के. ए. एन्. अय्यर नांवाचे दक्षिणी गृहस्थ उतरले होते. त्यांच्या नांवांतील तीन आद्याक्षरांचें कोडें मला अनेक दिवस उलगडत नव्हतें. शेवटीं कुतूहल दडपणें अशक्य होऊन मीं ह्याबाबत विचारणा केली, तेव्हां त्यांच्या नांवांतील 'के.' हें अक्षर त्यांच्या गांवाचें निदर्शक आहे अशी माहिती मला मिळाली होती. त्यावेळीं मला ह्या गोष्टीचा अचंबा वाटला होता; एवढेंच नव्हे तर नाविन्याची भुरळ पडण्याच्या तत्कालीन मनोवृत्तीला अनुसरून आपल्या नांवाच्या आद्याक्षरांना जोडून

गांवाच्या नांवाचें अक्षर लिहिण्याचा छंदहि अनेक दिवसपर्यंत माझ्या हाताला जडला होता. दक्षिणी लोकांच्या ह्या वैशिष्ट्याची माहिती होई-पर्यंत कारणपरत्वें वृत्तपत्रांत वाचलेल्या श्री. व्ही. के. आर. व्ही. राव ह्या अर्थशास्त्रज्ञाच्या नांवांतील ‘ व्ही. के. आर. व्ही. ’ हीं अक्षरें म्हणजे राजेरजवाड्यांच्या नांवाला लागणाऱ्या जी. सी. आय्. ई., के. सी. आय्. ई. यासारखी एखादी उपाधि असावी अशी माझी प्रामाणिक कल्पना होती.

## वडिलांच्या नांवाला फांटा

ज्याप्रमाणें दक्षिणेंत आपल्या आणि वडिलांच्या नांवाबरोबरच गांवाचीहि आठवण ठेवण्याची पद्धत आहे त्याच्या उलट उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल आणि पूर्वेकडील इतर भाग यांत वडिलांच्या नांवाला फांटा देण्याची पद्धत आहे. परंतु जरी वडिलांचें नांव गाळलें जात असलें तरीहि नांवांत दोन आद्याक्षरें लिहिलीं जातात आणि तशीं लिहिणें शक्य व्हावें म्हणूनच कीं काय ज्याचे सुटसुटीत आणि अर्थपूर्ण दोन तुकडे पडूं शकतात अशींच नांवें येथें मुलामुलींना ठेवण्यांत येतात. मुलांना ठेवण्यांत येणाऱ्या नांवांत बिहारमध्यें ‘ प्रसाद ’ आणि ‘ नारायण ’ व मुलींच्या नांवांत ‘ बाला ’ आणि ‘ देवी ’ हीं अनु–पदें जास्त प्रमाणांत प्रचलित आहेत आणि त्यामुळें येथें पुरुषांच्या नांवांतील दुसरें आद्याक्षर हें सहसा ‘ पी ’ किंवा ‘ एन् ’ असायचेंच हा सर्वसाधारणपणें आढळणारा नियमच होऊन बसला आहे.

## डॉ. राजेंद्र आणि श्री. जयप्रकाश

बिहारी नांवांतील हें वैशिष्ट्य बिहारचे दोन अखिल भारतीय नेते डॉ. राजेंद्र प्रसाद आणि श्री. जयप्रकाश नारायण यांच्या नांवांत प्रकर्षानें प्रकट होतें. वास्तविक श्री. जयप्रकाश यांचें स्वतःचें नांव जयप्रकाश–नारायण एवढें सबंध असून ‘ श्रीवास्तव ’ हें त्यांचें आडनांव आहे. पण ह्याची कल्पना फारशी कोणाला नसल्यामुळें त्यांचें नांव जे. पी. नारायण असें पडलें आहे आणि त्यांनींहि तें तसेंच चालवलें आहे. श्री. जयप्रकाशां-प्रमाणेंच डॉ. राजेंद्र प्रसाद यांचेंहि आडनांव ‘ श्रीवास्तव ’ आहे. परंतु प्रांताबाहेर काय, पण प्रांतांतहि अनेकांना तें ठाऊक नाहीं.

## संपूर्ण सही

वर सर्वच आद्याक्षरें देतांना जो इंग्रजी अक्षरांचा उपयोग करण्यांत आला आहे त्याचें एक कारण म्हणजे बिहारांत नागरी लिपींत नांव लिहितांना वा सही करतांना आद्याक्षरें लिहिण्याची पद्धति नाहीं. त्यामुळें इंग्रजींत 'एस. के. सिन्हा' अथवा 'ए. एन्. सिन्हा' असें लिहिलेलें आढळलें तरी हिंदींत मात्र कटाक्षानें 'श्रीकृष्ण सिन्हा' आणि 'अनुग्रह नारायण सिन्हा' असेंच लिहिलें जातें. मी येथें आल्यानंतर देवनागरींतहि आद्याक्षरांनीं युक्त अशी सही करूं लागल्यानंतर अनेकांनीं त्याबद्दल नापसंती व्यक्त केली आणि कांहींनीं तर मला 'असंस्कृत' ठरवायलाहि मागेंपुढें पाहिलें नाहीं. पण बिहारी पद्धतीनें केवळ स्वतःचेंच नांव लिहिणें मनाला अप्रशस्त वाटल्यानें आणि स्वतःचें व वडिलांचें नांव आणि आडनांव एवढें सारें लिहायचें म्हणजे १४ अक्षरें लिहिण्यांत जागेचा अपव्यय, स्वतःला आणि वाचणाऱ्याला त्रास व आपल्या वेड्यावाकड्या हस्ताक्षराचें लांबलचक प्रदर्शन, ह्या साऱ्या गोष्टी करण्याची तयारी नसल्यानें मी त्याच पद्धतीला चिकटून राहिलों.

## बरा चोर पकडला

पण संवयीमुळें महाराष्ट्रीय व्यक्तीच्या मनांत एखाद्या नांवांतलें दुसरें आद्याक्षर हें वडिलांच्या नांवाचें निदर्शक असतें ही कल्पना जितकी दृढ झालेली असते तितकीच बिहारी माणसाच्या मनांत दोन्ही आद्याक्षरें हीं एकाच व्यक्तीच्या नांवाचीं आहेत अशी खात्री असते. परिणामतः जेव्हां जेव्हां मला कुणाच्या तरी पृच्छेवरून आपलें संपूर्ण नांव सांगण्याची पाळी येई व संवयीप्रमाणें मी महाराष्ट्रीय पद्धतीनें आपलें नांव सांगत असें तेव्हां माझें नांव अतिशयच लांब असल्याची टीका त्यावर होई. त्याहिपलीकडे एकदां एका छापखानेवाल्यानें माझ्यावर नांवाबाबत कांहींतरी गडबडगुंडा करीत असल्याचा आरोप केला होता. इकडे आल्यानंतर स्वतःच्या नांवाचीं 'व्हिजिटिंग कार्डस्' छापून घेण्यासाठीं गेलों असतां प्रथम आद्याक्षरांनीं युक्त असें नांव लिहून दिलें. पण कांहीं विचारानंतर व्यावसायिक फायद्याच्या दृष्टीनें आजकालच्या प्रांतीयतेच्या युगांत आपल्या परकीपणाची जाहिरात न

करणें इष्ट वाटून तें नांव बदलून केवळ स्वतःचें नांवच दिलें असतां माझ्या हालचालींचें निरीक्षण करीत असलेल्या छापखान्याच्या मालकानें, 'बरा चोर पकडला' अशा थाटांत मी नांव बदलून कांहीं संशयास्पद अवस्थेंत वावरत असल्याचा आरोप केला. अर्थात् त्या आरोपाला उत्तर देणें म्हणजे स्वतःच्या बदलेल्या विचारांना जाहीर करण्यासारखें असल्यामुळें मी केवळ हंसून तो विषय सोडून दिला आणि तो गृहस्थ मात्र अनेक दिवसपर्यंत ह्याच कल्पनेंत वावरत होता.

## 'आपट-बापट,' 'अणे-पै,' 'वाघ-कोल्हे' !

ज्याप्रमाणें व्यक्तींचीं नांवें लिहिण्यांत बिहारांत हें वैशिष्ट्य आहे त्याचप्रमाणें बिहारी आडनांवांतहि एक वेगळेंच वैशिष्ट्य आहे. येथील सर्व आडनांवें हीं जाती अथवा उपजातीवाचक असतात व त्यामुळें त्यांची संख्या अतिशय मर्यादित आहे. ब्राह्मणांत झा, शर्मा, मिश्र; कायस्थांत श्रीवास्तव, सहाय, सिन्हा, सक्सेना इत्यादि आणि इतर वर्गांत सिंह, सिंग वगैरे नांवें आढळतात आणि अशा ह्या मर्यादित आडनांवांमुळें, विपुल संख्येंत असलेल्या महाराष्ट्रीय आडनांवांबद्दल बिहारी लोकांना अतिशय कुतूहल वाटतें आणि महाराष्ट्राची–विशेषतः मुंबईची–वारी करून आलेल्या बिहारी माणसाला महाराष्ट्रीय लोकांत 'आपट-बापट,' 'अणे-पै,' 'वाघ-कोल्हे' येथपासून तों सहा सहा सात सात अक्षरीं गांवाच्या नांवांना 'कर' लावून बनविलेल्या आडनांवांची जंत्री सांगण्यांत आणि त्याची टिंगल उडविण्यांत कौतुकमिश्रित आश्चर्य वाटतें.

## जातीयतेला मदत

आडनांवांतील ह्या जातीविषयक वैशिष्ट्यानें बिहारांतील जातीयता कायम ठेवण्यांत मदतच केली आहे; आणि याचं उघड कारण हें आहे, कीं एखाद्या व्यक्तीचें नांव सांगणें अथवा लिहिणें म्हणजेच आपली जात जाहीर करणें असें होतें. साधारणपणें खेड्यांतच नव्हे तर शहरांतहि अद्याप जातीचें बंड बिहारांत मोठ्या प्रमाणावर आहे. आतां कायद्याच्या योगानें जी प्रगति प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्याचा प्रयत्न केला जात आहे तोहि

7829

या बाबतींतल्या मानसिक दडपणामुळें तितकासा फायदेशीर होऊं शकलेला नाहीं. अद्यापही खेड्यापाड्यांतून ब्राह्मणाचा " सरकार, " " मायबाप " आदि विशेषणांनीं आदरसत्कार होत असतो. एका मित्राबरोबर त्याच्या खेडेगांवीं गेलों असतांना त्याच्या हद्दींत शिरतांच त्याच्यावर " गोड लगीं सरकार "चा ( सरकार पायां पडतों ) वर्षाव आबालवृद्धांकडून सुरू झाल्याचें पाहून मला जितकें आश्चर्य वाटलें होतें तितकेंच एकदां कशावरून तरी प्रश्न निघाला असतां ' आज बिहारचें मंत्रीमंडळ कायस्थांच्या आधारानें उभें आहे ' असें सांगून, ' पक्षांत कावळा, पशूंत कोल्हा आणि माणसांत लाला ( कायस्थ ) ' अशा अर्थाचें एक सुभाषित म्हणून दाखविणाऱ्या कायस्थ व्यक्तीस पाहून वाटलें होतें.

जातिभेदांच्या बाबतींत बिहार अद्यापहि बऱ्याच अंशीं अतिशय जुनाट आणि अपरिवर्तनीय वाटतो. पण समाधानाची गोष्ट ही आहे कीं, अद्यापपर्यंत जातीजातींतील संबंध वैमनस्याचे अथवा जुलूम जबरदस्तीचे नसून गोडव्याचे आणि शान्तिसमाधानाचेच आहेत व सुदैवानें अद्याप बिहारी राजकारणास जातीयतेची कळा आलेली नाहीं. पण आतां हळूहळू ह्या दिशेनें खालच्या गणल्या जाणाऱ्या वर्गांचीं पावलें वळतांना दिसत आहेत.

## —आणि विरोध

एकंदरींत सर्वच बाबतींत बिहारांत विशेष मागासलेपणा आहे आणि त्याचे परिणाम बिहारला आजच्या जमान्यांत थोडेबहुत भोगावे लागत आहेत ही गोष्ट खरी असली तरी विचारवंतांचें लक्ष इळूहळू निरनिराळ्या भागांकडे वळत आहे हेंहि खरें आहे. मला वाटतें, कदाचित् डॉ. राजेंद्र प्रसाद व श्री. जयप्रकाश यांनीं आपलीं आडनांवें लिहिण्याचें सोडून देण्यामागें ही जातिभेदाची वाढ बंद करण्याचें धोरण असूं शकेल.

## वैमनस्याचें बीजारोपण

पण जातिविषयक अभिमान अतिशय तीव्र असलेल्या बिहार प्रांतांत प्रांतविषयक अहंकार मात्र फार कमी प्रमाणांत आढळतो. एका बाजूनें उत्तरप्रदेश आणि दुसऱ्या बाजूनें बंगाल यांचे सांस्कृतिक, शैक्षणिक आणि

सामाजिक विचारप्रवाहच विशेषतः बिहारच्या अनेक चळवळींच्या, योजनांच्या व हालचालींच्या मुळाशीं असतात आणि बिहार आपल्यावरील हें इतर प्रांतांचें अतिक्रमण वडिलांचें ऐकणाऱ्या लहान मुलाच्या आज्ञाधारकपणानें स्वीकार करीत असतो. परंतु गेल्या दोन–चार वर्षांच्या स्वातंत्र्योत्तर काळांत आंतरिक जागृतीमुळें वा प्रांतीयतेच्या भावनांच्या वाढीमुळें आज-काल मात्र बिहारी लोकांच्या मनांत बिहार–बंगाल अशा प्रकारचें वैमनस्य कांहीं प्रमाणांत आढळून येतें. पण 'शिवाजीच्या मराठ्यांबद्दल' मात्र सर्वसाधारण बिहारी लोकांतही असीम आदर, सहानुभूति आणि श्रद्धा मला जागोजागीं आढळली.

★

## ६ : सामाजिक गुणदोष

बिहारी जीवनांत आढळून येणारी एक वाञ्छनीय विशेषता म्हणजे सद्गुणाभिरुचि. महाराष्ट्रीय माणसाच्या सर्व सद्गुणांबद्दल योग्य आदर बाळगूनहि मी म्हणेन कीं सामाजिक सद्गुणांत बिहारी माणूस महाराष्ट्रीयापेक्षां वरचढ आहे.

आतिथ्यशीलता आणि स्त्रीविषयक ऋजुता हे बिहारी लोकांचे दोन गुण मीं यापूर्वी उल्लेखिलेले आहेतच. इतरहि गुणांबद्दल केवळ जंत्री देण्याऐवजीं प्रत्यक्षच कांहीं उदाहरणें दिलीं म्हणजे हें ठीक ध्यानांत येईल.

### 'गृहस्थी' लोक

साम्यवादी भाषेंत बोलायचें तर ह्याचें एक प्रमुख कारण म्हणजे बिहारांत आढळून येणारें जास्त प्रमाणांतलें आर्थिक स्थैर्य. 'गृहस्थी' करून राहणारे म्हणजे प्रत्यक्ष कांहीं व्यवसाय न करतां घरची शेतजमीन अथवा वतनवाडी सांभाळणारे आणि त्यावरच जीवन व्यतीत करणारे लोक बिहारांत मोठ्या प्रमाणांत आहेत. प्रथम प्रथम जेव्हां कुणाचा परिचय होण्याचा प्रसंग येई

तेव्हां हे 'गृहस्थी' करणारे लोक एवढ्या प्रमाणांत आढळत कीं त्यामुळें ह्या गृहस्थीचा ठीक अर्थ मला कळूं शकत नव्हता. पण जसजसें बिहारी जीवनाकडे जास्त जास्त जवळून पहाण्याचें भाग्य मला लाभलें तसतशी माझी अशी एक कल्पना होत चालली आहे कीं बिहारी सद्गुणांचीं बीजें कांहीं प्रमाणांत ह्या आर्थिक स्थैर्यांत आहेत.

## 'काव्यमय' आत्मा

अगदीं चट्कन डोळ्यांत भरणारी बिहारी जीवनाची एक विशेषता म्हणजे काविच्या रंगानें ठिकठिकाणीं चांगल्या अक्षरांत लिहिलेलीं सुभाषितें. अनेक संस्कृत ग्रंथांतलीं, वेदवाङ्मयापासून इतर सर्व धर्मग्रंथांतलीं त्याचप्रमाणें अगदीं अलीकडचीं गांधीजींच्या अहिंसा आणि हरिजनोद्धार यांची प्रशस्ति करणारीं हीं सुभाषितें मला मोठीं आकर्षक वाटलीं. प्रत्यक्ष सुभाषितापेक्षांहि त्यामागील श्रद्धा आणि सद्वृत्ति यांचें आकर्षण जास्त प्रमाणांत वाटतें. पाटण्यांत आंग्ल सुधारणांबरोबर ही प्रथा नष्टप्राय झाली असली तरी पाटण्याच्या बाहेर पडतांच उपनगरांपासूनच रंगविलेल्या ह्या भिंती दिसल्यावांचून रहात नाहींत. लिहिलेल्या सुभाषितांबाबत मला कळलें कीं गेल्या ४।५ वर्षांपूर्वींपर्यंत गांधीजींबद्दल सुभाषितें लिहिलीं गेलीं तरी तीं राजकीय लाथाळीपासून अलिप्त होतीं. पण गेल्या कांहीं वर्षांत मात्र राजकीय पक्षोपपक्षांचा प्रचार आणि अनेक व्यापारविषयक जाहिराती ह्यांनीं ह्या प्रथेला अतिशय विकृत स्वरूप आणलें आहे आणि त्यामुळें

सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात्, न ब्रूयात् सत्यमप्रियम् ।
प्रियं च नानृतं ब्रूयात् एष धर्मः सनातनः ॥

यासारख्या एखाद्या उच्च कोटीच्या सुभाषिताला लागूनच, 'खुजलीन' मलम वापरण्यापासूनचे फायदे सुभाषितमय स्वरूपांत वाचायला सांपडतात आणि त्यापलीकडे एकदोन भिंती टाकून समाजवादी आणि कॉंग्रेस यांची चरख्याला मत द्यावें कीं चक्राला यावरची संगीत आणि रंगीत चर्चा पहायला सांपडून मन उद्विग्न होतें. मात्र अजूनहि या सुभाषितांत आढळून येणारी एक स्तुत्य विशेषता म्हणजे त्यांतील शुद्धाशुद्धतेबद्दलची दक्षता! पाटण्याच्या भर चौकांत असलेल्या एकुलत्या एका सुभाषिताची

दयनीय अशुद्धता मीं पाहिली असली तरी सामान्यपणें सर्वच सुभाषितें-संस्कृतसुद्धां-शुद्ध लिहिलेलीं आढळतात. गद्य सुभाषितांचा तुटवडा नसला तरी पद्याकडे जास्त कल आढळतो. मग तें पद्य-

ट ला ट, प ला प। काव्य जुळे आपोआप ॥

अशा स्वरूपाचें असलें तरी चालतें. अशा स्वरूपाचें मीं पाहिलेलें आणि सहज लक्षांत राहिलेलें उदाहरण म्हणून

गांधीजीकी मानो बात।
हरिजन संग खावो भात॥

याकडे बोट दाखवितां येईल. यांतील राहिलेल्या सहाही ओळी 'आत' यमकानें संपणाऱ्या होत्या; आणि त्या तशा याव्या म्हणून, काव्याची, अर्थाची, गांधीजींच्या तत्त्वज्ञानाची साऱ्याच गोष्टींची कुतरओढ करण्यांत आली होती!

## हिंदुत्वाचे अभिमानी

बिहारी लोकांचा दुसरा एक सद्गुण म्हणजे हिंदुत्वाबद्दलची जास्त प्रमाणांत आढळणारी श्रद्धा! माझ्या एका परिचित व्यक्तीनें बिहारची ओळख मला Present day Citadel of Hindu Sanskriti म्हणून करून दिली होती. संस्कृतीच्या सर्व बाह्य आणि प्राथमिक लक्षणांबाबत तरी ही गोष्ट मला चटकन् मान्य झाली आणि माझें तें मत अद्याप कायम आहे. ज्या व्यक्तीचे उद्गार मीं दिले आहेत तिनेंच मला सांगितलें होतें कीं, बाहेरच्या सर्व प्रांतांत मिळून जेवढ्या संस्कृत पाठशाळा नाहींत तेवढ्या त्या एकट्या बिहारांत आहेत. यांतील अतिशयोक्तीचा भाग सोडून दिला तरी एक गोष्ट निर्विवाद आहे कीं संस्कृतचा प्रसार आणि आदर बिहारांत बराच जास्त आहे. केवळ संस्कृत शिकणारे कांहीं तरुण मला भेटले होते. एक 'धोरण' (Policy) म्हणून नव्हे तर संस्कृतच्या गौरवाबद्दल वाटणाऱ्या आदरानें ते संस्कृत शिकत असावे अशी त्यांच्याशीं चर्चा केल्यानंतर माझी कल्पना झाली.

७४११७ .. वि: निबंध
२०५३५ .. नों. दि. १६।३।८


### रूढींचा पगडा

पण हिंदु संस्कृतीच्या ह्या प्रेमामुळें कांहीं चांगल्या गोष्टींबरोबरच कांहीं वेडगळ चाली देखील बिहारी लोकांनीं स्वतःवर ओढवून घेतल्या आहेत. कुठल्याही गोष्टीचा अभिनिवेश चढल्यानंतर अथवा एखादी गोष्ट त्याचें रहस्य समजावून न घेतां केवळ परंपरागत आहे म्हणून आंधळेपणानें करीत गेल्यानंतर अनेक चांगल्या गोष्टींबरोबरच कांहीं आपत्तीहि ओढवणें अगदीं स्वाभाविक होत असतें आणि हेंच बिहारी लोकांचें झालें आहे. हिंदूंच्या परंपरागत इष्ट गोष्टींबरोबरच मध्ययुगांत रूढीभूत झालेल्या बालविवाहानें अद्यापही बिहारचा पिच्छा सोडलेला नाहीं. एका बिहारी लग्नाला मी गेलों होतों आणि वधूचें अतिशय लहान वाटणारें वय पाहून सोबतच्या एका दोस्ताला त्याबद्दल कांहींतरी म्हटलें. ह्यावर वधूचा भाऊ–जो आमच्या पूर्वपरिचयाचा होता–माझ्याकडे येऊन म्हणाला, “ खरं सांगायचं म्हणजे मुलगी अतिशय वाढली म्हणून आमच्या जातींत चर्चा चालली होती. पण अनेक कारणांनीं आम्ही अजून तिचें लग्न केलें नव्हतें. आतां मात्र उशीर झाला तर नवरा मुलगा चांगला मिळणं कठीण होईल ! ” अन् त्या मुलीचं हें मोठं वय म्हणजे सारं १४।१५ वर्षांचं असावं ! ह्याच गृहस्थाशीं बोलतांना मला कळलें कीं शहराव्यतिरिक्त इतर ठिकाणीं १४ वर्षांची वयाची मर्यादाही मुलीच्या विवाहांत कमीच पाळली जाते.

### स्त्री शिक्षणापासून अलिप्त

मला वाटतें ह्याचें एक कारण म्हणजे बिहारांत स्त्रीशिक्षणाचा अभाव हें असावें. स्त्रिया मागासलेल्या म्हणून शिक्षण नाहीं आणि शिक्षण नाहीं म्हणून मागासलेपणा कायम रहातो. असें हें परस्परावर अवलंबून असलेलें रहाटगाडगें असलें तरी हीहि गोष्ट निर्विवाद आहे कीं ज्या घरांतल्या मुलींना शिक्षण मिळत असतें त्यांचीं लग्नेंही साहजिकच लांबणीवर पडत जातात. बिहारांतल्या स्त्रीशिक्षणाच्या अडचणींची मर्यादा येथपर्यंत आहे कीं, पुरुषांच्या कॉलेजांची संख्या अवाढव्य असतांहि बिहारांत स्त्रियांचें केवळ एकच कॉलेज आहे. याहीपेक्षां उद्बोधक वाटणारी एक गोष्ट मीं पाहिली ती येथें देतों.

### पिंजऱ्यांतल्या स्त्रिया

पाटण्याहून सुमारें ५० मैलांवर असलेल्या बिहार शरीफ या व्यापारी केंद्राच्या ठिकाणीं ( ज्याची लोकवस्ती पाऊण लाखाहून कमी नसावी ) असलेल्या स्त्रियांच्या एकमेव हायस्कूलनें आपल्या विद्यार्थिनींना नेण्या-आणण्यासाठीं माणसांकडून ओढल्या जाणाऱ्या एका पिंजऱ्याची योजना केली आहे. सुमारें दहाबारा मुली मावतील असा हा पिंजरा रस्त्यांतून ओढला जात असतांना जेव्हां मीं पाहिला तेव्हां मला मोठें चमत्कारिक वाटलें. चारी बाजूंनीं वरपर्यंत लाकडी फळ्यांनीं झांकलेल्या त्या पिंजऱ्याच्या जाळींतून कांहीं १२।१३ वर्षांच्या मुलींच्या मानेवरचा भाग दिसत होता आणि त्या शाळेचे बिल्ले दिमाखानें मिरविणारे गणवेषांतले दोन चपराशी तो पिंजरा ओढीत होते. स्वतंत्र भारताच्या स्त्रीसमाजाच्या त्या प्रतिनिधींच्या चेहऱ्यावर कांहीं जिवंतपणा, कांहीं भावभावना, कांहीं शिक्षणाचें तेज, कांहींहि विचारविकार असावेत असें कांहीं मला वाटलें नाहीं. त्यानंतर माझ्या मनाला आलेली उद्विग्नता आणि चीड! जीवनाची, शिक्षणाची याहून जास्त तिरस्करणीय विदारणा कांहीं असूं शकेल का अशा प्रकारचे विचार अंतःकरणांत क्षोभ उत्पन्न करीत होते. पण माझ्या-बरोबर असलेल्या एकदोन बिहारी मित्रांनीं मी याकडे त्यांचें ध्यान आकृष्ट केल्यानंतरहि मामुली नापसंतीदर्शक शब्द उच्चारण्यापलीकडे फारशी दखल घेतली नाहीं.

बिहारांतला आणखी एक आढळलेला गुण म्हणजे सामान्यपणें जास्त प्रमाणांत आढळून येणारी बागबगीचे, फळें, फुलें यांची आवड. मुंबईत राहिलेल्या माझ्यासारख्या व्यक्तीनें निसर्गाच्या विविध सौंदर्याबद्दल नेहमींच आकर्षण आणि प्रेम बाळगलें असलें तरी तें सौंदर्य निर्माण करण्यासाठीं स्वतः कष्ट करण्याची प्रवृत्ति आपल्याकडे कमी प्रमाणांत आढळते; इतकेंच नव्हे, तर खुद्द मुंबईची गोष्ट सोडली तर बाहेरच्या विभागांतून सार्वजनिक बागबगीच्यांची दुर्दशा झालेली आढळते आणि तेथें काम करण्यासाठीं पैसे देऊन नेमलेले माळी सहसा ‘ चेअरमन ’साहेबांच्या घरींच जास्त आत्मीयतेनें लक्ष घालतांना आढळतो. हें विषयांतर सोडलें तरी सांगण्याचें तात्पर्य

निसर्गाच्या सौंदर्यानें आपलें आवार शृंगारण्याची आणि त्यासाठीं स्वतः कष्ट उपसण्याची प्रवृत्ति इकडे तुलनात्मक दृष्ट्या जास्त आहे. त्याबरोबरच निसर्गसौंदर्य फुलें आणि दिखाऊ झाडें यांतच असतें अशी संकुचित भावना न बाळगतां नीटनेटकेपणानें मंडपावर अगर घराच्या छपरावर चढवलेल्या भोपळ्याच्या अगर घेवड्याच्या वेलांतलें सौंदर्य जाणण्याची आणि त्याला प्राधान्य देण्याची वृत्ति मीं इकडे पाहिली आणि त्यानें खरोखरच भारला गेलों. मनांत आलें कीं महाराष्ट्रांतल्या जनतेनें Grow More Vegetables योजनेचा एक वेड म्हणून उपहास केला तर कृतिशील बिहारनें सामान्य योजनेचाही पद्धतशीरपणें पाठपुरावा केला असतां केवढें कार्य होऊं शकतें हें प्रत्यक्ष दाखवलें. उदाहरणच घेऊन बोलायचें तर पटन्यांत सेक्रेटरीएट कर्मचाऱ्यांसाठीं सरकारनें बांधलेल्या गर्दनीबाग क्वार्टर्स विभागांत बऱ्याच घरांसमोर वांगीं, पानकोबी, फुलकोबी, भेंड्या आदींच्या नीटनेटक्या बागा पाहिल्यानंतर बिहारी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर त्याचें चित्र मला खरोखरच अतिशय हृद्य आणि आकर्षक वाटलें.

*

## ७ : बिहारांतील सण

बिहारांत धार्मिकता बऱ्याच जास्त प्रमाणांत असल्याबद्दल, मला वाटतें, मी यापूर्वीं एकदां उल्लेख केलाच आहे. धर्मभोळेपणाच्या या पगड्याचें विशेष मोठ्या प्रमाणावरील स्वरूप हिंवाळ्याबरोबर सुरू होणाऱ्या सणांच्या युगामध्यें पहायला मिळालें. बिहारमध्यें सणांच्या भाऊगर्दीचा हा कालखंड दसऱ्याबरोबर सुरू होतो. नवरात्राचे पहिल्या दिवशीं अनेक सार्वजनिक ठिकाणीं व घरोघरीं घटस्थापना होतात व सार्वजनिक ठिकाणीं आरतीहि बऱ्याच धामधुमीनें केली जाते. अष्टमीचे दिवशीं सार्वजनिक ठिकाणीं कालीमातेच्या सौम्य मुद्रेंतील (रुंडमुंडमालासहित नव्हे) मूर्ती अनेक

ठिकाणीं बसविल्या जातात आणि महाराष्ट्रांतील गणेशोत्सवाप्रमाणें त्यांच्या-समोर अनेक कार्यक्रम सुरू होतात.

## काली ' मा 'च्या रम्य मूर्ती

मूर्तींच्या आणि त्याचबरोबर कार्यक्रमांच्या स्वरूपांत एक विशेषता पहाण्यांत आली. महाराष्ट्रांत आढळणारें, गणपतीला कॉलेज तरुणाचा, राजकीय पुढाऱ्याचा, प्रेमी तरुणाचा वेष देण्याचें वेड कालीच्या मूर्तीचे बाबतींत अद्याप मला कुठेंही आढळलें नाहीं. मूर्तीची मुद्रा, स्वरूप आदि ठराविक आणि आकारही बऱ्याच प्रमाणांत नियंत्रित असलेला पाहिल्यानंतर खरोखरच एक भाविकपणाचा स्पर्श, क्षणभर कां होईना, मनाला झाल्या-वांचून रहात नाहीं. विशेषतः भाविक आणि भावनावश अशा बंगाली कलेची बरीच छाप असल्यामुळें ह्या मूर्तींतील भावनांना हलविण्याचें सामर्थ्य विशेष असावें असें मला वाटलें. मुंबईची वारी करून आलेल्या आणि त्या दोनतीन दिवसांत माझ्या सान्निध्यांत आलेल्या एका मित्रानेंहि हेंच मत व्यक्त केलें. तो म्हणाला, " तुम्हांला खरें सांगूं ? मुंबईतल्या गणपतीच्या लहानमोठ्या साऱ्याच मूर्तींवर एक प्रकारचा बाजारीपणा आणि यांत्रिक सफाई पाहून मला थोडें वाईट वाटलें होतें. ह्या मूर्ती पहा ! कांहीं ओबडधोबड असल्या तरी ' मा 'चें ध्यान किती रम्य वाटतें ! " आणि तें खरेंहि आहे !

कार्यक्रमांतील विशेषता म्हणजे मुंबईपुण्याकडील गणेशोत्सवांप्रमाणें इथला पूजामहोत्सव अद्याप व्याख्यानबाजीच्या आणि राजकीय प्रचारांच्या फडांत रूपांतर पावलेला नाहीं. त्यांतील कार्यक्रम बव्हंशीं धार्मिक जागृति आणि शिक्षण अथवा करमणूक मनोरंजन ह्याच क्षेत्रांपुरते मर्यादित आहेत.

## कटुता नाहीं

राजकीय जीवनाचा महाराष्ट्रांत जाणवणारा, सामाजिक जीवनांतल्या प्रत्येक अंगांत भिनून वातावरण अधिक असहिष्णु, अधिक प्रस्फोटक आणि अभ्यासरहिततेच्या परिणामस्वरूप होणारा एककली बनविणारा परिणाम इकडील वातावरणाच्या पार्श्वभूमीवर विशेष चिन्ताजनक वाटतो. बिहारांत

अद्याप राजकारण बऱ्याच अंशीं जास्त प्रमाणांत मर्यादित आहे आणि सामाजिक, धार्मिक आणि कांहीं अंशीं आर्थिक प्रश्नहि राजकारणाऱ्या पक्षोपपक्षांच्या पलीकडे जाऊन एकात्मतेनें आणि गुण्यागोविंदानें सोडविण्याची पद्धती इकडे अद्याप तग धरून आहे. इंग्लंडमध्यें एकाच घरांत खेळीमेळीनें रहात असणाऱ्या कॅथॉलिक, प्रॉटेस्टंट, एपिस्कोपेलियन इत्यादि विभिन्न धार्मिक पक्षांच्या लोकांप्रमाणें बिहारांतही अनेक राजकीय मतप्रणालींचे नातेवाईक एकाच घरांत राजकीय भूमिकांमुळें कटुता निर्माण न होतां रहातांना आढळतात.

पण हें विषयांतर सोडून देऊन सणांकडे वळायचें तर या पूजामहोत्सवाची आणखी एक विशेषता ही आहे कीं, महाराष्ट्रांतील सार्वजनिक गणपतीपेक्षां येथील सार्वजनिक पूजांची संख्या बरीच मोठी व त्यामुळें कार्यक्रमांचें स्वरूप साधारणतः बरेंच रोडावलेलें आढळतें. कांहीं ठिकाणीं तर १५।१५ पावलांच्या अंतरावर ३।३ 'सार्वजनिक' मूर्ती एकाच रस्त्यावर आढळल्या !

## दिवाळीचे दोन दिवस

यानंतरचा दुसरा महत्त्वाचा सण म्हणजे दीपावली. इकडे हा सण विशेषतः व्यापाऱ्यांचा व शेतकऱ्यांचा मानला जातो. (वर्षप्रतिपदा ब्राह्मणांची, दसरा क्षत्रियांचा, दिवाळी वैश्यांची आणि होळी शूद्रांची असें इकडे समजतात.) दिवाळीचें एक वैशिष्ट्य म्हणजे घरोघरीं नव्या भाताच्या लाह्या आणि कुरमुरे यांचे ढीग करून आंतमध्यें विविध प्रकारची मिठाई व वर विविध मातीचीं भांडीं व चित्रें लावून सुशोभित करतात व असे मोठमोठे ढीग लहान मुलांकडून लुटवितात. इकडे दिवाळी दोनच दिवसांची असते. नर्कचतुर्दशीला 'छोटी दिवाळी' व अमावास्येला 'मोठी दिवाळी' म्हटलें जातें. दिवे लावण्याचा कार्यक्रम सार्वत्रिक असला तरी दीपावलीदेवीच्या मूर्तीचें पूजन व इतर समारंभ मात्र वरील वर्गांतच होतात. अनेक ठिकाणीं गोपाळकाल्याच्या दिवशीं नाचणाऱ्या बाल्यांप्रमाणेंच इकडील घरकामाचे नोकर व इतर खालचा वर्ग सार्वजनिक ठिकाणीं दांडपट्टा, लाठी,

जळतें चक्र आदि प्रयोग करून दाखवीत असतात. अभ्यंगस्नान, इष्ट-मित्रांना फराळाचीं निमंत्रणें इत्यादि प्रथा इकडे नाहींत.

'छट्'चें व्रत व 'ठिकव्या'

यानंतर येणारा व भारतांत बिहारबाहेर कुठेंहि न आढळणारा सार्वत्रिक उत्सव म्हणजे 'छट्'चें व्रत! दीपावालीनंतरचे षष्ठीस (म्हणजे कार्तिक शुद्ध षष्ठीस) हें व्रत केलें जातें. चतुर्थीपासून दोन दिवस एकभुक्त राहून रात्रौ ठराविक पदार्थ खाल्ले जातात. षष्ठीचे दिवशीं उपवास करून संध्याकाळीं सामुदायिकपणें जलाशयावर वाजत गाजत जाऊन स्नान, होम आदि विधि करून नंतर मावळत्या सूर्याला दीप, नवीं फळें, धान्य व गव्हांपासून केलेला 'ठिकव्या' नांवाचा शंकरपाळ्यासारखा पदार्थ यांचा नैवेद्य नव्या बांबूच्या सुपांतून दाखवण्यांत येतो. ठिकव्या हा पदार्थ व्रत करणाऱ्या माणसानें भिजवलेले गहूं आपण स्वतः वांटून त्यांत साखर घालून जाड पुऱ्यांप्रमाणें बनवून त्याला वेगवेगळे आकार व नक्षीपत्रें देऊन बनवतात.

या छट्चे निमित्तानें एक विशेष गोष्ट मीं पाहिली; आणि ती म्हणजे बिहारांत सर्वत्र धार्मिक कार्यांतहि सनईऐवजीं परदेशी बिगुलासारख्याच दिसणाऱ्या पण ३।४ keys असणाऱ्या एका पितळी वाद्याचा उपयोग केला जातो. छट्चे दिवशीं माझ्या एका मित्राबरोबर त्याच्या मोटर सायकलवरून पाटण्यापासून ३०।३२ मैल असलेल्या त्याच्या गांवीं जाण्याचा प्रसंग आला. रस्त्यापैकीं सुमारें १०।१२ मैल लांबीचा भाग सोन नदीच्या कालव्याचे किनाऱ्यानें जात होता; आणि संध्याकाळचे वेळीं मोटर सायकलनें जात असतां ह्या दहा बारा मैलांपैकीं प्रत्येक अर्ध्या मैलावर व्रतानिमित्त स्नान, नैवेद्य-दान आदि कार्यक्रमांत गुंतलेल्या एक एका खेड्याच्या लोकांना पहाण्याचा प्रसंग आला. खेड्यांतील त्या वादकवृंदांतहि मला सनईऐवजीं प्रत्येक ठिकाणीं तें बिगुलसारखें वाद्य आढळलें. परकीय म्हणूनच नव्हे तर आवाजाच्या दृष्टीनेंहि तें वाद्य धार्मिक प्रसंगीं वाजविलें जाण्यासाठीं मला योग्य वाटलें नाहीं. धार्मिक कार्यक्रमांची साथ करणारे आपले ते विशिष्ट परंपरागत दीर्घ आणि सौम्य उत्तेजना देणारे आलाप सनईऐवजीं

त्या वाद्यांतून ऐकतांना ग्रामोफोनच्या तबकडीवर ऐकलेल्या हिराबाईच्या चार मिनिटें चालणाऱ्या ठुंबरीचे वेळीं होणारी रसपरिपोषहीनतेची आणि कृत्रिमतेची जाणीव झाल्यावांचून रहात नाहीं. बिहारसारख्या बऱ्याचशा गोष्टींत परंपरागतपणा आणि जुन्यांतील निष्ठा यांना चिकटून असलेल्या त्या भागाच्या खेड्यांतही सनईसारख्या गंभीर, मधुर आणि वातावरण भारून टाकणाऱ्या वाद्याऐवजीं हें कठोर, कर्कश आणि हलकें वाद्य कोठून शिरलें असावें हा प्रश्न माझ्या मनाला त्या संध्याकाळीं सारखा सतावीत होता.

षष्ठीप्रमाणेंच सप्तमीचे दिवशीं सकाळींहि स्नान, अर्ध्यदान आणि सूर्यपूजन होतें आणि हें व्रत समाप्त होतें. सप्तमीचे निमित्तानें आपापल्या इष्टमित्रांकडे आणि नातेवाईकांकडे ठिकव्यांचा प्रसाद पाठविला जातो. अद्यापहि बिहारांतल्या अर्ध्याहून जास्त घरांतील स्त्रीपुरुषांपैकीं कोणी ना कोणी हें व्रत करीत असल्यामुळें ह्या देवाणघेवाणीचें स्वरूप फार प्रचंड असतें. विशेषत: मी ज्या मित्राबरोबर त्याच्या गांवीं गेलों होतों तो तेथील जमीनदार असल्यामुळें त्याच्याबरोबर जेथें जावें तेथें ह्या ठिकव्यांना तोंड देतां देतां इतर कांहींहि तोंडांत घालण्याची फुरसत अथवा इच्छा दोन दिवसपर्यंत राहिली नाहीं.

## कार्तिकांतील गंगास्नान

छट्नंतरचें वैशिष्ट्यपूर्ण व्रत म्हणजे कार्तिक पौर्णिमेचें गंगास्नान! अतिशय थंडी असूनहि संपूर्ण कार्तिक महिनाभर सकाळींच गंगापूजन आणि गंगास्नान करणारे अनेक धर्मनिष्ठ, नाशिकला कार्तिकस्नान करण्यासाठीं जाणाऱ्या व रहाणाऱ्या लोकांप्रमाणें, इकडेहि आहेत. पण पौर्णिमेच्या दिवशीं इकडे होणारी स्नानाची गर्दी कांहीं औरच असते! उदाहरणच घ्यायचें झालें तर गजेंद्रमोक्षाच्या स्थानासाठीं प्रसिद्ध असलेल्या गंडकी व गंगेच्या संगमावरील सोनपूर ह्या २५००० हून कमी वस्तीच्या गांवीं त्या दिवशीं जवळ जवळ ५ लाख लोकांनीं पवित्र स्नान केलें. पाटण्यांत पहांटे २॥-३ वाजल्यापासूनच स्नान करणाऱ्यांची गर्दी सर्व घाटांवर चालू होती व ती दुपारीं १। वाजेपर्यंत संपली नाहीं आणि आजूबाजूच्या असंख्य खेड्यांतून लोक बैलगाड्या, टमटम, मोटार बसेस, ट्रक आणि रेलगाड्या

इतक्या साधनांनीं येत होते. गंगेच्या कांठावरून जाणाऱ्या रस्त्याला बाजाराचें स्वरूप आलें होतें आणि भाविकतेच्या वातावरणांत तल्लीन झालेल्या त्या जनसागरास गारठविणाऱ्या थंडीचें, गर्दी काबूंत ठेवूं पाहणाऱ्या पोलिसांच्या वेतांचें, तहानभुकेचें, देहधर्मांचें कशाचेंच भान उरलें नव्हतें !

★

## ८ : बिहारी क्षेत्रें

अगदीं पुरातन काळापासून बिहारची भूमि भारतीय संस्कृतीशीं व भारताच्या एकंदर जीवनांतील जवळ जवळ सर्वच चढउतारांशीं अतिशय निगडित राहिली आहे. आणि अनेक धार्मिक उलटापालटी, नवनवीन मतें आणि त्यांचें खंडन ह्या गोष्टींनीं ह्या प्रान्ताचा एक ना एक कोना सदैव दुमदुमतच राहिला आहे.

### आर्यांचें मूलस्थान

अतिशय पुरातन काळापासूनच्या बिहारच्या इतिहासाचें विहंगावलोकन केलें तर भारतीय संस्कृतीच्या इतिहासाचें रेखाबद्ध प्रतिबिंब त्यांत दिसल्यावांचून रहात नाहीं. अगदीं प्रारंभाबद्दल बोलायचें तर बिहार हा लोकमान्य टिळकांनीं आपल्या Orion ह्या ग्रंथांत प्रतिपादन केलेला आर्यांचा मूलप्रदेश उत्तरध्रुव आहे. आपली ही मूलभूमी सोडून जगभर पसरण्यापूर्वी आर्यांनीं ह्याच प्रदेशांत असंख्य वर्षे आपलें संघजीवन व्यतीत केलें, आपल्या चिरंतन तत्त्वज्ञानाची आणि संस्कृतीची रूपरेखा निर्माण केली आणि तेथूनच शेवटीं जगाला सुसंस्कृत करण्याच्या, आर्य करण्याच्या मनीषेनें, ‘ कृण्वन्तो विश्वमार्यम् ’च्या प्रतिज्ञेनें त्यांनीं आपली ही मूलभूमि सोडून अन्यत्र पसरण्यास सुरुवात केली. अद्वितीय अक्षर वाङ्मय–चतुर्वेद–यांचीही रचना बिहारमध्येंच झाली असावी असें बिहारी लोक मोठ्या आग्रहानें प्रतिपादन करतात आणि मला वाटतें, अशाच प्रकारचे विचार लोकमान्यांनींही आपल्या ग्रंथांत प्रसिद्ध केले आहेत.

रामायणकालाशींही विहारचा प्रत्यक्ष संबंध राहिलेला आहे. जनक राजाची राजधानी मिथिला नगरी, सीता ज्या ठिकाणीं नांगराच्या फाळाबरोबर वर आली तें स्थान-जनकपूर, ज्या आश्रमांतील यज्ञांना होणारा असुरांचा त्रास टाळण्यासाठीं स्वतः राम-लक्ष्मण विश्वामित्राबरोबर आले होते तो विश्वामित्राचा आश्रम, अहिल्योद्धाराचें स्थान आदि रामांच्या आयुष्यांतील ह्या घटनांचीं सर्वच स्थळें बिहारांतच आहेत; आणि हिंदूंच्या विभूतिपूजक स्वभावानुसार या प्रत्येक ठिकाणीं वर्षांतील एक एक दिवस यात्रा चालतात. विवाहमंडपांत-म्हणजे रामाचा ज्या ठिकाणीं विवाह झाला त्या स्थळीं-तर १५ दिवसांचा मेळा चालतो.

## बिहारी मेळे व हत्तींचा बाजार

बिहारी मेळ्यांचें एक अभिनव वैशिष्ट्य आहे. हे मेळे म्हणजे अद्यापहि बऱ्याच अंशीं स्वयंपूर्ण असलेल्या बिहारी खेड्यांतील खेडुतांना हौसमौज करण्याचे आणि आपापल्या वार्षिक गरजांप्रमाणें खरेदी-विक्री करण्याचे प्रसंग असतात. कुठल्या ना कुठल्या तरी नदीच्या वाळवंटांत हे मेळे लागतात आणि त्यांचा विस्तार कधीं कधीं दोन अडीच चौरस मैलांहूनहि जास्त असतो. गजेंद्रमोक्षाचें स्थान म्हणून प्रसिद्ध असलेलें सोनपूर, रामविवाहाचें स्थान असलेलें जनकपूरनजीकचें स्थळ, मोंगल कारकीर्दींत विशेष पुढें आलेलें पूर्णिया अशा एकूण ५।६ ठिकाणीं हे मेळे चालतात; आणि त्यांत नेपाळ, छोटा नागपूर, आसाम, ओरिसा, बंगाल सर्वच ठिकाणांहून वैशिष्ट्यपूर्ण यात्री येत असतात. गुरांचा बाजारहि मोठा चालतो आणि त्याहूनहि मजेची गोष्ट म्हणजे ह्या मेळ्यांत हत्तींचा बाजार असतो.

बिहारांत जेवढे हत्ती आहेत, तेवढे मला वाटतें, बाकी साऱ्या भारतांत नसतील. सोनपूर मेळ्याच्या ठिकाणीं अगदीं २१ दिवसांच्या हत्तीच्या बछड्यापासून तों १०० वर्षांवर जगलेल्या आणि जवळ जवळ ४-४॥ फूट सुळे असलेल्या प्रचंड हत्तीपर्यंत सुमारें ८०० ते ९०० हत्ती मीं स्वतःच पाहिले आहेत. बिहारांतील सर्वांत समृद्ध मैथिली विभागांत तर प्रत्येक जमिनदाराकडे शौक म्हणून २।४ हत्ती बाळगलेले असतात. हा हत्तींचा

बाजार प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय त्यांतील वैशिष्ट्याची पूर्ण कल्पना येणें फार कठीण आहे.

## जरासंधाचा खजिना

रामायणकाळापासून महाभारतकाळाकडे वळलें तर मथुरेवर १७ वेळां स्वारी करून श्रीकृष्णाला सतावणाऱ्या आणि अखेरीस पश्चिम समुद्रांत द्वारकेची स्थापना करण्यास भाग पाडणाऱ्या जरासंधाची राजधानी राजगृह ऊर्फ राजगीर हीहि बिहारांत आहे. चारी बाजूंस पसरलेल्या नैसर्गिक पहाडांत वसलेलें हें छोटेसें शहर अनेक गोष्टींसाठीं प्रसिद्ध आहे आणि तें बिहारला भेट देणाऱ्या फिरत्या प्रवाशांचें सर्वांत मोठें केंद्र आहे. ‘ जरासंधाचा खजिना ’ ह्या नांवानें प्रसिद्ध असलेली एक प्रचंड गुहा येथें आहे. नैसर्गिक पत्थरांत ही गुहा खोदून काढलेली असून तिचें दार एका प्रचंड एकसंधी दगडाचेंच आहे–सध्यां बंद आहे. १९ व्या शतकांत बिहारवर कबजा केल्यानंतर इंग्रजांनीं हें दार फोडून आंतील खजिन्याचा शोध लावण्यासाठीं जंग जंग पछाडलें होतें आणि बाकी सर्व प्रयत्न थकल्यावर तोफांच्या गोळ्यांनीं व सुरुंग लावून हे खडक फोडण्याची खटपट केली होती. पण तीहि अयशस्वी ठरली आणि आतां ह्या गुहेंतील भिंतींवर तोफांच्या गोळ्यांनीं व सुरुंगांनीं खडकाचे कपचे उडविल्याच्या खुणाच फक्त शिल्लक आहेत.

ज्या ठिकाणीं भीमानें मल्लयुद्धांत जरासंधाचा वध केला होता तो ‘ जरासंधाचा आखाडा ’ ह्या नांवानें प्रसिद्ध असलेला भागहि वैशिष्ट्यपूर्ण आहे. बाकी सर्व राजगिरची माती लाल असली तरी केवळ ह्या आखाड्यां-तील माती शुभ्र आहे आणि तिला एक विशेष मऊपणाहि अद्याप शिल्लक आहे.

## राजगीरचीं कुंडें

बौद्धधर्मीयांचें यात्रास्थान म्हणूनहि राजगीर प्रसिद्ध आहे. आत्मज्ञान झाल्यावर भगवान् बुद्धानें आपल्या धर्मप्रचाराला येथूनच प्रारंभ केला होता आणि त्यामुळें बौद्धधर्मीयांच्या दृष्टीनें ह्या स्थळाला आंतरराष्ट्रीय महत्त्व

आहे. बौद्धांचे अगणित विहार येथें आहेत आणि त्यांत चीन, जपान, ब्रह्मदेश, सयाम, सिलोन या देशांतील भक्तांनीं आपापल्या पद्धतीप्रमाणें बांधलेलें एक एक देवालय ( " बौद्धालय " ) आहे.

याशिवाय नैसर्गिक उष्ण झऱ्यांचें स्थान म्हणून राजगिरला फार महत्त्व आहे. अशीं जवळजवळ ५० हून जास्त कुंडें राजगीरला आहेत आणि त्या पाण्यांतील औषधी गुणधर्मामुळें सर्व त्वचारोग व त्याशिवाय हृदयाचे, डोक्याचे वगैरे कांहीं रोग बरे होत असल्यानें ह्या ठिकाणीं जलोपचाराकरितां येऊन राहणाऱ्या लोकांची नेहमींच गर्दी असते. सर्वांत प्रसिद्ध असलेल्या ब्रह्मकुंडावर तर जवळ जवळ पहांटे ४ पासून रात्रौ आठ नऊ वाजेपर्यंत सारखें स्नान चालू असतें.

## नालंदा-विश्वविद्यालय

आपल्या प्राचीन इतिहासांतील आणखी एक गौरवस्थान 'नालंदा' हेंहि बिहारांत आहे. या ठिकाणीं भारत सरकारनें केलेल्या उत्खननावरून तज्ज्ञांनीं असें मत दिलें आहे कीं नालंदांतील विविध नगररचना एकाच काळच्या नसून बुद्धपूर्व कालापासून तों ख्रिस्तोत्तर ७ व्या शतकापर्यंतच्या बांधकामाचे नमुने त्यांत आढळतात व त्यावरून नालंदा येथें अनेक वेळां विश्वविद्यालयें निर्माण झालीं, कालाच्या प्रवाहांत तीं विलीन झालीं आणि त्यांच्या उध्वस्त अवशेषांवर नवीन नालंदा निर्माण होत राहिलें—अशी ही परंपराच असावी असा निष्कर्ष काढण्यांत आला आहे. नालंदा येथील सर्वच उत्खनन पाहण्यासारखें आहे. अतिशय सुव्यवस्थित रीतीनें आणि एकाच परिमाणानें बांधलेलीं विद्यार्थ्यांचीं वसतिगृहें ( Hostels ), पाठशाला, एकांतयुक्त अशा स्वतंत्र चिंतनशाला आणि ह्या सर्वांवर असंख्य आकृत्यांची, मूर्तींची व नक्षीपत्रीची सजावट, प्रमाणबद्ध व आंखीव अष्टकोनी विहिरी आणि पायऱ्या, समाधींवरील प्रतीकें आणि चिन्हें, यांची ह्या ठिकाणीं मोठ्या प्रमाणावर रेलचेल आहे. पण मला येथें सर्वांत जास्त आकर्षक जर वाटलें असेल तर तें म्हणजे पद्मासन घालून बसलेल्या बुद्धाच्या मातीच्या मूर्ती. किमान १० फूट उंच असलेल्या ह्या केवळ मातीच्या

मूर्तींची झिलई अद्याप कायम आहे आणि त्यांचा रेखीवपणाहि दृष्ट लागण्या-सारखा आहे.

तज्ज्ञांच्या अंदाजाप्रमाणें नालंदाचा एकूण विस्तार ४ चौरस मैलांहून अधिक असावा. ह्या सर्व नगराभोंवतीं सुमारें पाऊणशें तलाव होते आणि त्यांतील बहुतेक आतां बुजले असले तरी क्वचित् कांहीं तलाव कमलपुष्पांनीं भरलेले अद्यापहि शिल्लक आहेत.

त्यानंतरच्या कालखंडाकडे वळायचें तर, ज्याच्या अस्तित्वाबद्दल आणि ग्रंथरचनेबद्दल प्रत्यक्ष पुरावा उपलब्ध आहे असा भारताचा पहिला गणित आणि खगोलशास्त्रज्ञ बिहारचाच असल्याचें बिहारी लोक प्रतिपादन करतात. आर्यभट्ट या नांवानें प्रसिद्ध असलेल्या ह्या गणिताचार्यानें आर्यभट्टी नांवाच्या आपल्या ग्रंथांत स्वतःच्या गांवाचें नांव कुसुमपूर असल्याचें लिहिलें आहे. सध्यां बिहारची राजधानी असलेल्या पाटण्याचें एका काळचें नांव कुसुमपूर असल्यामुळें कांहीं बिहारी विद्वानांनीं ग्रंथ लिहून नालंदा विश्वविद्यालयांत अध्यापनकार्य करणारा आर्यभट्ट हा दक्षिणेंत मद्रासकडे असलेल्या कुसुमपूरचा नसून बिहारांतल्या कुसुमपूरचा ( हल्लींचें पाटणा ) होता असें सिद्ध करण्याचे प्रयत्न अनेकवार केले आहेत.

★

## ९ : साहित्य आणि पत्रकारिता

शिक्षणविषयक मागासलेपणा आणि स्वतंत्र भाषेचा अभाव यामुळें बिहारी साहित्य अतिशय कमी आहे आणि जें साहित्य आहे तेंहि कांहीं अंशीं खुरटलेलें वाटतें. अर्थात् या माझ्या विधानास कांहीं अभिमानास्पद अपवाद आहेत आणि बिहारचें नांव हिन्दीच्या जगतांत उज्ज्वल करणारे आचार्य श्री. शिवपूजन सहाय, श्री. रामवृक्ष बेनीपुरी, श्री. रामधारी सिंह, ' दिनकर, ' इत्यादि कांहीं बोटांवर मोजण्याइतक्या साहित्यिकांमुळें बिहारला साहित्यप्रांतांत थोडें ना थोडें स्थान शिल्लक आहे.

## नव्या पिढीची आघाडी

'स्वतंत्र भाषेचा अभाव' असें बिहारच्या साहित्यविषयक कमतरतेचें विश्लेषण केलें त्याचा रोख उत्तर प्रदेश, मध्यभारत, महाकोशल, दिल्ली, अजमेर आदि प्रांत व बिहार यांना सामान्य असलेल्या हिंदी भाषेला उद्देशून आहे, ही गोष्ट, मला वाटतें, स्पष्ट करण्याची आवश्यकता नाहीं. सर्वसाधारणपणें पहातां चालू शतकांतील हिन्दी साहित्य चांगलेंच समृद्ध असल्यामुळें व बिहार हा प्रांत शिक्षणान्तर्गत अशा सर्वच प्रदेशांत मागें असल्यामुळें बिहारला चालू पिढीपर्यंत स्वतःचें असें साहित्य नव्हतें असें म्हटलें तरी चालेल. शिवाय बिहारांत मासिकें, साप्ताहिकें आदि साहित्याचीं प्राथमिक वाहनें फारशी नसल्यामुळें व बिहारचा वाचकवर्गही अतिशय कमी असल्यामुळें आतांपर्यंतच्या काळांत साहित्यनिर्मितीची पात्रता असणाऱ्या अनेक लोकांना योग्य प्रोत्साहनाच्या अभावीं आपल्या प्रतिभेवर पाणी सोडावें लागलें असावें, असें नवीन पिढींत दिसून येणाऱ्या साहित्याभिरुचि आणि पात्रतेवरून वाटतें.

## प्रथितयश साहित्यिक

चालू पिढींतील वर नामनिर्देश केलेल्या साहित्यिकांपैकीं पहिले श्री. शिवपूजन सहाय हे अतिशय वास्तववादी आणि हृदयस्पर्शी कथा लिहिण्याबद्दल प्रसिद्ध आहेत. त्यांचें लेखन साधारणतः गंभीर प्रवृत्तीचें असतें व अतिशय क्लिष्ट व गंभीर विषयावरही साध्या सोप्या भाषेंतून विवेचन करण्याबद्दल ते प्रसिद्ध आहेत. दुसरे श्री. बेनीपुरी हे एक चांगले कवि आणि लेखक असून जनसाहित्याकडे त्यांचा विशेष ओढा आहे तर श्री. दिनकर यांची प्रतिभा चतुरस्र असून तिचा साहित्यपूर्ण भावाविष्कार कवितावाटे होत असतो. बिहारांतीलच नव्हे तर साऱ्या हिन्दी साहित्य जगतांतील कवितावाङ्मयाशीं संबंधित अशीं अनेक बक्षिसें व मान त्यांना अनाहूतपणें मिळाले आहेत.

## भरपूर कविसंमेलनें

एकंदरींत पहातां साहित्याची आस्था वा प्रेम बिहारांत कमी असलें तरी त्यांतल्या त्यांत विशेष ओढा व प्रेम कवितेकडेच आहे. लहानमोठ्या

प्रसंगांचें निमित्त करून कविसंमेलनें भरवून नवनवीन कवींचें काव्यगायन, काव्यचर्चा आदि घडविणें हें बिहारमध्यें प्रत्येक ठिकाणीं दिसून येतें. महाराष्ट्रापेक्षां इकडे कवींना समाजांत जास्त प्रमाणांत मान्यता दिसते आणि कविसंमेलनांच्या प्रथेमुळें उदयोन्मुख कवींना सोप्या आणि सरळ मार्गानें जनतेसमोर आणि रसिकांसमोर येऊन आपल्या काव्याचें रसग्रहण करवून घेण्याची, आत्मपरीक्षणाची आणि सुधारणेची संधि मिळते असें मला वाटतें. ह्या प्रथेचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम म्हणूनच कीं काय नव्या पिढींतील बिहारी साहित्यिकांपैकीं बहुसंख्याकांनीं काव्याच्या प्रांताकडे आपलें लक्ष बऱ्याच जास्त प्रमाणावर केंद्रित केलेलें दिसतें.

## ‘कविता’ आणि ‘गीत’

काव्याचे इकडे अगदीं स्पष्ट असे वेगवेगळे दोन विभाग पाडण्यांत येतात. एक जें गेय असतें त्याला ‘गीत’ म्हणतात, आणि लयबद्ध, नाद-मधुर आणि उत्तुंग कल्पनाशक्तीचा अवखळ विलास चित्रित करणाऱ्या पण गाण्यासाठीं लागणाऱ्या बंधनांच्या चौकटींत न बसणाऱ्या काव्याला ‘कविता’ म्हणून ओळखलें जातें. त्यामुळें हिंदी साहित्याच्या या प्रांतांत ‘कवितावाचन’ आणि ‘गीतगान’ अशा प्रकारचे दोन्ही प्रयोग दिसतात. फरकच करायचा म्हटलें तर, माझ्या अनुभवावरून मला असें वाटतें कीं आवेशपूर्ण आणि नाट्ययुक्त आवाजांत समुचित हावभावांनीं केलेल्या कवितावाचनाची छाप श्रोतृवर्गावर गीतगानापेक्षां अधिक पडते. अर्थात् अनेक वेळां गीतेंहि, त्यांत वर्ण्यविषयापेक्षां भावनांचा आणि कल्पनांचा विलास जास्त प्रमाणांत असेल तर कवितेप्रमाणेंच म्हटलीं जातात.

## काव्यांत जोरकसपणा नाहीं

बंगालच्या सान्निध्यामुळें आणि प्राकृतिक कारणांचा परिपाक म्हणून बिहारी साहित्यिकांच्या ठिकाणीं भावनांचा सूक्ष्मपणा आणि उत्तुंगता इतक्या जास्त प्रमाणांत वाटतें कीं, बाहेरील माणसाला कधींकधीं त्यांत मानसिक समतोलाचा ( Equilibrium ) अभाव असल्याचा संशय येतो. अनेक वेळां काव्यांतील भावना आणि त्यांच्या आविष्करणाची पद्धति स्त्रीसुलभ वाटतात

आणि अशा गीतांना आणि कवितांना इकडे जास्त मान मिळतो. युद्धांतील रक्तपाताला विटून बौद्धधर्म स्वीकारणाऱ्या अशोकाच्या शांतताप्रिय आणि संहारापासून दूर जाण्याच्या मनोवृत्तीची छाप साहित्यावर आणि विशेषतः काव्यावर पडलेली आढळते आणि त्यामुळें १९४२ च्या स्वातंत्र्यसंगराचें अथवा दुसऱ्याहि अनेक शौर्यप्रसंगांचें वर्णन करणारें साहित्य, निसर्गसौंदर्याचें अथवा मृदु भावनांचें वर्णन करणाऱ्या साहित्याइतकें रसरशीत आणि जिवंत वाटत नाहीं.

## रहस्य-कथांची नावड

वीरता, क्रौर्य आदि मनोभावनांना उत्तेजित्त वा प्रदर्शित करणाऱ्या साहित्याला बिहारांत कमी मागणी असल्याचें एक उदाहरण म्हणून असें सांगतां येईल कीं बिहारांत गुप्तपोलिसांच्या कथांस आणि गुन्ह्यांशीं संबंधित असलेल्या वाङ्मयास फारच कमी मागणी आहे. बिहारच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रांत दिवसेदिवस अतिशय वाढत्या प्रमाणावर दिसणाऱ्या गुप्तपोलिसी वाङ्मयाचा (-जर त्या सर्व लेखनास वाङ्मय म्हणावयाचें ठरलें तर-) विचार करतांना असें वाटतें कीं महाराष्ट्राची स्थायी प्रकृतीच साहसी, धाडसी आहे आणि ह्या भावाचे भल्याबुऱ्या कशाही रीतीनें प्रदर्शन करणाऱ्या साहित्याची भुरळ अगदीं नैसर्गिकपणेंच महाराष्ट्रास पडत असावी! आज दिसणाऱ्या अनुभवांतून निष्कर्ष काढावयाचा तर असेंही म्हणावें लागेल, कीं बिहारच्या भूमींत गुप्तपोलिसी साहित्याची महाराष्ट्राइतक्या खोलपणें आवड कधींच निर्माण होणार नाहीं.

## 'इनोदां' ची तऱ्हा

बिहारांतील जनतेंत विनोद-ग्रहणाची आणि त्याचा आस्वाद घेण्याची शक्ति अतिशय स्थूल आहे! कधींकधीं अतिशय उथळ आणि सभ्यतेच्या मर्यादांचें अतिक्रमण करणाऱ्या अशिष्ट (Vulgar) लिखाणाला विनोद समजून त्याचे पुनःपुन्हां मिटक्या मारीत उच्चारण होतें, तर अनेक वेळां सूक्ष्म आणि मार्मिक विनोदावर आपणच हंसावें आणि इतरांना त्यांतील आस्वाद न घेतां आल्यानें बावळट बनलेल्या त्यांच्या मुद्रांकडे पाहून आपलें

अगदीं ' आईस्क्रीम ' व्हावें हाही अनुभव बऱ्याच वेळां येतो ! आजही जुन्या पिढींत कांहीं प्रमाणांत आढळणाऱ्या प्रतिक्रियांवरून तर असेंही वाटतें, कीं एकदोन पिढ्यांपूर्वीं विनोद करणें म्हणजे कांहींतरी अयोग्य, अशिष्ट आणि अक्षम्य समजलें जात असावें. नव्या पिढींत मात्र हळूहळू विनोदाचें रसग्रहण करण्याची आवड आणि शक्ति निर्माण होत आहे आणि विनोद हेंही वाङ्मयांतील एक सभ्य, शिष्ट आणि रिझविणारें अंग आहे, याबद्दल जागृति झाली आहे. परंतु ही सुधारणा अतिशय मर्यादित असून, त्यांतून मूळची विनोदाच्या अज्ञतेची झांक नष्ट होत नाहीं असें वाटतें.

## कथावाङ्मय

कथावाङ्मयाकडे वळलें तर असें दिसतें कीं प्रसंगनिष्ठ अथवा गतिमान् कथानक असलेल्या गोष्टी लिहिण्यापेक्षां भावनांचें चित्रण करणाऱ्या कथांकडे नैसर्गिकदृष्ट्या जास्त कल दिसतो. अनेक वेळां मात्र भावनांचें हें विश्लेषण मनोविश्लेषणाच्या स्वीकृत निष्कर्षांशीं जुळणारें नसल्यानें थोडेंबहुत एककल्ली आणि अस्वाभाविक वाटतें. बंगाली वाङ्मयांतून भाषांतरित केलेल्या कथांचा बराच भरणा साप्ताहिकें, मासिकें आदींतून येतो.

## अप्रगत पत्रकारिता

बिहारांतील पत्रकारिताहि अद्याप बरीच अप्रगत आहे. संपूर्ण बिहारांत फक्त एकाच ठिकाणाहून-पाटण्याहून-दैनिकें निघतात ! मला या बाबतींत सर्वांत आश्चर्याची गोष्ट आढळली ती म्हणजे बिहारांतील पहिलें हिंदी दैनिकपत्र-' बिहारबन्धु '—हें एका महाराष्ट्रीय गृहस्थानें काढून बरींच वर्षें चालविलें होतें. हें पत्र एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं निघालें होतें; आणि तें जवळजवळ १० वर्षें चालून बंद पडलें. त्या पत्राचे संपादक श्री. केशव राम भट नांवाचे महाराष्ट्रीय गृहस्थ होते. त्या पत्राबद्दल आतां फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. सध्यां बिहारांत २ इंग्रजी व ६ हिंदी दैनिकें चालतात. एकदोन उर्दू पत्रेंहि नाममात्र अस्तित्वांत आहेत. हिंदी दैनिकांची तर इतकी आबाळ आहे, कीं कुठल्याहि पत्राचे ५,००० हून जास्त ग्राहक नसावेत ! साप्ताहिकांची संख्या २५ हून

जास्त नाहीं, त्यांनाहि जिल्हासाप्ताहिकांइतकाहि दर्जा नाहीं. मासिकेंहि ७।८ असतील नसतील. तींहि सिनेमा, लघुकथा यांच्या आधारानें जीव धरून आहेत.

बिहारमधील नैसर्गिक समृद्धतेच्या आणि रसरशीतपणाच्या पार्श्वभूमीवर हें साहित्याचें दारिद्र्य जाणवल्यावांचून रहात नाहीं.

★

## १० : बिहारी राजकारणाचे रंग

वास्तविकपणें केवळ ८।१० महिन्यांच्या वास्तव्यानंतर एकाद्या प्रांताच्या राजकीय जीवनाचें विश्लेषण करण्याचा प्रयत्न करणें हें थोडेसें धाष्टर्याचें ठरल्यावांचून रहाणार नाहीं. कारण एक म्हणजे या विषयाला अतिशय अभ्यासाची व प्रतिदिन प्रत्यक्ष संबंध राखण्याची गरज आहे व त्याचबरोबर दुसरी गोष्ट म्हणजे सध्यांच्या काळांत बिहारचें राजकारण भारताच्या इतर भागांतील राजकारणाप्रमाणेंच अतिशय अस्थिर व प्रवाही स्थितींत असल्या-मुळें त्याचें योग्य विश्लेषण करणें हें दुरापास्त आहे.

### ‘ जनक ’–गांधीजी

पण अतिशय ढोबळ मानानें विचार करायचा तर चूक ठरण्याची फारशी भीति न बाळगतां असें म्हणतां येईल कीं बिहारांतील जनतेला फक्त कॉंग्रेस या एकच राजकीय पक्षाबद्दल मूलभूत विश्वास आहे. याचें एक कारण असें कीं महात्मा गांधींनीं दक्षिण आफ्रिकेंतून भारतांत आल्याबरोबर ज्या ठिकाणीं आपल्या सत्याग्रहाच्या शस्त्राचा पहिला प्रयोग केला तो चंपारण्य हा भाग बिहारांत आहे. चंपारण्यांत गांधीजींचें आगमन होई-पावेतों बिहारला राजकीय जागृति जवळ जवळ नव्हतीच असें म्हटलें तरी चालेल. नीळ ( Indigo ) च्या मळेमालकांना अतिमानवी शक्तीचे पुतळे

मानून त्यांच्यापुढें चळचळां कांपत असणाऱ्या शेतकऱ्यांत गांधीजींच्या मार्गानें उत्पन्न झालेली आत्मश्रद्धा आणि प्रगति पाहून, नैसर्गिकपणें श्रद्धावृत्ति जास्त प्रमाणांत असलेल्या बिहारचें हृदय काँग्रेसनें पूर्णपणें जिंकलें व ह्यानंतर झालेल्या काँग्रेसच्या प्रत्येक लढ्यांत वाढत्या श्रद्धेनें व जोरानें बिहारनें काँग्रेसचाच पाठपुरावा केला.

## ‘ तूं चुकत असलास, तरीहि...’

काँग्रेसच्या बिहारवरील वर्चस्वाचें दुसरें एक कारण असें कीं समाजवादी लोकांनीं काँग्रेसशीं संबंधविच्छेद करीपर्यंत राजकीय आकांक्षा असणारा बिहारांतील बहुसंख्य वर्ग काँग्रेसलाच देशसेवेचें आणि परदास्य-विमोचनाचें एकमेव साधन म्हणून मानीत होता. विचारशीलता आणि बुद्धिमत्ता यांहून भावना आणि श्रद्धा यांवर जास्त अधिष्ठित असलेल्या बिहारनें अगदीं चालू क्षणापर्यंत काँग्रेसंबंधींची ही धारणा बदललेली नाहीं आणि जरी स्वातंत्र्योत्तर काळांतील पक्षोपपक्षांचा प्रचार आणि राज्यकर्त्यांच्या पदोपदीं होणाऱ्या चुका ह्यामुळें काँग्रेस हा देशांतील केवळ एक (प्रमुख कां होईना) राजकीय पक्षच आहे ही जाणीव बिहारमधील शिक्षित वर्गांना होत असली तरीहि बहुसंख्याक वर्ग आजहि ‘ Congress! With all thy faults I love Thee ’ असेंच मनाच्या खोल गाभ्यांत नेहमीं म्हणत असतो.

## अनभिषिक्त ‘ राजेंद्र ’ !

भारताला ललामभूत झालेल्या प्रथम श्रेणीच्या पुढाऱ्यांबद्दल त्यांच्या मूळ प्रांताला एक प्रकारचा अभिमान आणि आत्मीयता स्वाभाविकपणेंच वाटत असली आणि ह्या आत्मीयतेचे पोटीं त्याच्यासाठीं त्या त्या प्रांतांत एकमेवाद्वितीय स्थान निर्माण होत असलें तरीहि तें स्थान सर्वमान्य आणि निर्विरोध असतें असें नाहीं. पण श्रद्धाशील बिहारच्या हृदयांत बिहारचे अखिल भारतीय नेते डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याबद्दल जें स्थान आहे तें आजकालच्या जमान्यांत दुसऱ्या कुणाहि भारतीय नेत्याला त्यांच्या प्रांतांत असेल असें छातीठोकपणें म्हणतां येणार नाहीं. राजेंद्रांनीं बिहारसाठीं केलेला त्यागहि तसाच मोठा आहे. राजेंद्रांशिवाय बिहार ही कल्पनाहि कुणास

बिहारांत सहन होणार नाहीं; आणि फलतः कुणा एका व्यक्तीला आपला नेता म्हणून बिहार ओळखत असेल तर तो म्हणजे फक्त राजेंद्रांनाच. बिहारच्या राजकारणाशीं संबंधित असलेल्या एका व्यक्तीनें मला एकदां बोलतांना सांगितलें होतें कीं, " बिहारचे दोन्ही मोठे शेजारी प्रांत–उत्तर प्रदेश व बंगाल–हे अखिल भारतीय पुढारी निर्माण करणारे प्रांत आहेत. त्यांतला प्रत्येक लहानमोठा पुढारी आपणास 'अ. भा.' समजतो. परंतु बिहारांत मात्र आतांपर्यंत एकच खराखुरा अखिल भारतीय नेता सम्राट अशोकानंतर निर्माण झाला आणि तो म्हणजे डॉ. राजेंद्र प्रसाद." आणि "जयप्रकाश?" मीं त्यास तावडतोब विचारलें. त्यावर त्यानें सांगितलें कीं, "जयप्रकाशांच्या विचारशीलतेबद्दल, कर्तृत्वाबद्दल बिहारांत गौरवाची भावना असली तरी कां कोण जाणे, बिहारला त्यांच्याबद्दल खरीखुरी आत्मीयता वाटत नाहीं; आणि त्यांच्या कल्पनांशीं बिहारची बहुसंख्य जनता समरस होऊं शकत नाहीं."

## 'कालचें पोर'–जयप्रकाश

माझ्या नंतरच्या अनुभवांवरून त्याचें हें मत मला पटलें आहे. आपल्या जन्मदात्या प्रांताची मान्यता जयप्रकाशांच्या मागें उभी नसावी ही दैवगति विचित्र वाटण्यासारखी असली तरी सत्य आहे. जयप्रकाशांच्या कार्याकडे बिहार कौतुकानें पहात असला तरी आदरानें पहातो असें म्हणतां येणार नाहीं आणि ही गोष्ट बिहारांतील समाजवादी देखील मान्य करतात. त्याची मीमांसाहि एका समाजवादी कार्यकर्त्यानें माझ्याशीं बोलतांना मोठ्या व्यवस्थितपणें केली होती. तो म्हणाला "गोकुळांत प्रत्यक्ष भगवान् कृष्णाचीहि मसलत अनेकवेळां 'बालबुद्धि' आहे म्हणून उडवून लावण्यांत आली नव्हती काय? जयप्रकाशांचें बालपण, त्यांच्या चुका, त्यांचे प्रयास साऱ्याच गोष्टी बिहारच्या लोकांनीं अतिशय जवळून पाहिलेल्या आहेत. आणि बिहारांतील सध्यांच्या कॉंग्रेस पुढाऱ्यांशीं तुलना करतांना बिहारी लोकांना जयप्रकाश अद्यापही 'कालचा पोर' वाटलें तर त्यांत आश्चर्य तरी कसलें? ह्या भावनेपोटीं लहान मुलाचे प्रयास कौतुकानें पाहाणाऱ्या

आईची शंकाकुल ममता बिहारांत जयप्रकाशांबद्दल खास आहे. आत्मविश्वास आणि मान्यता नसली तरीही जर जयप्रकाश आणि त्यांचा पक्ष यशस्वी होईल तर मातेच्या वात्सल्यानें बिहारच त्यांचा सर्वांत अधिक सन्मान करील."

## काँग्रेसमधील गटबाजी

राजकीय आघाडीवर जरी बिहार अद्यापपावेतों काँग्रेसचा असला तरीही काँग्रेसच्या लोकप्रियतेला भगदाडें पडत असल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. सर्वांत नवें व मोठें भगदाड म्हणजे नाशिक काँग्रेसच्या पूर्वी मंत्रीमंडळ गटाकडून बिहार प्रांतिक काँग्रेसच्या अध्यक्षपदीं झालेली श्री. लक्ष्मीनारायण 'सुधांशु' ह्यांची नियुक्ति हें होय! सुधांशूबद्दल व्यक्तिशः कुणालाच राग नसला तरी त्यांच्या नियुक्तीसाठीं स्वीकारलेल्या पद्धतीवर बरेंच वादळ उठलें आणि त्याचेंच पर्यवसान अध्यक्षपदासाठीं उभे असलेले एक उमेदवार श्री. महामायाप्रसाद यांच्या नेतृत्वाखालीं एका वेगळ्या गटाची स्थापना करण्यांत झालें आहे. आज हा गट जरी कृपलानींच्या 'डेमोक्रॅटिक फ्रंट'ला मिळत असला तरी माझ्या मतें त्याचें स्वरूप उत्तर प्रदेशांतील श्री. त्रिलोकीसिंग यांच्या नेतृत्वाखालीं स्थापन झालेल्या जनता काँग्रेसशीं जास्त जुळणारें आहे; आणि त्याच तोंडावळ्यावर ह्या गटाची पुनर्रचना होणेंहि अशक्य नाहीं.

## संघ हा प्रकृतिधर्म

बिहारची प्रकृति हिंदुत्वनिष्ठ असल्याचा उल्लेख मीं यापूर्वी अनेकवेळां केलाच आहे. ह्या हिंदुत्वनिष्ठ प्रवृत्तीमुळें राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दलही बिहारी जनतेला बरीचशी आत्मीयता आहे. सर्वच राजकीय पक्षांतील अनेक कार्यकर्त्यांना संघाबद्दल अनेकवेळां आदर व सहानुभूती प्रत्ययाला येते. ज्याप्रमाणें बिहार, नेता म्हणून डॉ. राजेंद्र प्रसादनां ओळखतो, पक्ष म्हणून काँग्रेसला ओळखतो, त्याप्रमाणें आपल्या प्रकृतिधर्माशीं स्वभावतः जुळणारें कार्य म्हणून, तत्त्व म्हणून तो राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला ओळखतो असें अतिशयोक्ति न करतां म्हणतां येईल.

पण ह्याचा अर्थ रा. स्व. संघाचें तेथील कार्य पुरेसें आहे असा नाहीं. गृहस्थी करून राहण्याच्या प्रथेमुळें आणि जमिनीच्या सुपीकतेपोटीं निर्माण होणाऱ्या सुखवस्तु – सहज– ( Easy-going ) वृत्तीमुळें संघाच्या दैनंदिन कार्यक्रम करण्याच्या पद्धतीशीं बिहार जुळते घेऊं शकत नाहीं आणि त्यामुळें तेथील रा. स्व. संघाची परिस्थिति अनेक चाहते आणि थोडे कार्यकर्ते अशी झाली आहे.

## —आणि हिंदुसभा

पण आश्चर्य वाटावें अशी एक गोष्ट म्हणजे बिहारांत हिंदुत्वनिष्ठा असूनहि हिंदुमहासभेबद्दल अतिशय उदासीनता प्रथमपासून आहे. ज्याचें नांव भारताच्या इतर प्रान्तांत कारणपरत्वेंदेखील ऐकूं येतें असा एकहि हिन्दुसभानेता बिहारांत नाहीं आणि बिहारांतील हिन्दुसभेचें नेतृत्वहि बव्हशीं बिहारांत स्थायिक झालेल्या इतर प्रांतीयांच्या हातांत आहे. बिहारांत हिन्दुसभेचें कार्य व विस्तार अतिशय अल्प आहे. याचें एक कारण म्हणजे तेथील आर्यसमाजाचें प्राबल्य हें असावें असें वाटतें. हिंदुत्वाच्या भूमिकेवर उभे राहून कार्य करूं इच्छिणाऱ्यांपैकीं बरेच लोक आर्यसमाजांत आहेत.

## कम्युनिस्टांचा अल्प प्रभाव

जमिनीची सुपीकता, धर्माविषयीं प्रेम व आदर, राष्ट्रकल्पनेविषयींचा दृढ भाव आणि काँग्रेसचा जास्त पगडा ह्यामुळें साम्यवादी प्रचाराचें बिहारांतील स्वरूप बरेंचसें मर्यादित आहे. बिहारांत अतिशय उशीरा साम्यवाद्यांचें काम सुरू झालें आणि फार मन्द गतीनें वाढलें. भावनाशीलतेपोटीं निर्माण होणाऱ्या धाडसीपणाच्या आवडीमुळें बिहारांत साम्यवादी कार्याचीं मुळें थोडीशीं रुजूं शकलीं हें खरें असलें, तरी सर्वसामान्यपणें साम्यवादी पक्षाबद्दल औदासीन्याचीच भावना बिहारांत आहे.

★

# ११ : कोसीची कहाणी

बिहारांतील नद्यांच्या विस्तीर्णतेमुळें आणि प्रगतीच्या परंपरेंतील त्यांच्या महात्म्यामुळें शक्य तेवढ्या जास्त नद्यांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांच्या प्रवाहाशेजारीं असलेल्या जीवनांतील वैशिष्ट्यांचा प्रत्यक्ष अभ्यास करावा अशी एक खोल इच्छा प्रथमपासूनच माझ्या मनांत होती. कोंकणच्या रहिवाशाला सागराचा निकट परिचय असला तरीहि नदीचें वैशिष्ट्य आणि मानवाच्या जीवनावर त्याचे होणारे विविध परिणाम ह्याचें अवलोकन करणें हा माझ्या आवडीचा विषय असल्यानें कोसीला जून-जुलैचे सुमारास पूर येतांच त्या निमित्तानें मीं कोसी विभागाला भेट दिली. त्या भेटीचे प्रसंगीं आलेल्या विविध अनुभवांचें थोडेंसें चित्रण वैशिष्ट्यपूर्ण झाल्या-खेरीज रहाणार नाहीं.

## गंगामातेचें विराट दर्शन

पाटण्याला आल्यानंतर अगदीं प्रथम इकडच्या नद्यांच्या विस्तीर्णतेची कल्पना आली ती गंगेवरून. कोंकणच्या माणसानें समुद्र पाहिला असला तरी प्रचंड नद्या पाहाण्याचें भाग्य कोंकणच्याच नव्हे तर सर्वसाधारणपणें संपूर्ण महाराष्ट्राच्याच वांट्याला एकंदरींत कमीच आलें आहे. त्यामुळें समोरच्या तीराचें दर्शनहि आपल्या विस्तीर्णतेनें पुसट करणाऱ्या गंगा-मातेच्या पात्राबद्दल मला अतीव आकर्षण निर्माण झालें होतें. त्यानंतर जेव्हां पोहण्यासाठीं एकदां गंगेवर गेलों आणि समुद्राच्या वेगशून्य जलाशयाला सरावलेला असल्यानें त्याच कल्पनांच्या आधारावर मी जेव्हां घाटावरून गंगेच्या प्रवाहांत उडी मारली, तेव्हां पाण्यांतून डोकें वर निघण्यासाठीं आवश्यक असलेल्या कांहीं सेकंदांच्या अवधींतच संपूर्ण घाट प्रवाहाच्या वेगाबरोबर मागें पडून मी कुठल्याकुठें वाहत गेल्यानें ह्या आकर्षणाबरोबरच एक विस्मय आणि भय यांनींहि माझ्या मनांत ठाण दिलें होतें.

## गंगेचें तांडव नृत्य

त्यानंतर जुलैमध्येंच त्याच शांत स्वच्छ गंगेचें तें उग्र रूप मीं पाहिलें,

त्यामुळें मनावर उमटलेल्या तरंगांचें नीटसें चित्रण करणें माझ्या आवांक्या-बाहेरचें आहे. आपला नेहमींचा गहिरा हिरवट रंग टाकून मातीच्या लालसर रंगानें रंगलेली गंगाजी प्रचंड वेगानें प्रवाहाबरोबर असंख्य वस्तूंना घेऊन धांवत होती. प्रशांत मुद्रेच्या कल्याणमय शंकरानें लीलेनें विक्राळ तांडव नृत्य करावें तशा प्रकारचें तें उग्र पण आकर्षक, शरीरांतल्या नसा-नसांना आव्हान करणारें प्रलोभनकारी दृश्य होतें.

## ‘ कोसी ’ कशी आहे ?

पण गंगाजीच्या ह्या दर्शनापेक्षांहि विक्राळ आणि वेगवान प्रवाहानें धांवत मानवी जीवनाच्या आणि सुधारणांच्या क्षणभंगुरतेचा उपहास करीत पूर्णियापासून दरभंग्यापर्यंतच्या शेंकडों मैल रुंदीच्या प्रदेशांत स्वच्छंद लहरी-प्रमाणें भ्रमण करणाऱ्या कोसी नदीचें प्रत्यक्ष दर्शन एकदां घ्यावें अशी ओढ माझ्या मनाला लागून राहिली होती.

परंतु कांहीं कारणानें त्या प्रदेशांत प्रत्यक्ष जाणें हें लांबणीवरच पडत राहिल्यानें त्या कुतूहलाच्या अंशतः पूर्तीसाठीं कोसीबद्दल माहिती गोळा करायला धीरे धीरे प्रारंभ केला होता. ह्या प्रयत्नांत मिळालेल्या माहितीनें हें कुतूहल आणि आकर्षण पुरें होण्याऐवजीं वाढतच राहिलें होतें.

## ‘ कोसी ’ कुंवार

चौकशी करूं लागल्यानंतर अगदीं प्रथम मला माहिती मिळाली, कीं कोसी ही कुंवार नदी आहे आणि म्हणूनच ती अशा स्वच्छंदपणानें वागते, अशी कल्पना पुराणांतरीं रूढ आहे. भविष्य पुराण आणि ब्रह्मवैवर्थ पुराण यांत कोसीच्या ह्या लहरी प्रवाहाचा आणि मानवी जीवनाला त्यामुळें निर्माण झालेल्या धोक्याचा उल्लेख आला असून त्यामागें अशी कुठेंतरी कथा देण्यांत आली आहे, कीं कोसी ही विश्वामित्र ऋषींची बहीण आहे. तिचें लग्न न झाल्यानें मानभंग होऊन तिनें मानवसंहाराचें हें कार्य चालवलें आहे. ( कोसी नदी तिच्या प्रचंडतेनंतरहि कुठल्याहि ‘ सागरा’ला न मिळतां गंगानदीला भागलपूरनजीक मिळत असल्यामुळें कदाचित् ही ‘ कुंवार ’-पणाची कल्पना रूढ झाली असावी ) आणि ह्या आपल्या कार्याच्या पूर्ती-

साठीं पूर्णिया ते दरभंगा हा जवळजवळ १५०/२०० मैल रुंदीचा टापू ती १०० वर्षांत पालथा घालते.

## कोसीचे सात प्रकार

पण कोसीबद्दलच्या ह्या पौराणिक कथा सोडून जर त्याच्या मागच्या शास्त्रीय दृष्टिकोनाकडे वळलें, तर असें आढळतें, कीं कोसीचा प्रवाह हा हिमालय पर्वतराजींत उगम पावणाऱ्या सात निरनिराळ्या प्रवाहांचा एकत्रित ओघ आहे. ह्या सातहि प्रवाहांचे रंग वेगवेगळे असून त्यांना श्वेत कोसी, पीत कोसी, रक्त कोसी अशीं त्यांच्या रंगानुसार नांवें आहेत. पर्वतराजींचा प्रदेश सोडण्यापूर्वींच हे सातहि प्रवाह एकमेकांत मिसळतात आणि हा संयुक्त जलौघ ( ज्याला कोसी अथवा सप्तकोसी म्हणतात ) छत्रगद्दी ह्या नेपाळ सरहद्दीवरच्या गांवानजीक सपाट प्रदेशावर येतो. मोंगल काळांत कोसीच्या ह्या अनिर्बंध तांडवाला रोखण्यासाठीं ज्यावेळीं तिचा प्रवाह पूर्णिया-नजीक होता, त्यावेळीं ह्या छत्रगद्दीपासून तों तडक गंगेच्या प्रवाहापर्यंत एक प्रचंड बांध—बीर बांध—बांधून कोसीचा प्रवाह पूर्णिया ते बीर बांध प्रदेश एवढ्या जागेंत मर्यादित करण्यांत आला होता. परंतु ब्रिटिश कारकीर्दींत अनेक चांगल्या ' नेटीव्ह ' गोष्टींप्रमाणेंच ह्या बांधाचीहि उपेक्षा करण्यांत आल्यानें हळुहळू तो ढांसळला आणि कोसीचें तांडव पुनश्च एकवार पूर्णिया ते दरभंगा अनिर्बंधपणें सुरू झालें.

## उध्वस्त गांवांची कहाणी

आज कोसीच्या प्रवाहानें प्रतिवर्षीं असंख्य गांवें उध्वस्त होत आहेत. वर्षांतून तीन पिकें काढूं शकण्याइतक्या सुपीक असलेल्या ह्या प्रदेशांतील जनतेची अशी अनुकंपनीय स्थिति झाली आहे, कीं महापूर ( बाढ ) येतांच आपलीं कच्चीं पक्कीं घरें सोडून शक्य तेवढ्या सुरक्षित प्रदेशांत पळायचें आणि बाढ कमी झाल्यानंतर चारसहा महिन्यांनीं परत येऊन ह्या काळांत उगवलेली ' कास ', ' पटेर ' आदि गवतांचीं जंगलें तोडून जाळून पुनः एखादें पीक काढण्याचा प्रयत्न करावयाचा. मराठी प्राथमिक शाळेंतल्या एका कवितेंतल्या ' नेमें 'चि येणाऱ्या पावसाळ्याप्रमाणें ' नेमेंचि येणारी ही

बाढ यांच्या हाडींमासीं भिनून गेली आहे; आणि १०।१५ वर्षांच्यानंतर पुनः ५०।७५ वर्षांसाठीं आपला प्रदेश पुराच्या दाढेखालून मोकळा झाल्यानंतर मानवी सुधारणांचा डोलारा पुन्हां वाळूच्या किल्ल्याप्रमाणें उभारण्याचें कार्य अविरतपणें चालूच राहिलें आहे.

## कोसीबद्दलचें कुतूहल

यापूर्वी लिहिल्याप्रमाणें माहिती हातीं लागल्यानंतर कोसीबद्दल निर्माण झालेल्या कुतूहलांत आणखी भरच पडली आणि त्याचबरोबर मराठी पुस्तकांतल्या अनेक अपयशांना दाद न देतां शेवटीं जाळ्यांत शिरणाऱ्या कोळ्याप्रमाणें कोसीच्या तांडवांना न जुमानतां यशस्वीपणें आपलें जीवन आणि संस्कृति टिकवून धरणाऱ्या मैथिली जनतेबद्दल माझ्या मनांत कुतूहल निर्माण झालें आणि त्या प्रदेशाला प्रत्यक्ष भेट देण्याची संधि मी धुंडूं लागलों.

## उत्तर बिहाराकडे

सर्व प्राथमिक तयारी पूर्ण झाल्यानंतर दि. १४ सप्टेंबर १९५० रोजीं कोसीपीडित क्षेत्राचें अवलोकन करण्यासाठीं उत्तर बिहारांत जावयास निघालों. पाटण्याहून, किंबहुना सगळ्याच दक्षिण बिहारांतून उत्तर बिहारांत जाण्यासाठीं गंगेचा प्रवाह ओलांडावा लागतो. दोन्ही किनाऱ्यांवरील सर्व प्रमुख शहरांतून गंगाजी ओलांडण्याची सोय असून कित्येक ठिकाणीं तर विरुद्ध दिशेच्या किनाऱ्याला त्याच शहराचें नांव केवळ 'घाट' या उपाधीसह दिलेलें आढळतें. जसें मुंगेर (महाराष्ट्रांत व दक्षिणेकडे Monghyr ह्या स्पेलिंगमुळें मोंघीर म्हणून ओळखलें जाणारें) च्या समोर येणारा विरुद्ध तटावरचा प्रदेश 'मुंगेर घाट' इत्यादि.

## 'नदी–किनारा' हेंच घर

अत्यंत पुरातन कालापासून बिहारची सर्व Civilization (नागरता) नदीकिनाऱ्यावरच वसलेली आहे. आर्यांच्या अगदीं प्रथम आलेल्या टोळ्यांपैकीं अनेकांनीं ह्याच विभागांत वस्ती केली आणि आपली Civilization प्रस्थापित केली. त्यानंतरहि नदीकिनाऱ्यांच्या सुपीकपणामुळें

आणि पाण्याच्या आवश्यक पुरवठ्यामुळें सर्व मध्ययुगीन आणि तत्पूर्वीच्या काळांतील शहरेंहि ह्याच नदीकिनाऱ्यांवर प्रस्थापित झालीं आणि अद्यापहि ह्या योजनेच्या सुव्यवस्थितपणा व कार्यक्षमतेमुळें ती टिकून आहे.

पण ह्यांतून बिहारला अथवा खरें म्हणजे बिहार आणि उत्तरप्रदेश ह्या प्रांतांच्या Civilization ला एक मोठा धोका उत्पन्न झाला आहे. वारंवार येणाऱ्या पुरांनीं पाटणा, भागलपूर, बनारस, इलाहाबाद आदि गंगेच्या कांठावरील सर्वच शहरांचें बरेंच नुकसान होतें. कोसीविषयीं तर विचारच नको !

## गंगेनें रूप पालटलें

माझ्या ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणें मी पाटण्यास दुपारीं १ वाजतां जहाजांत चढलों. हवा निरभ्र होती; इतकेंच नव्हे तर कडक ऊन पडलें होतें. गेल्या दोनतीन दिवसांत पावसानें दर्शनहि दिलें नव्हतें. पण गंगाजी ओलांडायला लागणाऱ्या केवळ एका तासाच्या अवधींतच निसर्गानें एवढे खेळ केले, कीं गंगाजीच्या पृष्ठभागावर असलेल्या त्या साऱ्या मानवसमूहानें धर्म, नास्तिकता, बुद्धिप्रामाण्य साऱ्या गोष्टी दूर सारून 'जय गंगे ! जय गंगामाते !' हा जयघोष उच्च स्वरांत सुरू केला. किनारा सोडल्यापासून जवळ जवळ अर्धा तासपर्यंत हवा अतिशय चांगली होती. त्यानंतर मात्र आकाश एकाएकीं भरून आलें. धुक्यामुळें दहा हातांवरीलहि दिसणें दुरापास्त झालें आणि ५।१० मिनिटांतच पावसानें असा मारा सुरू केला, कीं त्या उघड्या डेकवरून एका बाजूनें तिरकस येणाऱ्या पावसाचे मोठे थेंब अगदीं थेट दुसऱ्या बाजूपर्यंत वाऱ्याच्या जोरानें वाहून नेले जात. त्या उघड्या डेकवरचे सारेच प्रवासी सामानसुमानासह भिजून गेले; आणि त्यांनींहि हुडहुडल्या स्वरानें 'जय गंगे ! जय गंगामाते !'चा घोष चालू ठेवला. लहान मुलांच्या रडण्यानें आणि स्त्रियांच्या कलकलाटानें होणाऱ्या गोंधळांत एका शेळीच्या केंकाटण्यानें आणि आपला सारा माल बुडाला म्हणून आक्रोश करणाऱ्या चहावाल्याच्या स्वरानें मोठें चमत्कारिक वातावरण निर्माण झालें होतें. जहाज तर असें हालत होतें, कीं विचारण्याची सोय नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रमांक ७४१९७ वि. नि. निबंध
क्रमांक २०५४ नों. दि. १६।३।७१



जयघोषामुळें!

सुमारें पंधरा मिनिटांनंतर गंगेचें हें तांडव शांत झालें आणि पुन्हां एकदां ऊन पडलें. 'जय गंगे'चा घोष कृतज्ञतेच्या जाणीवेनें मोठा होऊन हळू हळू विराम पावला. या सर्व वातावरणापासून समुद्राच्या प्रवासाचा आणि त्यांतल्या वादळांचा सराव असल्यामुळें मी मात्र थोडासा वेगळा राहिलों होतों.

"What's the matter Off'er?" (काय झालें हो!) तेथून जाणाऱ्या ऑफिसरला मीं हटकलें. त्यावर त्यानें सांगितलें कीं एका विशेष संकटांतून आपण नुकतेच बचावलों आहोंत. जहाज 'खराब दृश्यशक्तीमुळें' (Bad Visibility) प्रवाहांत मध्येंच वर आलेल्या एका भूभागावर आदळतां आदळतां बचावलें आहे आणि नेहमींचा रस्ता मात्र कुठल्या कुठें सुटून आपण प्रवाहाबरोबर बरेच खालीं आलों आहोंत. तो मला हें सारें इंग्रजींत समजावीत होता आणि आजूबाजूची 'जनता' कांहींतरी वेगळें घडलें असल्याच्या जाणीवेनें ऐकत होती. जातां जातां त्यानें मला सूचना दिली, 'हें पहा, हें सारें यांना सांगूं नका. नाहीं तर गोंधळ होईल.' मीहि त्याला योग्य आश्वासन देऊन वाटेला लावलें. मनांत मात्र आलें, कीं आपल्या साहस-शोधाची सुरवात मोठी सुरेख झाली.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ८८२१

विचार अन् भावनांचा गोंधळ

त्याच मनःस्थितींत मी प्रश्न विचारणाऱ्या त्या साऱ्या लोकांना आमच्या संभाषणाचा सारांश सांगितला. आपण १५ मिनिटांपूर्वी घाबरलों होतों तें ठीकच होतें या जाणीवेनें आणि मोठ्या संकटांतून सुटलों ह्या आनंदानें कलकलाट सुरू झाला आणि त्याबरोबरच 'पल्याड' पोंहचायला उशीर होणार याबद्दल चिंताहि सुरू झाली. प्रेमाच्या उद्रेकासरशीं ज्या दोरीला धरून आपण वर आलों, तो साप होता हें समजल्यानंतर झालेल्या तुळशीदासाच्या मनःस्थितींत मी मात्र आतांपर्यंत स्वतःच्या बेफिकीरीचें आश्चर्य करीत एका बाजूला जाऊन उभा राहिलों.

## दरभंग्याला तर पोहचलों

पहलेजा घाट येथें उतरून माझ्या पहिल्या मुक्कामाचें स्थळ दरभंगा येथें जाणाऱ्या गाडींत बसलों आणि रात्रौ १२ च्या सुमारास दरभंगा येथें पोहचलों. तेथें एका मित्राच्या घरीं रात्रीपुरता मुक्काम ठोकला आणि दि. १५ ला सकाळीं आठ वाजतां न्याहरी करून 'निर्मली' ह्या कोसीच्या प्रवाहाखालीं सांपडलेल्या भागाकडे जावयास निघालों. निघतांना ज्यांच्याकडे उतरलों होतों, त्यांच्या आग्रहावरून इकडच्या लोकांच्या लोकमान्य खाद्याचा, 'दहींचुडा'चा समाचार घेतला. दहींचुडा म्हणजे केवळ पोह्यांवर दही आणि साखर. पण इथल्या लोकांत तेंच न्याहरीचें, इतकेंच नव्हे, तर प्रवासांत अथवा वेळीं अवेळीं भोजनाचेंहि साधन आहे. बाजारांतून आणलें गेलेलें दहीं मात्र इतकें सुंदर होतें कीं मुंबईस तर तें आजकाल पाहावयास मिळणेंहि अशक्य. ओसंडून जाईल एवढा मोठा भाग मीं एकदम चमच्यावर घेतला तरीहि खालीं न पडण्याइतकें घट्ट आणि नजरेसहि भूक लागण्याइतकें शुभ्र !

सुमारें १० वाजतां दरभंगा स्टेशन सोडलें आणि दुपारीं २।।–३ वाजतां निर्मलीपासून दोन फर्लांगांवर (कारण रेल्वे लाईन वाहून गेल्यामुळें गाडी स्टेशनपर्यंत जाऊं शकत नाहीं.) उतरलों. तेथून एका होडींत बसलों आणि निर्मलीचे सारे रस्ते होडीनें ओलांडीत धर्मशाळेंत माझ्याबरोबर असलेल्या एका मित्राबरोबर येऊन पोंहचलों.

निर्मलीच्या धर्मशाळेंत त्या छोट्या दारांतून आंत शिरून आणि मधलें १०–२० पावलें लांबीचें अंगण ओलांडून जेव्हां आमची होडी अगदीं पायऱ्यांना जाऊन टेकली तेव्हां माझी विचारतंद्री भंग पावली आणि भीतिप्रद स्वप्नांतून जागा झालेल्या माणसाप्रमाणें एक निःश्वास माझ्या तोंडांतून हलकेच बाहेर पडला. स्वप्नांतल्या भीतीची अर्धवट झांपड आणि ती भीति खरी नाहीं ह्याची थोडीशी शांतवणारी जाणीव ह्याचा अगदीं यथायोग्य मिलाफ त्या निःश्वासांत खरोखरच झाला होता. होडीच्या त्या १०–१५ मिनिटांच्या प्रवासांतच खरोखर इतक्या चमत्कारिक मनःस्थितींतून मला जावें लागलें होतें. घरांतल्या जमिनीवर ६ इंच पाणी अद्याप दिसत

असलेलीं बहुसंख्य घरें, पडलेल्या झोंपड्या आणि त्यांतच राहणारे ते 'विश्वविजयी' मानवसमाजाचे प्रतिनिधी, त्यांच्या दर्शनानें वहाणाऱ्या करुणतेशीं त्या विभागांतल्या लोकांच्या प्रत्येक हालचालींत दिसणारा झुंजार बेफिकीरपणा, बेडरपणा आणि हंसतमुखानें चाललेले त्यांचे व्यवहार ह्यांनीं निर्माण झालेल्या विस्मयाचें मोठें चमत्कारिक मिश्रण मनांत झालें होतें. जीवनाच्या सर्वच मूल्यांची, सुखाच्या सर्वच कल्पनांची, प्रगतीसाठीं आवश्यक अशा शाश्वती आणि स्थैर्य यांच्या नियमांची प्रचंड प्रमाणावर उलथापालथ चालू असूनहि हें जीवन मात्र कोसीसारखाच आपला प्रवाह वेगवान गतीनें पण शांततेनें चालवीत होतें! मनानें अपेक्षिलेलें मानवतेचें क्रंदन येथें नव्हतें, जी सहानुभूति देण्याच्या मानसिक ओढीनें मी आलों होतों तिची येथें कुणालाच जरूर दिसत नव्हती, जीं दुःखें मी वृत्तपत्रांत वाचीत होतों त्यांचा येथें मागमूसहि नव्हता, तर प्रलयानंतर नवी सृष्टि निर्माण करणाऱ्या मनूच्या गुणांचा साक्षात्कार प्रत्येक व्यक्तींत मला होत होता. फाळणीनंतर छिन्नविच्छिन्न आणि मानवतेच्या सद्‌गुणांबद्दल, सुधारणांबद्दल, प्रगतीबद्दल साशंक होऊन, संतप्त होऊन आल्यानंतरहि पुन्हां नवीन जीवन उभारणाऱ्या आणि आपली 'कराची' गमावल्याच्या विफलतेबरोबरच नवीन कराची निर्माण करण्याच्या विजीगीषु मनोवृत्तीनें वावरणाऱ्या सिंधी आणि पंजाबी निर्वासितांबद्दल जो एक प्रकारचा आदरभाव मला नेहमींच वाटत आला आहे, त्याचाच सुखद पुनःप्रत्यय इथेंहि अनपेक्षितपणें आला. त्या दर्शनानें मी दिपून गेलों!

## जलमय निर्मली

आणि म्हणून धर्मशाळेंत उतरल्याबरोबर लोकांच्या प्रत्यक्ष दुःखाची चौकशी करण्याचा ठरलेला कार्यक्रम उरकण्याचें त्राण माझ्यांत राहिलें नव्हतें. इतकेंच नव्हे, तर त्याची मला आवश्यकताहि वाटत नव्हती. अशा स्थितींत थोडा आराम करावा म्हणून धर्मशाळेची एखादी खोली मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला. प्रथम बराच वेळ नकारघंटा ऐकल्यानंतर आम्ही पाटण्याहून आलों आहोंत आणि 'पेपरवाले' आहोंत या मात्रेचा आमच्या वाटाड्यानें केलेला उपयोग झाला आणि सप्लाय इन्स्पेक्टरच्या

खोलींत आम्हांला तात्पुरती जागा देण्यांत आली. ( या ठिकाणीं हें सांगितलें पाहिजे कीं निर्मलीच्या ९० प्रतिशत घरांत पाणी आल्यानें पोस्ट ऑफिस, सरकारी हॉस्पिटल, सर्व अधिकाऱ्यांचीं ऑफिसें आणि निवासस्थानें त्या ऐसपैस धर्मशाळेंतच दाटीदाटीनें सामावण्यांत आलीं होतीं. ) फिरतीवर असलेल्या त्या सप्लाय ऑफिसरचे मनांतल्या मनांत आभार मानीत आम्ही त्या खोलींत जाऊन पडलों आणि एखादी डुलकी घेण्याच्या तयारीस लागलों. आपल्या ३॥ पायांवर उभी असलेली एक खुर्ची आणि नेवार अतिशय सैल झाल्यानें झोळणा बनलेली एक खाट-चौपाई-एवढें फर्निचर त्या खोलींत होतें. सोबत्याला खाट देऊन मी खुर्ची मागें भिंतीला रेलून लेटलों आणि लहानपणीं भूगोलांत वाचलेलें ' व्हेनिस 'चें वर्णन आठवलें. रस्त्याऐवजीं कालव्यांचा उपयोग केला जातो ह्यापलीकडे त्या नगरीबद्दल कांहीं माहिती, मला वाटतें, आमच्या त्या प्राथमिक भूगोलांत दिली नव्हती आणि एवढ्याच माहितीवर बोलावयाचें तर ती त्या क्षणीं निर्मलीलाहि लागू पडत होती.

संध्याकाळीं होडींतूनच आमच्यासाठीं जेवण आलें. त्यानंतर पहाणी करण्याच्या तयारीनें माझा सोबती आग्रह करूं लागला, पण त्याऐवजीं त्या धर्मशाळेच्या दुसऱ्या मजल्यावर असलेल्या गच्चीवरून दिसणारें दृश्यच मला इतकें खिळवून टाकीत होतें, कीं तें सोडून भटकण्याची कल्पनाहि मला पसंत नव्हती. शेवटीं माझ्या विक्षिप्ततेला मनांत हंसत त्यानेंहि तो विचार सोडून दिला आणि आम्ही त्या गच्चीवरून आजूबाजूला पाहूं लागलों.

दृष्टि पोहोंचूं शकेल त्या ठिकाणापर्यंत सर्व पाणीच पाणी आणि त्यावर डोकें वर काढणारीं अर्धवट ढांसळलेलीं घरें आणि सुकलेलीं झाडें एवढेंच दृश्य समोर दिसत होतें. पण तें पहात असतांना कॉलेजच्या कुठल्यातरी पाठ्यपुस्तकांत Beauty is as much as or even more subjective than it is objective ( सौंदर्य हें जितकें वस्तुनिष्ठ आहे, तितकेंच किंबहुना त्याहूनहि जास्त दृष्टिनिष्ठ आहे ) ह्याचें एका लेखांत आलेलें विवरण आठवलें. त्यांत त्या लेखकानें भीषण सौंदर्याचें मोठें सुंदर वर्णन केलें आहे. त्यावेळीं वर्गांत प्रोफेसरांच्या चर्पटपंजरीकडे लक्ष देतांना हे शब्द ध्यानांत राहिले असले तरी त्यांतला अर्थ मात्र ध्यानांत आला आहे असें म्हणतां

आलें नसतें. आज मात्र त्या वर्णनांतला खरा रस समोरच्या दृश्याकडे पाहून ध्यानांत येत होता. वास्तविकपणें मानव आणि निसर्ग ह्यांतल्या संघर्षाचें तें प्रत्यक्ष स्वरूप डोळ्यांना मात्र मानव आणि निसर्ग यांच्या सहकार्यानें निर्माण झालेल्या देखाव्यासारखें वाटत होतें. क्षितिजाखालीं हळूहळू गुप्त होणाऱ्या सूर्यानें पाण्याच्या त्या अथांग सागराला तेजस्वी रंग दिले होते आणि प्रचंड वृक्षांचे ते शुष्क अवशेषहि त्या तेजांत न्हाल्यानें आकर्षकतेनें भरले गेले होते.

## जुलमी ‘ कोसी ’

माझ्या ह्या तंद्रीचा भंग माझ्या सोबत्याच्या शब्दांनीं झाला. तो सांगत होता कीं कोसीच्या पाण्याचा असा विशिष्ट गुण आहे कीं ज्या झाडांच्या मुळांना त्या प्रवाहाचें पाणी लागतें तीं झाडें जगूंच शकत नाहींत. एकदोन वर्षांत पूर्णतया शुष्क होतात आणि हळूहळू कोसीच्या प्रवाहांत विलीन होतात. फक्त खजूर आणि ताड ह्या जातीचीं झाडेंच जगूं शकतात. माझ्या मित्रानें पुरविल्ल्या ह्या माहितीस साऱ्यांनींच दुजोरा दिला आहे. पण ह्या चमत्काराचें कारण मात्र कुणालाच सांगतां आलें नाहीं. कुणीं सांगितलें कीं कोसीच्या पाण्याच्या Freezing Coldness चा हा परिणाम आहे, तर कुणीं सांगितलें कीं ह्या पाण्यांत कांहीं रासायनिक गुणधर्म आहेत. पण निश्चित कारणाचा मात्र पत्ता लागला नाहीं. ह्या प्रवासांत अनेकांशीं बोलतांना कोसीच्या पाण्याबद्दल आणखीहि कांहीं चमत्कारिक गोष्टी कळल्या. पहिली म्हणजे ज्या वर्षीं कोसीचा पूर ओसरल्यानंतर एखाद्या विभागांत ‘ कास ’ व ‘ पटेर ’ आदि गवतांचीं जंगलें दाट प्रमाणांत उगवतात त्या ठिकाणीं पुढच्या वर्षीं पूर येत नाहीं. त्यामुळें दाट प्रमाणांत ‘ कास ’ ‘ पटेर ’ उगवणें हें पुराच्या दाढेखालून सुटल्याचें लक्षण मानलें जातें. आणखी एक गोष्ट कळली कीं त्या विभागांत माणसें त्याचप्रमाणें जनावरें ह्यांची प्रजोत्पादनशक्ति एकदम कमी होते व ‘ मलेरिया ’ आणि ‘ क्रॉनिक डिसेन्ट्री ’ हे रोग जवळजवळ शें. ९० लोकांना होतात. मध्ययुगीन राजेरजवाड्यांप्रमाणेंच कोसीच्याहि जुलमीपणाच्या ह्या सुरस कथा ऐकल्यानंतर ‘ कोसी महाराणीकी जय ! ’

ह्या नावाड्यांच्या आणि प्रवाशांच्या तोंडून ऐकलेल्या घोषणेचा एक नवा अर्थ मला लागला. (ज्याप्रमाणें गंगेविषयीं ‘जय गंगे माते’ हा अथवा ह्याच अर्थाचे जयघोष रूढ आहेत, त्याप्रमाणें कोसीसंबंधीं ‘कोसी महाराणी की जय’ हा घोष केला जातो.)

निर्मलीहून दुसऱ्याच दिवशीं सकाळीं मी कोसी विभागांतल्या ‘सहरसा’ जिल्ह्यांतील भूमिभागांना भेट देण्यासाठीं रवाना झालों.

निर्मलीला आम्ही केवळ एकच रात्र घालविली. पण समजुतीच्या थोड्याशा घोटाळ्यामुळें ती रात्र अशा अवस्थेंत काढावी लागली कीं त्याचें विस्मरण सहसा होणार नाहीं.

## झोंपेचें खोबरें

कोसीपीडित विभागांत वाहनांची अतिशय गैरसोय असल्याचें आणि सामानसुमान हातीं घेऊन प्रसंगीं मैलचे मैल चालावें लागत असल्याचें समजल्यावरून मी माझें सामान छोट्याशा बॅगमध्यें मावेल एवढेंच घेतलें होतें. रहाण्याची व्यवस्था प्रत्येक ठिकाणीं पूर्वनियोजित होती. त्यामुळें पांघरण्यासाठीं केवळ एक चादर घेतली होती. अंथरूण नव्हतेंच. दरभंग्याहून निघतांना माझ्याजवळ कांहींतरी असेलच अशा समजुतीवर आमच्या सहकाऱ्यानेंहि कांहीं घेतलें नाहीं. निर्मलीलाहि ज्या स्वयंसेवकाची भेट व्हावयाची होती, तोहि बाहेरगांवीं गेला असल्यानें कांहींच व्यवस्था करतां येण्याजोगी नव्हती. म्हणून रात्रीं जेवणखाण झाल्यावर झोपण्याचा प्रश्न आल्यानंतर आमची दोघांचीहि अवस्था मोठी चमत्कारिक झाली. शेवटीं खाटेच्या झोळण्यांत त्याला झोपायला सांगून मी खुर्चीवरच ‘पडायचा’ प्रयत्न करूं लागलों. शेवटीं तें जमत नाहीं, हें पाहून जवळचीं दोन वृत्तपत्रें लांबरुंद पसरलीं. त्यावर टॉवेल टाकला आणि चादर ओढून झोंपण्याच्या विचाराला लागलों. आजूबाजूला सर्वत्र पसरलेल्या पाण्यामुळें जमिनीला अतिशय थंडपणा आला होता; आणि थंडीनिवारणाबद्दल वृत्तपत्रांना गांधीजी आणि आयरिश क्रांतिकारक डॅन ब्रीन यांच्यासारख्यांकडून प्रशस्तिपत्रें मिळालीं असलीं, तरी प्रत्यक्ष अनुभव मात्र उलटा येत होता. थंडीच्या

माऱ्यापासून शरीराचा बचाव करण्यासाठीं चादरीचा थोडासा भाग अंगाखालीं घ्यावा म्हटलें, तर उघड्या पडणाऱ्या भागावर डासांचा अतिशय जोरदार हल्ला चालू होई. अशा स्थितींत थोडी झोंप, थोडा वेळ डांस मारण्याचा कार्यक्रम आणि रात्रभर मित्राचा आणि बाहेरगांवीं गेलेल्या त्या अपरिचित स्वयंसेवकाचा मनोमन उद्धार अशा स्थितींत रात्र संपवून जेव्हां उठलों, तेव्हां शरीरावर सर्व ठिकाणीं कमींत कमी एक इंच मांसांत वाढ झाल्यासारखी वाटावी इतकें अंग डांसांच्या हल्लयानें सुजलें होतें. या बाबतींत धर्मशाळेंतील एका व्यक्तीनें सांगितलें कीं आजूबाजूच्या सांठलेल्या पाण्यामुळें ऑगस्ट ते डिसेंबर डांसांचा अतिशय त्रास या विभागांना होतो आणि डांसहि मोठे आणि जास्त विषारी असतात.

## घरांची दुर्दशा

दुसऱ्या दिवशीं सकाळीं निर्मली विभागाच्या कोसी रिलीफ अधिकाऱ्याबरोबर आम्ही आजुबाजूच्या क्षेत्राचें प्रत्यक्ष परीक्षण करण्यासाठीं गेलों. कोसीनें प्रवाहाबरोबर आणून टाकलेल्या मातीचे ढीग प्रत्येकाच्या घरासमोर पडले होते. घरांतहि होते. घरांतून पाणी शिरलें होतें त्यावेळीं (कारण आम्ही गेलों त्यावेळीं पाणी Maximum Flood Limit पेक्षां ४ फुटांनीं खालीं गेलें होतें) प्रवाहानें घरांत आणून टाकलेल्या मातीचे हे ढीग भांडीं घासणें, स्नान करतांना अंगाला लावणें (अनेक खेड्यांतून चांगल्या जातीची माती स्नानासाठीं वापरण्याची पद्धत आहे) इत्यादि कामांसाठीं तसेच सांठवून ठेवले होते. आम्ही पाहिलेल्या कांहीं घरांची स्थिति अतिशय चमत्कारिक झाली होती. घर अगदीं छपरापर्यंत वाळूनें भरलें गेल्यामुळें लोकांना छपरावरच राहावें लागत होतें! एकंदर घराच्या ६० टक्के पर्यंत घरें संपूर्ण कोसळलेलीं आणि राहिलेल्यांतल्या निम्यांना भेगा पडलेल्या दिसत होत्या. रिलीफ ऑफिसरनें आम्हांस सांगितलें कीं आणखी जर तीनचार वर्षें कोसीचा पूर या विभागांत येत राहील तर सध्यांच्यापैकीं एखादेंच घर उभें दिसेल!

## जनतेचा प्लॅटफॉर्मवर मुक्काम

निर्मली स्टेशनच्या दिशेला गेल्यानंतर आम्हीं प्लॅटफॉर्मवर एक नवीन

वसाहतच निर्माण झालेली पाहिली. प्लॅटफॉर्मच्या उंचीमुळें ( तें पाण्यापासून कमी धोक्यांत असल्यामुळें ) घरेंदारें सोडावें लागलेले अनेक लोक प्लॅटफॉर्मवरच झोपड्या उभारून राहत होते आणि गाड्या बंद असल्यानें प्लॅटफॉर्मचाहि दुसरा कांहींच उपयोग नसल्यानें त्यांना तशी परवानगी देण्यांत आली होती. स्टेशनच्या इमारतींत पाणी झाल्यानें एका वॅगनमध्यें स्टेशन ऑफिस, दुसऱ्यांत स्टेशन–मास्तरचा संसार तर तिसऱ्यांत तार ऑफिस अशा प्रकारें सर्व काम चालू होतें.

## प्रवासाचें दिव्य

आमचें हें सारें भ्रमण अर्थातच होडीच्या योगानें चालू होतें. धर्मशाळेंत परत येऊन तेथून मान्सी–मार्गें सहर्षासाठीं रवाना झालों. मान्सीपासून सहर्षापर्यंतचें अंतर केवळ १८।२० मैलांचें असूनहि रेल्वे रूळ पुरानें जागजागीं उखडले गेल्यामुळें संपूर्ण १२ तास हें अंतर तोडण्यासाठीं लागतात आणि हा प्रवास म्हणजे एक दिव्य होऊन बसतें.

## सहर्षाकडे

रात्र मान्सी स्टेशनावरच काढून ( यावेळीं मिळालेल्या सहकाऱ्याजवळ अंथरूण पांघरूण भरपूर होतें ) पहांटें ५ वाजतां गाडीनें निघून दोन मैलांवरील बदला घाट येथें पोहोंचलों व सामान कांखोटीला मारून जवळजवळ एक मैल चालल्यानंतर पडावासारख्या पण शिडें लावलेल्या होडींत पुढच्या प्रवासासाठीं पाऊल ठेवलें. आम्हांला अगदीं सामान टाकल्यापासून ( म्हणजे सुमारें ६ वाजल्यापासून ) अगदीं त्वरित होडी सुटत असल्याचीं आश्वासनें मिळत असलीं तरी तीं प्रत्यक्षांत यायला ८।। वाजले. ऊन चांगलेंच भासूं लागलें होतें ( कारण ५। लाच उजाडलें होतें ) आणि त्यामुळें सुरवातीपासूनच आजुबाजूकडे पाहण्याच्या मनःस्थितींत राहिलों नव्हतों. २५–३० माणसें व्यवस्थित बसतील अशा त्या पडावांत ६८ मानवी जीवांना कोंबण्यांत आलें होतें व त्यामुळें इकडून तिकडे हालण्याचीहि सोय नव्हती. अशा प्रकारें तीन तासांत आठ मैलांचें अंतर तोडून कोडरमाघायापाशीं सुमारें ११।। ला उतरलों. त्यानंतर पुनश्च एक मैल चालून स्टेशनच्या

धर्मशाळेंत ठाण दिलें आणि होडींत भेटलेल्या कांहीं स्वयंसेवकांच्या ताब्यांत सामान देऊन आम्ही शेजारच्या विहिरीवर स्नान केलें. त्यानंतर घाईघाईनें गाडींत चढलों. गाडी वारंवार एक वाजल्यापासून शिट्या देत देत अखेरीस दोन वाजतां सुटली व M. S. M. ला मागें टाकील अशा गजगतीनें चालत १२ मैलांचें अंतर अवघ्या दोन तासांत तोडून तिनें आम्हांला सहर्षाकडे आणून सोडलें.

## तें जमलेंच नाहीं

सहर्षा येथें मी एकूण दोन दिवस राहिलों व तेवढ्या अवधींत सुपौल नांवाच्या कोसीच्या मुख्य प्रवाहाखालीं सांपडलेल्या खेड्यांत जाण्याचा प्रयत्न केला. निर्मली हें गांव मुख्य प्रवाहापासून दोन मैलांवर आहे आणि तेथून सरळ अंतर मोजलें, तर अवघ्या ८।१० मैलांवर सुपौल आहे. पण कोसी ओलांडण्याची शक्यता नसल्यानें सुमारें ७५।१०० मैलांचा फेरा करून अखेरीस सहर्षामार्गें सुपौल येथें जाण्याचा प्रयत्न केला, पण तोहि यशस्वी होऊं शकला नाहीं. निर्मली येथें पाणी ४ फुटांहून जास्त उतरलें असतांहि रस्त्यांतून वाहणाऱ्या कंबरभर पाण्यास जोर एवढा भयंकर होता कीं नवख्या माणसाला प्रवाहाविरुद्ध पायीं जाणें कठीण वाटे. त्यामुळें सुपौलला भेट देऊन एका इंग्रजी म्हणीप्रमाणें 'सिंहाच्या गुहेंत जाऊन त्याच्या दाढेला हात घालण्याची' (To beard the lion in his own den) माझी फार इच्छा होती. पण प्रत्यक्ष सुपौलला जाण्याचा योग आलाच नाहीं !

सहर्षा येथील दोन दिवसांच्या मुक्कामांत एका विशेष अनुभवाखेरीज फारसें कांहीं पहायला, ऐकायला मिळालेंच नाहीं. सहर्षाच्या चारी बाजूंस जरी कोसीच्या पाण्यानें वेढा दिला असला तरी प्रत्यक्ष सहर्षा आणि त्याच्या भोंवतालचा चार पांच मैल व्यासाचा टापू एखाद्या बेटाप्रमाणें कोसीच्या प्रवाहांत उभा आहे. इतकेंच नव्हे तर कोसीच्या पाण्याचा फायदा घेऊन या विभागांत एक पीक—जें वर्षातील मुख्य पीक आहे—चांगलेंच तरारतें.

परंतु मानवी सुखसमृद्धीला आणि प्रगतीला थोडी देखील मदत करावयाची नाहीं हा कोसीचा बाणा असल्यानें कालवे काढून कोसीच्या

पाण्याचा उपयोग करणें शक्य नाहीं. केवळ प्रवाहाच्या वाढीबरोबर जेवढें पाणी आंत येईल तेवढ्यावर गुजराण करायची! कारण कालवे काढले तर कालव्यांतल्या पाण्यालाच इतका प्रवाह आणि वेग असतो कीं दोन्ही बाजूच्या तीरांची जमीन काढीत काढीत तो शेतांना आणि पिकापाण्याला धोका निर्माण केल्याशिवाय राहणार नाहीं.

## विचित्र हळहळ !

यामुळेंच सहर्षा येथें विशेष गोष्ट ऐकली ती ही, कीं पूर फार लवकर ओसरल्याबद्दल शेतकरी हळहळत होते. कारण शेतांतील पाणी अकालीं ओसरल्यामुळें मुख्य पिकाचीच दुर्दशा होणार! ह्यांच्या हळहळण्याचें हें कारण वास्तविक आमच्या भ्रमन्तीहून परत आल्यानंतर मला कळलें. तोंपर्यंत मात्र मला मोठें चमत्कारिक वाटत होतें. सहर्षा जिल्हा बोर्डाच्या अध्यक्षांबरोबर आम्ही सर्व वस्तींना भेटी देत होतों आणि प्रत्येक ठिकाणीं हेंच रडगाणें 'पूर जल्दी ओसरला, आतां आमचें कसें होणार?' हें ऐकून मला आश्चर्य वाटे. पूर ओसरल्याबद्दल आनंद मानायचा कीं शोक करायचा? पण कारण कळल्यानंतर मात्र उदासतेची एक छटा बराच वेळपर्यंत माझ्या मनावर तरंगत होती! मानवसमूहांपैकीं एकाच्या दुःखावर, हालअपेष्टांवर आणि कष्टावर दुसऱ्याचें जीवन आधारलेलें असावें! निर्मलीचे लोक पुराच्या कचाट्यांतून सुटल्याबद्दल आनंद मानत असतील पण त्याचमुळें येथलीं पिकें सुकलीं म्हणून शेतकऱ्यांचीं हृदयें जळत आहेत!

## हथिया नक्षत्राचा दगा

आमच्या भ्रमन्तीमध्यें एका शेतकऱ्याला अखेरीस मीं विचारलें कीं यापुढें पूर पुन्हां वाढण्याची शक्यता आहे कीं यावर्षीं आतां अजिबात शक्यता नाहीं? त्यानें सांगितलें पूजेपर्यंत (दसऱ्यापर्यंत) हिमालयाच्या विभागांत जोरदार वृष्टि होईल तर पुन्हां पूर वाढेल आणि त्याच गोष्टीकडे आम्ही डोळे लावून आहोंत! (परंतु बिहारांत—किंबहुना संपूर्ण उत्तर आणि पूर्व भारतांत—हथिया नक्षत्रानें दगा दिल्यामुळें त्यांची हीहि अपेक्षा फोल झाली असेल.)

कोसीला 'माणसाळविण्याच्या' ब्रिटिश आणि काँग्रेस राज्यकारभाराच्या वेळच्या प्रयत्नांची थोडीबहुत माहिती देऊन हें कोसीपुराण आवरतें घेतों.

## आकाशाला गवसणी !

हिमालयाच्या निकटचा भारताचा भाग हा जास्तींत जास्त सुपीक आहे आणि जसजसें दक्षिणेकडे जावें तसतशी भूभागाची नैसर्गिक सुपीकता कमी कमी होते. कोसी विभाग ह्या नांवानें ओळखला जाणारा दरभंगा-पूर्णियाचा हा प्रदेशहि या नियमाला अपवाद नाहीं. नैसर्गिक सुपीकतेच्या बाबतींत बराच वर नंबर असलेल्या या विभागांतून जर पुराचा धोका नाहींसा केला तर भारताचा 'युक्रेन' बनण्याची क्षमता या भागांतील भूमींत आहे. पण पाण्याच्या अनिश्चिततेमुळें आणि कास-पटेरचीं जंगलें तोडण्याच्या श्रमामुळें आणि वेळेच्या अपव्ययामुळें या भागाला अगदीं अवकळा प्राप्त झाली आहे. ही गोष्ट ध्यानांत घेऊन ब्रिटिश सरकारनें आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या दडपणामुळें भारताचें उत्पादन वाढविण्याची गरज भासूं लागतांच वेव्हेल यांचे कारकीर्दींत कोसीला बांध घालण्याचे प्रयत्न सुरू केले. प्राथमिक तपासणी आणि स्थळनिश्चिती यासाठीं २५ लाख रुपये खर्च केल्यानंतर सरकारला असा 'शोध' लागला, कीं कोसीच्या प्रवाहाला अतिशय वेग असल्यामुळें आणि कोसीचा तळ (Bed) अतिशय उथळ असल्यानें (कोसी ही अतिशय प्रचंड नदी असूनहि तिला स्थिर असा तळ नाहीं आणि तिचा प्रवाह बदलण्याचें हें एक कारण आहे अथवा वारंवार प्रवाह बदलण्यामुळें हें असें झालें आहे. पण तें कसेंहि असलें तरी त्याचा प्रत्यक्ष परिणाम असा आहे कीं अनेक ठिकाणीं कोसीच्या मुख्य प्रवाहांतहि तिचा तळ केवळ ७।८ फूट खोल आणि जास्तींत जास्त खोलीच्या जागींहि क्वचितच २० फुटांहून खोली असलेला असा आहे.) समतळ भूमीवर आल्यानंतर कोसीला बांध घालणें आजूबाजूच्या भूभागाला धोक्याचें होईल आणि म्हणून शेवटीं छत्रगद्दी (ज्या ठिकाणीं कोसी सपाट जमिनीवर येते) येथून कांहीं मैलांवरील नैसर्गिक पहाडांच्यामध्यें बांध घालून धरण निर्माण करण्याचे प्रयत्न चालू करण्यांत आले आहेत. पण कोसीचा वेग, अनिर्बंधता आणि पाण्याची रासायनिक विशेषता यांमुळें प्रत्यहीं एक नवा प्रश्न निर्माण

होत आहे. आजकाल ज्या ठिकाणीं बांध घालण्याचे प्रयोग चालू आहेत म्हणून वर लिहिलें तें स्थान नेपाळ हद्दींत असून नेपाळमधील एक प्रसिद्ध देवस्थान बडाछत्र येथून ५ मैलांवर आहे. त्या ठिकाणीं कोसीचा संयुक्त प्रवाह ( सातही मूळ प्रवाहांपासून बनलेला ) सुमारें ११५० फूट उंचीच्या दोन टेकड्यांमधून वहातो. नैसर्गिक सौंदर्य आणि रमणीयता या दृष्टीनेंहि ह्या स्थळांची अतिशय ख्याती आहे असें मीं ऐकलें आहे. ह्या ठिकाणीं ८०० फूट उंचीचा कृत्रिम बांध घालून पाणी अडवायचें आणि त्या पाण्याला मर्यादित वेगानें व योग्य तेवढ्या प्रमाणांत सोडून दरभंगा, पूर्णिया, सहर्षा विभागाला भारतांतील अग्रगण्य Surplus Food Area बनवून पंजाब, सिंधमधून मिळणाऱ्या धान्याच्या अप्राप्यतेची उणीव दूर करावयाची असा हा प्रयोग आहे. ८०० फूट उंच होऊं घातलेल्या या बांधाची रुंदी, जाडी आदि परिमाणेंहि तशींच अवाढव्य आहेत आणि त्यासाठीं चालू असलेली तयारीहि उचित प्रमाणावर चालू आहे असें सांगितलें म्हणजे पुरेल. आजच्या अंदाजाप्रमाणें हें धरण कमींत कमी ७५ चौरस मैलांचा प्रदेश व्यापील आणि ( पाण्याच्या सांठ्याखालीं ) निर्माण होणाऱ्या Hydro-electricity मुळें संपूर्ण नेपाळ आणि अधिकांश उत्तर बिहारचें खेडें न् खेडें विद्युत्दीपांनीं उजळेल असें सांगण्यांत येतें.

## अडचणीच महत्त्वाच्या !

पण या योजनेंत दोन मोठ्या अडचणी अग्रगण्य आहेत. पहिली म्हणजे बांध घातला जाईपर्यंत पाण्याचा प्रवाह वळवून अजीबात दुसऱ्या मार्गानें नेण्याची आवश्यकता आणि शक्यता. ह्या बदललेल्या मार्गाच्या नियोजित तळाला कापीत कोसी काय काय धुडगूस घालील हा प्रश्न. पुन्हां प्रवाहाला बाहेर पडण्यासाठीं जवळपास दुसरा नैसर्गिक रस्ताहि नाहीं म्हणतात. दुसरी अडचण हवापाण्याची. ज्या ठिकाणीं हें काम चालू आहे तेथील हवेंत स्थानिक रहिवाश्यांखेरीज कुणीच टिकूं शकत नाहीं आणि त्यामुळें प्रत्यक्ष योजनेचें योग्य मार्गदर्शन करणें अतिशय कठीण झालें आहे. परंतु या साऱ्या अडचणींवर मात करून कोसीचें आणि छोट्या नागपुरांत उगम पावणाऱ्या दामोदर नदीचें अशीं हीं दोन्ही धरणें

ज्यावेळीं पूर्ण होतील, त्यावेळीं तीं धरणें म्हणजे मानवाच्या निसर्गविजयाचा एक ठळक टप्पा होतील एवढेंच नव्हे तर बिहार, बंगाल आणि नेपाळ ह्या प्रांतांचें भवितव्य अतिशय उज्ज्वल करतील हें निःसंशय.

### उज्ज्वल भविष्यकाळ

कोसीपुराण तर संपलें. एका गोष्टीचा मात्र याबरोबरच उलगडा केला पाहिजे. एका ठिकाणीं मीं उल्लेख केला आहे कीं वृत्तपत्रांतून ध्वनित होणाऱ्या हालअपेष्टा आणि दैन्य मला आढळलें नाहीं. निर्मलींत शिरल्याबरोबर होडींतून झालेल्या दहापंधरा मिनिटांच्या प्रवासांतील माझ्या मनोव्यापाराचें तें वर्णन होतें, पण प्रत्यक्षांत मात्र वृत्तपत्रांत येणाऱ्या वर्णनाहूनहि अधिक खडतर, कष्टप्रद, ओढाताणीचें जीवन कोसीच्या प्रवाहांत सांपडलेला बिहार जगत आहे. प्रथमतः देशांत धान्य, अन्न, वस्त्रादींचा तुटवडा, त्यांतून कोसीच्या अनिर्बंधतेनें वहातुकीच्या मार्गांतले अडथळे आणि त्यामुळें मदत पोंहचविण्यांतील कठीणता, कोसीच्या प्रवाहांबरोबर भेट देणाऱ्या रोगांनीं आलेली निःसत्त्वता या साऱ्यांमुळें प्रगति आणि स्थैर्य यांना कोसीची प्रजा पूर्ण पारखी झाली आहे. सरकारी मदतीच्या अपुरेपणाबरोबरच बाहेरच्या विश्वाची उपेक्षावृत्ति आणि रोज मरे त्याला कोण रडे अशा दृष्टीनें विचार करणाऱ्या नेत्यांचा आणि राज्यकर्त्यांचा परभाव यांनीं निर्माण झालेले प्रश्न बाहेरच्या माणसाला आकलनहि न होऊं शकण्याइतके प्रचंड आहेत. गौरवाची, अभिमानाची आणि भविष्याच्या उज्ज्वलतेची ग्वाही देणारी गोष्ट इतकीच कीं या साऱ्या अपेष्टांना, उपेक्षांना, आघातांना न डरतां झुंजारपणें जीवनाचें आव्हान स्वीकारत आर्यांच्या लोकमान्य टिळकप्रणीत मूळ भूमींतील त्यांचे वंशज, आपलें स्वत्व, स्थान आणि आपली संस्कृति टिकवून आहेत, जीवनाचा लढा लढत आहेत आणि त्यांत यशस्वी होण्याचा निर्धार त्यांच्या जीवनांतून प्रतीत होत होत दृष्टि असलेल्या माणसाला आशेनें आणि विजिगीषु वृत्तीनें भारीत आहेत.

★

# १२ : बिहारचा निरोप

जितक्या अकस्मात् बिहारला येण्याचें ठरलें होतें तितक्याच अकस्मात्-पणें बिहारांतून निघण्याचा दिवस ठरतांच माझ्या मनावर औदासीन्याची विलक्षण छया पसरली ! जसजसा जाण्याचा दिवस जवळ जवळ येत होता तसतसें वाटूं लागलें होतें कीं हें सारें निर्मळ, मोकळें आणि महाराष्ट्राहून अनंत अधिक संधींनीं ( Opportunities ) भरलेलें क्षेत्र मुळीं सोडूंच नये ! घरीं जाणार, आपल्या साऱ्या सुहृद इष्टआप्तांना भेटणार ह्या गोष्टीचा आनंद मनाच्या गाभ्यापर्यंत पोहोंचूच शकत नव्हता ! मनाच्या ह्या शून्य अवस्थेंत मनोभूमीवर बिहारांतले बरेवाईट अनुभव आणि महाराष्ट्रांत दूर राहिलेल्या साऱ्या परिचितांशीं लहानपणापासून घडलेल्या प्रसंगांच्या आठवणी ह्यांची विचित्र गल्लत उडून दिवसरात्र बेचैन करीत होती.

**‘ अमुचा रामराम तो घ्यावा...’**

पण बिहारांत येतांना वाटत असलेली शून्यमनस्कता आणि आतांची ही स्थिति यांत किती तरी अंतर होतें ! मी जेव्हां बिहारला जायला निघालों होतों तेव्हां एक नवीन प्रांत पहायला मिळणार ह्या उत्सुकतेबरोबरच त्या ठिकाणीं जायचें तें केवळ कर्तव्यपूर्तीसाठीं आणि प्रवास करून नवनवीन प्रदेश पहाण्याची मनाची इच्छा शमविण्यासाठींच; पण तिथें आपलें मन रमणें शक्य नाहीं, महाराष्ट्राइतकें तर नाहींच नाहीं अशा प्रकारची एक धारणा अप्रत्यक्षपणें मनांत घर करून राहिली होती; आणि बिहारांतील वास्तव्यांत महाराष्ट्राबाहेरचें विश्व पाहून तेथील परिस्थितीची तुलना महाराष्ट्राशीं करायला मिळाल्यामुळें महाराष्ट्र आणि महाराष्ट्रीय यांच्या कांहीं विशिष्ट गुणदोषांबद्दल स्पष्ट कल्पना मनांत निर्माण झाल्या होत्या, बिहार हा मराराष्ट्रापेक्षां अधिक उदार, अधिक शांत आणि माझ्या वैयक्तिक आशाआकांक्षाशीं जास्त जुळणारा प्रांत आहे हें ध्यानांत आल्यानें एक नवीनच आत्मीयता निर्माण झाली होती.

वियोगप्रसंगीं एकमेकांचे दोष लक्षांत न येतां केवळ गुणच तेवढे अधिक स्पष्टपणें आणि सूक्ष्मपणें डोळ्यांत भरतात ह्या न्यायानें एका दृष्टीनें

'चिरविरहा'च्या ह्या प्रसंगीं बिहार आपल्या नैसर्गिक रूपानें, आपल्या प्राकृतिक गुणधर्मांसह आणि आपल्या हृदयान्तर्गत गुणदोषांसह मूर्त होऊन माझ्या नजरेसमोर येत होता आणि त्या माझ्या बिहारच्या वियोग-कल्पनेनें माझें मन अतिशय शून्य झालें होतें. मनाच्या अशा शून्य अवस्थेंतच दिवस चालले होते आणि ह्याची पुरती जाणीव होण्यापूर्वींच माझ्या प्रयाणाचा दिवस कसा जवळ येऊन ठेपला तें कळलेंच नाहीं. तोंपर्यंत जाहीर निरोप समारंभ, खासगी बोळवण, आणि निकट मित्रांचें हितगुज चालू असतांना स्वतःबद्दल ह्या साऱ्या प्रसंगांनीं प्रकट होणाऱ्या भावनांचें एक शीतल सुख वियोगाच्या कल्पनेच्या दाहक पार्श्वभूमीवर अनुभवीत असतांना घड्याळ आणि कॅलेंडर यांचें अस्तित्वच जीवनांतून जणूं नष्ट झालें होतें! मी काळास विसरलों होतों पण काळ मात्र मला विसरला नव्हता, याची जाणीव प्रयाणाचा दिवस उजाडल्यावर झाली आणि अमक्याबरोबर बोलायचें राहिलें, तमक्याच्या घरीं जाऊन अर्धा तास तरी बसायला पाहिजे होतें, तिसऱ्याला जाणार असल्याचें पत्र देखील पाठविलें नाहीं तेव्हां तो काय म्हणेल, अशा प्रकारचे अनेक प्रश्न डोळ्यांसमोर उभे राहून मनाच्या विकलतेंत जास्तच भर टाकूं लागले! कांहीं दिवसांपूर्वीं एका दिवसाची देखील जितकी पर्वा केली नव्हती तितकी विवंचना एकेका तासाबद्दल करावी असें वाटूं लागलें. अन् अशा ह्या धांवपळींतच गाडीचा वेळ कसा झाला हें कळलें नाहीं.

## यथा काष्ठं च काष्ठं च—

पटना स्टेशनावरील दिव्यांच्या त्या विचित्र प्रकाशांत दिसणाऱ्या मित्रांच्या हात हालवीत असलेल्या आकृती दिसेनाशा झाल्यावर मी तेथून आपल्या जागेवर बसलों. मनांतील भावनांचें तांडव जास्त जास्त उग्ररूप धारण करीत होतें. पण बक्सर येईपावेतों निदान बिहारमध्येंच असल्याचें एक समाधान मनाला वाटत होतें आणि इतर प्रवाशांच्या विरोधाला न जुमानतां त्या भयंकर थंडींतहि गाडीची एक खिडकी उघडी ठेवून रात्रीच्या त्या अंधारांत दिसेल तेवढा बिहार मी नजरेंत सांठवून घेत होतों. गाडीनें बक्सर सोडल्यावर हेंही समाधान नाहींसें झालें आणि मनाचा बांध फुटून

# १२ : बिहारचा निरोप

जितक्या अकस्मात् बिहारला येण्याचें ठरलें होतें तितक्याच अकस्मात्-पणें बिहारांतून निघण्याचा दिवस ठरतांच माझ्या मनावर औदासीन्याची विलक्षण छटा पसरली ! जसजसा जाण्याचा दिवस जवळ जवळ येत होता तसतसें वाटूं लागलें होतें कीं हें सारें निर्मळ, मोकळें आणि महाराष्ट्राहून अनंत अधिक संधींनीं ( Opportunities ) भरलेलें क्षेत्र मुळीं सोडूंच नये ! घरीं जाणार, आपल्या साऱ्या सुहृद इष्टआप्तांना भेटणार ह्या गोष्टीचा आनंद मनाच्या गाभ्यापर्यंत पोहोंचूंच शकत नव्हता ! मनाच्या ह्या शून्य अवस्थेंत मनोभूमीवर बिहारांतले बरेवाईट अनुभव आणि महाराष्ट्रांत दूर राहिलेल्या साऱ्या परिचितांशीं लहानपणापासून घडलेल्या प्रसंगांच्या आठवणी ह्यांची विचित्र गल्लत उडून दिवसरात्र बेचैन करीत होती.

## ‘ अमुचा रामराम तो घ्यावा...’

पण बिहारांत येतांना वाटत असलेली शून्यमनस्कता आणि आतांची ही स्थिति यांत किती तरी अंतर होतें ! मी जेव्हां बिहारला जायला निघालों होतों तेव्हां एक नवीन प्रांत पहायला मिळणार ह्या उत्सुकतेबरोबरच त्या ठिकाणीं जायचें तें केवळ कर्तव्यपूर्तीसाठीं आणि प्रवास करून नवनवीन प्रदेश पहाण्याची मनाची इच्छा शमविण्यासाठींच; पण तिथें आपलें मन रमणें शक्य नाहीं, महाराष्ट्राइतकें तर नाहींच नाहीं अशा प्रकारची एक धारणा अप्रत्यक्षपणें मनांत घर करून राहिली होती; आणि बिहारांतील वास्तव्यांत महाराष्ट्राबाहेरचें विश्व पाहून तेथील परिस्थितीची तुलना महाराष्ट्राशीं करायला मिळाल्यामुळें महाराष्ट्र आणि महाराष्ट्रीय यांच्या कांहीं विशिष्ट गुणदोषांबद्दल स्पष्ट कल्पना मनांत निर्माण झाल्या होत्या, बिहार हा मराराष्ट्रापेक्षां अधिक उदार, अधिक शांत आणि माझ्या वैयक्तिक आशाआकांक्षाशीं जास्त जुळणारा प्रांत आहे हें ध्यानांत आल्यानें एक नवीनच आत्मीयता निर्माण झाली होती.

वियोगप्रसंगीं एकमेकांचे दोष लक्षांत न येतां केवळ गुणच तेवढे अधिक स्पष्टपणें आणि सूक्ष्मपणें डोळ्यांत भरतात ह्या न्यायानें एका दृष्टीनें

'चिरविरहा'च्या ह्या प्रसंगीं बिहार आपल्या नैसर्गिक रूपानें, आपल्या प्राकृतिक गुणधर्मांसह आणि आपल्या हृदयान्तर्गत गुणदोषांसह मूर्त होऊन माझ्या नजरेसमोर येत होता आणि त्या माझ्या बिहारच्या वियोग–कल्पनेनें माझें मन अतिशय शून्य झालें होतें. मनाच्या अशा शून्य अवस्थेंतच दिवस चालले होते आणि ह्याची पुरती जाणीव होण्यापूर्वींच माझ्या प्रयाणाचा दिवस कसा जवळ येऊन ठेपला तें कळलेंच नाहीं. तोंपर्यंत जाहीर निरोप समारंभ, खासगी बोळवण, आणि निकट मित्रांचें हितगुज चालू असतांना स्वतःबद्दल ह्या साऱ्या प्रसंगांनीं प्रकट होणाऱ्या भावनांचें एक शीतल सुख वियोगाच्या कल्पनेच्या दाहक पार्श्वभूमीवर अनुभवीत असतांना घड्याळ आणि कॅलेंडर यांचें अस्तित्वच जीवनांतून जणूं नष्ट झालें होतें! मी काळास विसरलों होतों पण काळ मात्र मला विसरला नव्हता, याची जाणीव प्रयाणाचा दिवस उजाडल्यावर झाली आणि अमक्याबरोबर बोलायचें राहिलें, तमक्याच्या घरीं जाऊन अर्धा तास तरी बसायला पाहिजे होतें, तिसऱ्याला जाणार असल्याचें पत्र देखील पाठविलें नाहीं तेव्हां तो काय म्हणेल, अशा प्रकारचे अनेक प्रश्न डोळ्यांसमोर उभे राहून मनाच्या विकलतेंत जास्तच भर टाकूं लागले! कांहीं दिवसांपूर्वीं एका दिवसाची देखील जितकी पर्वा केली नव्हती तितकी विवंचना एकेका तासाबद्दल करावी असें वाटूं लागलें. अन् अशा ह्या धांवपळींतच गाडीचा वेळ कसा झाला हें कळलें नाहीं.

## यथा काष्ठं च काष्ठं च—

पटना स्टेशनावरील दिव्यांच्या त्या विचित्र प्रकाशांत दिसणाऱ्या मित्रांच्या हात हालवीत असलेल्या आकृती दिसेनाशा झाल्यावर मी तेथून आपल्या जागेवर बसलों. मनांतील भावनांचें तांडव जास्त जास्त उग्ररूप धारण करीत होतें. पण बक्सर येईपावेतों निदान बिहारमध्येंच असल्याचें एक समाधान मनाला वाटत होतें आणि इतर प्रवाशांच्या विरोधाला न जुमानतां त्या भयंकर थंडींतहि गाडीची एक खिडकी उघडी ठेवून रात्रीच्या त्या अंधारांत दिसेल तेवढा बिहार मी नजरेंत सांठवून घेत होतों. गाडीनें बक्सर सोडल्यावर हेंही समाधान नाहींसें झालें आणि मनाचा बांध फुटून

जे हुंदके आले ते कांहीं केल्या आवरेनातच ! आपल्या मनाची ही विकल अवस्था बाकी प्रवाशांच्या लक्षांत येऊं नये म्हणून मीं खिडकीबाहेर तोंड काढलें. माझा हा अश्रुप्रवाह किती वेळ चालला होता आणि त्या रडण्यानें हलक्या झालेल्या माझ्या मनास बाहेरच्या थंडीमुळें कधीं डुलकी लागली हें कळलेंच नाहीं.

मी जेव्हां जागा झालों तेव्हां बरेंच मोकळें वाटत होतें. बिहारच्या भूमींतून बाहेर पडल्याबरोबर माझ्या विचारांनींही पालट केला होता. आतां-पर्यंत अगदीं असह्य वाटणाऱ्या त्या वियोगदुःखावर कसला तरी पडदा पडल्यासारखें वाटत होतें आणि लहानपणीं कुठेंतरी वाचलेलें एक सुभाषित—

यथा काष्ठंच काष्ठंच समेयातां महोदधौ ।
समेत्यच व्यपेयातां तद्वत् भूतसमागमः ॥

सारखें आठवूं लागलें होतें. तत्त्वज्ञान हें इतरांच्या कठीण प्रसंगीं वापरावयाचें हत्यार असलें तरी स्वतःच्या दुःखांत त्यांतून दिलासा क्वचितच मिळतो म्हणतात ना ? पण मनांतील दुःखाचा पहिला आवेग ओसरल्यावर मात्र हें दुसऱ्याला त्रासविण्याचें हत्यार मीं स्वतःवरच वापरायला सुरुवात केली. मी स्वतःलाच समजावूं लागलों कीं बिहारला येण्यापूर्वी कांहीं आठवडे कुणाला स्वप्नांतही खरें वाटलें नसतें, कीं मला बिहारांत जावें लागेल आणि तेथें दहा महिनेपर्यंत रहावें लागेल ! पण ज्याच्याशीं अदृष्ट ऋणानुबंधांचे धागे नियतीनें विणलेले असतात त्यांच्याशीं गांठभेट घेतल्याशिवाय आणि त्यांच्या पूर्वजन्मींच्या उपकारांचें ऋण चुकविल्याशिवाय ज्याप्रमाणें गत्यंतर नसतें त्याचप्रमाणें एकदां तें ऋण पुरतें फिटलें कीं नियति कांटेकोरपणें माणसाला त्याच्या पुढच्या कार्यासाठीं नियुक्त करीत असावी !

## कर्तव्यपूर्तीसाठींच !

आणि अशा प्रकारचे विचार चालू असतांनाच मनांत आलें कीं बिहारांत आपण पाय ठेवला तोच मुळीं कर्तव्यपूर्तीसाठीं आणि त्यामुळें त्याच कर्त-व्याच्या प्रगतीसाठीं आणखी कुठेंतरी जावें लागलें अथवा तेथून परत लोटावें लागलें तरी त्यांत मोठेसें काय आहे ? सर्वांनीं निरोप देतांना देखील हेंच

८८८९

नव्हतें कां सांगितलें ? एकाच महान् कार्यासाठीं कटिबद्ध झालेले सहकारी म्हणूनच साऱ्यांचीं मनें पूर्वी ओळखदेख नसतांना देखील इतक्या लवकर जुळलीं आणि त्यांतून केवळ ८।१० महिन्याच्या अवधींत अशा स्नेहाचे रेशमी धागे निर्माण झाले ! अनेकांनीं तर आपलें दुःख बाजूस ठेवून मी कर्तव्यपूर्तीच्या मार्गावर आणखी एक पाऊल पुढेंच जात आहें ह्या जाणिवेनें आनंदच प्रकट केला होता !

ह्या साऱ्या गोष्टी मनांत येऊं लागल्या तसतसें मनांतील औदासीन्याचें पटल दूर होऊं लागलें आणि बिहारांतील वास्तव्याचें पुण्यस्मरण एका वेगळ्याच रूपानें होऊं लागलें. त्या तल्लीनतेंतच गाडी केव्हां मोंगलसराईला आली हें कळलेंच नाहीं !

मोंगलसराईला गाडी बदलून जेव्हां मुंबईस जाणाऱ्या मेलमध्यें चढलों तेव्हां तर भावनांचा आवेग पूर्णपणें ओसरला होता आणि मन हळूंहळूं महाराष्ट्राभिमुख होऊं लागलें! पहिली जाणीव झाली ती म्हणजे—भावनांच्या समुद्रांतील क्षुब्ध लाटांवर वहात असतांना कालची सारी रात्र जागे असल्याची मुळीं जाणीवच झाली नव्हती! झोंप नसल्यामुळें लाल झालेले डोळे आणि गाडींतून तोंड बाहेर काढून बराच वेळ राहिल्यामुळें अस्ताव्यस्त झालेला अवतार यांवर पाण्याचा एक हात फिरवून जरा नीटनेटकेपणा आणला आणि अलाहाबाद गेल्यानंतर झोंपेच्या आधीन झालों, तों संध्याकाळीं जबलपूर येईपावेतों बाहेरच्या जगाला विसरून ' आत्मानंदांत ' तल्लीन झालों ! पुन्हां जागा झालों तेव्हां गाडीचें स्वरूप बदललें होतें. दहा महिन्यांच्या अवधीनंतर महाराष्ट्रीय चेहेरे, मराठी भाषा, आणि दक्षिणी पेहेराव ह्यांचें मोठ्या घोळक्यानें दर्शन होत होतें. मी आपल्या हद्दींत आलों आहें असें मनांत आल्यावांचून राहिलें नाहीं !

ह्यानंतर विचार पूर्णपणें महाराष्ट्रावरच केंद्रीभूत झाले आणि झोंप व विचार ह्यांच्या लपंडावानंतर जेव्हां रात्र संपली त्यानंतर मुंबईला उतरतांना एका वेगळ्याच उत्सुकतेनें आणि आनंदानें मी भरलों होतों !

समाप्त

८८८९८ ... निबंध
२६।३।५९
२०४४

REFBK-0007922
REFBK-0007922

# आमचीं नाट्य प्रकाशनें

**कै. वि. ह. औंधकर**

वेबंदशाही — २

आग्र्याहून सुटका — २

**श्री. ग. कृ. बोडस**

भगवा झेंडा — १॥

अटकेपार — १॥

पूज्य गांधीजी — १।

वासुदेव बळवन्त — १॥

छत्रपतीचा छावा — ·॥·

महावीर कर्ण — ·॥-

राणा प्रताप — ·॥-

**स. अ. शुक्ल**

लोक-सिंहासन — १॥

वीर अभिमन्यु — ·॥·

जयद्रथवध — ·॥·

**मामा वरेरकर**

द्वारकेचा राजा — १॥

**नाना गोखले**

सेनापति तात्या टोपे — ·॥-

**कै. सरपोतदार**

चंद्रराव मोरे — १॥

**मा. भा. कामत**

शककर्त्यांचा न्याय — १॥

रायगडचा वेढा — १॥

**वि. ग. धारप**

पुढचें पाऊल — १।

**आचार्य अत्रे** — १॥

अेकचप्याला

**नाना कोचरेकर**

मानी मराठा — १॥

**अम्बादास अग्निहोत्री**

मालकीण — १

**वि. ना. कोठीवाले**

जयमल्हार — १॥

**ग. पां. परचुरे**

जातिवन्त जवान — १।

**ह. वि. देसाअी**

दोन लग्नें — ·।।।·

**कै. श्री. कृ. ओक**

सिंहगर्जना — १

**के. पां. परांजपे**

शेजारीपाजारी — १॥

**शां. गो. गुप्ते**

झुन्झार झांशीवाली — ·॥·

**प्रि. मो. वा. दोंदे**

वनविहार — १।

**वि. रा. हंबर्डे**

सन १८५७ — १॥

**गंगाधर महांबरे**

दिलजमाअी — -॥-

**सौ. मालती जोशी**

सुशिक्षित सासुरवास — ·॥·

**सौ. मालती बेडेकर**

पारध — १।

**ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, गिरगांव, मुंबअी ४**